सोलापूर तरुण भारत

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, २० डिसेंबर २०२४ | वर्ष दुसरे | अंक २६६ | पाने : ८+४ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम २००२ (सुधारणा) विधेयक २०२४ विधान परिषदेत मंजूर

### ‘जीएसटी’ कॉन्सिलच्या माध्यमातून राज्यातल्या शेतकऱ्यांना दिलासा देणार; राज्यातल्या ‘जीएसटी’ कर संकलनात सुसूत्रता आणून पारदर्शकता आणणार : उपमुख्यमंत्री अजित पवार

मुंबई : आपल्या देशाने ‘एक देश एक कर’ ही संकल्पना स्वीकारली आहे, त्याच माध्यमातून ‘जीएसटी’ कर प्रणाली विकसीत करण्यात आली आहे. राज्यातल्या शेतकऱ्यांसाठी केंद्र व राज्य सरकारच्या वतीने अनेक सवलती, अनुदानाच्या योजना राबविण्यात येत आहेत. जीवनावश्यक वस्तूंसह कृषीक्षेत्राशी निकडीत खते, बी-बियाणे, औषधांवरील ‘जीएसटी’तून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारच्या ‘जीएसटी’ कॉन्सिलच्या माध्यमातून प्रयत्न करणार असल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विधान परिषदेत ‘जीएसटी’च्या अनुषंगाने सदस्यांनी उपस्थित करण्यात आलेल्या प्रश्नाला उत्तर देताना दिली. राज्यातल्या ‘जीएसटी’ कर संकलनात अधिक सुसूत्रता, पारदर्शकता आणण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचेही उपमुख्यमंत्र्यांनी सभागृहात सांगितले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, देशातल्या एकूण कर संकलनापैकी १६ टक्के करसंकलन एकट्या महाराष्ट्रातून जमा होतो. देशांतर्गत एकूण कर संकलनातमहाराष्ट्राचा वाटा सर्वात मोठा आहे. यामुळे राज्यातल्या ‘जीएसटी’ करप्रणालीत अधिक सुसूत्रता आणि पारदर्शकता आणण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येतील. राज्याच्या सीमेलगतच्या भागातून होणारी करचुकवेगिरीची प्रकार थांबविण्यासाठी विशेष खबरदारी घेण्यात येईल. शेतकऱ्यांसाठी केंद्र व राज्य सरकारच्या वतीने अनेक सवलती, सबसिडीच्या योजना राबविण्यात येतात. जीवनावश्यक वस्तूंसह कृषीक्षेत्राशी निगडीत खते, बी-बियाणे, औषधांवरील ‘जीएसटी’तून शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी केंद्राच्या ‘जीएसटी’ कॉन्सिलच्या माध्यमातून प्रयत्न करणार असल्याची माहितीही त्यांनी सभागृहाला दिली.



महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम २००२ (सुधारणा) विधेयक, २०२४’ मंजूर ‘महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम २००२ (सुधारणा) विधेयक, २०२४’ आज विधान परिषदेत मंजूर करण्यात आले. या विधेयकाच्या माध्यमातून राज्य शासनाचा महसूल वाढवण्यार भर देण्यात आला आहे. या विधेयकानुसार सध्याच्या महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम, २००२ मधील कलम ३७ नुसार वसुलीबाबत राज्याचा प्रथम भार विशिष्ट शर्तीच्या अधीन राहून होता. या विधेयकांच्या सुधारणेनुसार महाराष्ट्र मुल्यवर्धित कर अधिनियम, २००२ अंतर्गत विनाशर्त प्रथम भार स्थापित झाल्यानंतर जलद गतीने वसुली करणे शक्य होणार आहे.

तेल कंपन्यांकडून पेट्रोल व डिझेल खरेदी करुन व्यापारी खोल समुद्रात उभ्या असलेल्या बोटींना बॅरेलद्वारे पुरवठा करतात. हा पुरवठा अन्य पेट्रोलपंपाद्वारे केल्या जाणाऱ्या पुरवठ्याप्रमाणे गृहीत धरुन कर भरणा करण्यापासून व्यापारी सूट घेतात. या सुधारणेमुळे किरकोळ विक्री केंद्राची व्याख्या आणि किरकोळ विक्रीचे स्पष्टीकरण कायद्यात समाविष्ट होऊन कर चुकवेगिरीला रोखणे शक्य होणार आहे. त्याचबरोबर या कायद्यातल्या कलम २ (२४) (पाच) या कलमामध्ये सुयोग्य स्पष्टीकरणाचा समावेश केल्यामुळे, एखाद्या संस्थेने किंवा क्लबने स्वतःच्या सदस्यांना केलेल्या विक्रीवर कर आकारणी शक्य होणार आहे.

## शेतकऱ्यांच्या कांद्याला चांगला दर मिळवून देण्यासाठी २० टक्के निर्यातशुल्क हटवा : अजित पवार यांची केंद्राकडे मागणी

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि.१९:- केंद्र सरकारने कांदा निर्यातीवर लावलेले २० टक्के शुल्क तातडीने रद्द करण्याची मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय व्यापार व उद्योगमंत्री पियुष गोयल यांना पत्र लिहून केली आहे. श्रीलंका सरकारने कांद्यावरील आयातशुल्क २० टक्क्यांनी कमी करुन अधिकाधिक कांदा आयातीचे प्रयत्न सुरु केले असल्याने नाशिकसह राज्यातील शेतकऱ्यांना त्यांचा लाल कांदा श्रीलंकेसह परदेशांमध्ये निर्यात करता यावा, कांद्याला खर्चावर आधारीत चांगला दर मिळावा यासाठी केंद्र सरकारने कांद्यावरील २० टक्के निर्यातशुल्क तातडीने रद्द करणे आवश्यक असल्याचे त्यात नमूद केले आहे.



राज्यातील आमदार सर्वश्री नितीन अर्जुन पवार, दिलीपराव बनकर, हिरामण खोसकर, सरोज अहिरे आदी लोकप्रतिनिधींनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना पत्र लिहून याप्रश्नी लक्ष घालण्याची तातडीने तोडगा काढण्याची मागणी केली होती. या लोकप्रतिनिधींच्या मागणीची दखल घेत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केंद्रीय व्यापार मंत्री पियुष गोयल यांना पत्र लिहून कांद्यावरील २० टक्के निर्यातशुल्क तातडीने रद्द करण्याची मागणी केली आहे.

गोयल यांना लिहिलेल्या पत्रात उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणतात की, राज्यात विशेष करुन नाशिक जिल्ह्यात कांदा उत्पादक शेतकऱ्यांची संख्या मोठी आहे. या शेतकऱ्यांकडून परदेशात मोठ्या प्रमाणावर कांदा निर्यात केली जाते. आजमितीस उन्हाळी कांदा संपलेला असून नवीन लाल कांदा मोठ्या प्रमाणावर बाजारात विक्रीसाठी आला आहे. राज्यातील शेतकऱ्यांनी नैसर्गिक संकटाशी लढत कांद्याचे उत्पादन घेतलेले आहे. अवेळी पाऊस व बदलत्या हवामानानुसार त्यांच्या कांद्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. उर्वरीत चांगल्या कांद्यास खर्चावर आधारीत चांगला भाव मिळणे गरजेचे असतांना बाजारभावात दिवसेंदिवस घसरण होत आहे. सद्यस्थितीत राज्यातील लाल कांद्याला प्रति क्विंटल सरासरी २४०० रुपये अत्यल्प दर मिळत असून शेतकऱ्यांचे होणारे नुकसान मोठे आहे. लाल कांदा टिकाऊ नसल्याने शेतकऱ्यांना व व्यापाऱ्यांना तात्काळ विक्री करावे लागत आहे, हे सुद्धा नुकसानीचे महत्वाचे कारण आहे. हे नुकसान टाळण्यासाठी, राज्यातील शेतकऱ्यांच्या कांद्याला चांगला भाव मिळण्यासाठी राज्यात उत्पादित लाल कांद्याची परदेशात जास्तीत जास्त निर्यात होणे आवश्यक असल्याचे त्यात नमूद केले आहे.

## तिप्पट वेगाने महाराष्ट्राला विकासमार्गावर नेऊ : एकनाथ शिंदे

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

नागपूर, दि. १९ डिसेंबर : महाराष्ट्राला सर्व आघाड्यांवर पहिल्या क्रमांकाचं राज्य करतानाच विकसित भारताला विकसित महाराष्ट्राची भक्कम जोड द्यायची आहे. गेली अडीच वर्षे महाराष्ट्राच्या कायापालटाला सुरूवात झाली असून आता आमचे एकत्रित मिशन आहे समृध्द महाराष्ट्राचं. आता आम्ही तिप्पट वेगाने महाराष्ट्राला विकासमार्गावर नेऊ. महाराष्ट्र आता थांबणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानपरिषदेत दिली.

राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना ते म्हणाले,’ गेल्या अडीच वर्षात विक्रमी कामे झाली. एकही दिवस सुट्टी न घेता आम्ही काम केलं. त्यामुळे या राज्याच्या निवडणूक निकालांत इतिहास घडला.आमचे सरकार हे जनतेचे लाडके सरकार झाले. जनतेच्या विश्वासामुळे आमची जबाबदारी वाढली आहे. आता अधिक गतिमान आणि लोकाभिमुख कारभाराचं वचन आम्ही देतोय. मुख्यमंत्री म्हणून काम करताना माझं धोरण गतिमान विकास हेच होतं तिथं पक्षभेद, द्वेषाला कधी थारा दिला नाही. माझ्यावर टीका झाली पण मी त्याला कामातूनच उत्तर दिल्याचे सांगून म्हणाले, ’माझे विदर्भाशी माझं वेगळं नातं आहे ते इथल्या प्रेम करणाऱ्या जनतेमुळे. गेल्या दोन्हीही अधिवेशनात आम्ही विदर्भाच्या विकासासाठी ठोस पाऊले उचलली आहेत आणि त्याचे चांगले परिणाम दिसू लागलेत. समृध्दी महामार्ग आपण गोंदिया, भंडारा, गडचिरोलीपर्यंत पुढे नेत आहोत. विदर्भातल्या ५ लाख शेतकऱ्यांना धान उत्पादनासाठी हेक्टरी १५ हजार रुपये बोनसची घोषणा मुख्यमंत्री म्हणून पहिल्याच अधिवेशनात मी केली होती. महाराष्ट्रात १० लाख कोटींची पायाभूत सुविधांची कामं सुरु आहेत. महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक आहे. मुंबई, एमएमआर, पुणे, नाशिक आणि नागपूर शहरांत साडेचारशे किलोमीटर लांबीच्या मेट्रो मार्ग सुरु करणार आहोत. शिरूर ते छत्रपती संभाजीनगर या नवीन ग्रीनफिल्ड द्रुतगती महामार्गाला आम्ही मंजुरी दिली आहे. पुणे रिंग रोड, अलिबाग-विरार मल्टीमोडल कॉरिडोर ही कामे वेगाने सुरु आहेत. सात हजार किमी ॲक्सेस कंट्रोल रस्ते आपण तयार करतोय. राज्याच्या एका भागातून दुसऱ्या भागात जाण्यासाठी सात ते आठ तासांपेक्षा जास्त वेळ लागता कामा नये असं आमचे नियोजन असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला महासत्ता करण्याचा रोडमॅप आखलेला आहे. त्या दिशेनंच काम करून राज्याला सर्व आघाड्यांवर पहिल्या क्रमांकावरचं राज्य करायचं आहे. विकसित भारताला विकसित महाराष्ट्राची भक्कम जोड द्यायची आहे. प्रधानमंत्र्यांसह गृहमंत्री अमित शाह यांचं भक्कम पाठबळ आम्हाला होतं आणि यापुढेही राहिल याची मला खात्री आहे. आता आमचं एकत्रित मिशन आहे समृध्द महाराष्ट्राचं. आम्ही तिप्पट वेगाने महाराष्ट्राला विकासमार्गावर नेऊ, अशी ग्वाहीही शिंदे यांनी यावेळी दिली.

## महिला काँग्रेसच्या राज्यातील सर्व कार्यकारिणी, ब्लॉकस्तरीय समित्या बरखास्त

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. १९ डिसेंबर : महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेसच्या राज्य, जिल्हा आणि ब्लॉक स्तरीय सर्व समित्या तत्काळ प्रभावाने विसर्जित केल्या आहेत. संघटनात्मक बांधणी मजबूत करण्यासाठी आणि महाराष्ट्र राज्यातील महिला काँग्रेसच्या सदस्यत्व मोहिमेला गती देण्यासाठी अखिल भारतीय महिला काँग्रेसच्या अध्यक्षा अलका लांबा यांच्या आदेशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.

महिला काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्षापदी संध्या सव्वालाखे या कायम राहून नवीन समित्या स्थापन करण्याच्या प्रक्रियेचे नेतृत्व करणार आहेत. राज्यातील महिला काँग्रेसची सदस्य मोहीम पुढे नेण्यासाठी आणि नारी न्याय सभासदत्व सत्कार समारंभ आयोजित करणे आणि महाराष्ट्रातील महिला काँग्रेस संघटनेच्या उभारणीसाठी संध्या सव्वालाखे यांच्या सोबत खालील विधानसभा क्षेत्रातील महिला पदाधिकारी सहकार्य करणार आहेत.

दिपाली लालाजी मिसाल - संभाजीनगर , आयशा अस्लम खान - ठाणे , डॉ. अंजली ठाकरे -अमरावती ,सुनीता गावंडे- रामटेक , सीमा विनोद सहारे- गढचिरोली चिमूर , स्वाती राजेश जाधव - नाशिक , साक्षी एस. वंजारी - रत्नागिरी-सिंधुदुर्ग , सीमा महेश आहूजा - कल्याण व सुषमा राजेघोरपडे - सातारा.

## महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परिक्षेचे वेळापत्रक संकेतस्थळावर उपलब्ध

मुंबई : राज्याच्या प्रशासकीय सेवेतील गट ऋअ’ आणि गट ऋबऋ संवर्गातील विविध रिक्तपदे भरती प्रक्रियेसाठी सन २०२५मध्ये महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत नियोजित स्पर्धा परिक्षेचे अंदाजित वेळापत्रक आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे.

शासनाच्या मागणीनुसार शासन सेवेतील विविध पदांवरील भरतीसाठी आयोगामार्फत वर्षभर विविध परीक्षांचे आयोजन करण्यात येते. त्यानुसार सन २०२५ मध्ये घेण्यात येणाऱ्या विविध परिक्षांचे दिनांक निश्चित करण्यात आले आहे. हे वेळापत्रक आयोगाच्या https://mpsc.gov.in आणि https://mpsconline.gov.in या संकेतस्थळांवर प्रसिध्द करण्यात आले आहेत. प्रसिध्द करण्यात आलेले हे वेळापत्रक अंदाजित वेळापत्रक असून, जाहिरातीच्या अथवा परिक्षेच्या प्रस्तावित महिना/दिनांकमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल होऊ शकतो. असा बदल झाल्यास तो आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

संबंधित परिक्षेचे परीक्षा योजना, अभ्यासक्रम, निवड पद्धत इत्यादी तपशील आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे आणि तो वेळोवेळी अद्यावत करण्यात येईल. संबंधित परिक्षेमधून भरावयाच्या पदसंख्येबाबतचा सविस्तर तपशील जाहिरात/अधिसुचनेद्वारे उपलब्ध करुन देण्यात येईल. वेळापत्रकातील सन २०२५ मधील दिनांक निश्चित नसलेल्या परिक्षांचे दिनांक संबंधित परिक्षेच्या जाहिरात/अधिसुचनेद्वारे स्वतंत्रपण जाहीर करण्यात येतील. आयोगाकडून आयोजित परिक्षेच्या दिनांकास अन्य संस्थेची परिक्षा असल्यास उमेदवारास कोणती परीक्षा द्यावयाची आहे. याबाबतचा निर्णय उमेदवाराने स्वत: घेणे आवश्यक आहे,असेही प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

## मीरारोडमध्ये ८ वर्षीय मुलाचे कुत्र्याने तोडले लचके

मीरारोड : भटक्या कुत्र्याने एका आठ वर्षीय चिमुरड्यावर हल्ला करून त्याच्या शरीराची अक्षरशः चिरफाड केल्याचा भीषण प्रकार मीरारोड मध्ये घडला आहे. कुत्र्याच्या हल्ल्यानंतर या चिमुकल्याच्या चेहर्याला, तोंडाला गंभीर जखमा झाल्या आहेत.

ही घटना सोमवार १६ डिसेंबरच्या सकाळची आहे. हा मुलगा फूटबॉल खेळत असताना घराबाहेर त्याच्यावर कुत्र्याने हल्ला केला.

या मुलाचं नाव दक्ष रावत आहे. मीरा रोड मध्ये पूनम सागर भागामध्ये हा गंभीर प्रकार घडला आहे. लहान मुलगा फूटबॉल खेळत असताना एका भटक्या कुत्र्याने त्याचा चेहर्यावर आणि तोंडावर हल्ला केला. तातडीने त्याच्या मित्रांनी दक्षच्या कुटुंबियांना कळवले. त्यांनी दक्षला हॉस्पिटलमध्ये नेले. डॉक्टरांनी मुलाची स्थिती पाहून आता प्लॅस्टिक सर्जरीचा सल्ला दिला आहे.

## बीडमध्ये राजकीय आशिर्वादाने सुरु असलेल्या गुंडगिरीचा बिमोड करा; सहभागी मंत्र्याला बाहेर करा

### नाना पटोले यांची मागणी

तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी

मुंबई, दि. १९ डिसेंबर : परभणी व बीड जिल्ह्यातील हिंसक घटना ह्या पुरोगामी महाराष्ट्राला व संताच्या भूमीला कलंक लावणाऱ्या आहेत. शिव, शाहू, फुले, आंबेडकर विचार संपवण्याचा हा प्रयत्न आहे. परभणीत पोलिसांच्या मारहाणीत सोमनाथ सुर्यवंशी यांचा झालेला मृत्यू हा पोलिसांनी केलेली हत्या असून या हत्येप्रकरणी जबाबदार पोलिसांवर अद्याप कठोर कारवाई का केली नाही? राजकीय आशिर्वादाने महाराष्ट्रात सुरु असलेल्या गुंडाराजचा कायमचा बिमोड करा, अशी मागणी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

विधानसभेत परभणी व बीड जिल्ह्यातील घटनांवरील चर्चेत बोलताना त्यांनी सरकारचे वाभाडे काढले, ते पुढे म्हणाले की, महायुतीच्या अडीच वर्षांच्या काळात राज्यात गुंडगिरीला संरक्षण देण्याचा प्रयत्न झाला आहे. बीडमधील वाल्मिक कराडवर ३०२ सारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत, त्याला पोलीस संरक्षण दिले, त्याला पोलीस संरक्षण देण्याची शिफारस करणारा कोण? त्याला कशासाठी पोलीस संरक्षण दिले? परळीत आंधळे व गीते यांच्यात गोळीबार झाला, त्यात गीते यांचा मृत्यू झाला, या प्रकरणात वाल्मिक कराड या व्यक्तीचा संबंध आहे. या घटनेवेळी पीआय महाजन व पाटील नावाचे पीएसआय त्या भागात कार्यरत होते. सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाली, त्या केज विभागात हेच महाजन व पाटील पोलीस विभागात कार्यरत आहेत. वाल्मिक कराडच्या आदेशाने पोलीस विभागातील बदल्या होत आहेत का? बीडची घटना अत्यंत गंभीर असून त्याला राजकीय आशिर्वाद आहे. मंत्रिमंडळातील एक मंत्री यात सहभागी आहे अशी चर्चा आहे, त्या मंत्र्याला मंत्रिमंडळातून बाहेर केले पाहिजे.

परभणीची घटना ही भीमा कोरगाव सारखीच आहे. घटना घडल्याच्या दुसऱ्या दिवशी शेकडो लोक रस्त्यावर जमा झाले, दुकाने बंद झाली. पोलिसांनी घटना झाली त्यावेळीच योग्य ती कारवाई केली असती तर पुढील घटना घडल्या नसत्या. परभणीत पोलिसांनी कोंबिंग ऑपरेशन करुन निरपराध लोकांवर लाठीचार्ज केला, जनावरापेक्षाही वाईट पद्धतीने मारहाण केली. पोलिसांना लाठीचार्जचे आदेश कोणी दिले? परभणीतील घटना सरकार प्रायोजित होती का? असा प्रश्न उपस्थित होत आहे. निरपराध लोकांवर गुन्हे दाखल करण्यात आले.

सोमनाथ सुर्यवंशी हा पोलीस लाठीचार्जचा व्हीडिओ शूट करत होता त्यावेळी पोलिसांनी त्याला अटक केली व पोलीस कोठडीत बेदम मारहाण केली, सुर्यवंशी यांची हत्या पोलिसांनी केली पण सरकारने अद्याप एकाही पोलिसावर कारवाई केली नाही. बीडच्या घटनेत वाल्मिक कराडच्या सांगण्यावरून दोन दिवसात २०० खोटे गुन्हे दाखल केले आहेत, तोच शासन चालवतो. पोलीस काय करतात? पोलीस शासनाचे ऐकताच का गुंडाचे? मुख्यमंत्री सक्षम आहेत तरिही राज्यात अनागोंदी कारभार चालतो कसा? बीडमध्ये एका गुंडाची दहशत आहे, त्याचा ‘आका’ कोण? हे समजले पाहिजे. महाराष्ट्रात फोफावलेल्या या गुंडाराजचा आता अंत झाला पाहिजे आणि महाराष्ट्रात शिव, शाहू, फुले, आंबेडकरांचा विचार कायम राहिला पाहिजे, असे सांगून ते म्हणाले, युती सरकारच्या काळात दलितांवर सातत्याने अत्याचार होत आहेत, त्यांना न्याय मिळत नाही.

पवईतील जयभीमनगर झोपडपट्टी ऐन पावसाळ्यात मुंबई महानगरपालिका, बिल्डर हिरानंदानी व पोलीसांच्या मदतीने तोडून टाकली. या प्रकरणी सरकारने नेमलेल्या एसआयटीच्या अहवालात पोलीस, बीएमसी प्रशासन व बिल्डर हिरानंदानीला दोषी ठरवले आहे पण आजही त्यांच्यावर कारवाई केली नसल्याचे त्यांनी निदर्शनास आणून दिली.

## डॉ. आंबेडकर यांच्या अवमानप्रकरणी ‘मविआ’चे संविधान चौक ते विधिमंडळाच्या पायऱ्यांवर आंदोलन

तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी

नागपूर, दि .१९ डिसेबर - केंद्रीय गृहमंत्री आमित शाह यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान केल्याप्रकरणी गुरूवारी नागपूर येथील संविधान चौक ते विधानभवनपर्यंत महाविकास आघाडीच्या आमदारांनी जोरदार आंदोलन केले. यावेळी शाह, भाजपाच्या निषेधाच्या घोषणा देत परिसर दणाणून सोडला.




**करोडो लोकांचा देव डॉ.बाबासाहेब आंबेडकर आहेत. मानवता, माणूसकी माहिती नव्हती त्यांना ती डॉ. आंबेडकर यांनी शिकवली. गृहमंत्र्यांनी माफी मागावी.**
**- विजय वडेट्टीवार (विधानसभेतील माजी विरोधी पक्षनेते)**

संविधान चौकातील आंबेडकर यांच्या पूर्णाकृती अभिवादन करून आघाडीच्या आमदारांनी आंदोलनाला सुरुवात केली. बाबासाहेबांचे फोटो घेऊन व घोषणा देत सर्वजण विधानभवनात प्रवेश केला. विधिमंडळाच्या पायऱ्यांवर येत बाबासाहेब का ये अपमान नही सहेगा हिंदुस्थान, जय भीम, जय भीमच्या जोरदार घोषणा महाविकास आघाडीच्या आमदारांनी दिल्या.

निवडणुकीपूर्वी - निवडणुकीनंतर आपले महापुरुष आणि देव बदलणे ही भारतीय जनता पक्षाची फॅशन आहे. भारतरत्न डॉ.आंबेडकर यांनी भारतात समतेचा स्वर्ग निर्माण केला, त्यामुळे आम्ही आंबेडकरांचे नाव घेतो आणि घेत राहणार.

सामान्य जनतेला आपले अधिकार आणि हक्क देणाऱ्या संविधान निर्माते बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान कधीच सहन केला जाणार नाही अशी टीका वडेट्टीवार यांनी केली.

भाजपकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अपमान झाला आहे. हा त्यांचाच नव्हे तर संविधान आणि नागरिकांचा देखील अपमान होता. देशाच्या प्रत्येक नागरिकांना माहिती आहे डॉ. बाबासाहेब आंबेडकर काय होते. बाबासाहेबांनी सर्व समाज घटकातील लोकांना न्याय दिला. जसे आम्हाला वाटते

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आमची अस्मिता आहे. आंबेडकर माणुसकीला मानत होते.**
**- आ.डॉ. नितीन राऊत, (काँग्रेसचे ज्येष्ठ नेते)**

अपमान झालाय तसे नितीश कुमार, रामदास आठवले आणि सत्तेतील मित्र पक्षांना वाटत नाही का? त्यांनी आंदोलन केलं पाहिजे, रस्त्यावर उतरले पाहिजे. भाजपच्या मनातलं ओठावर आलंय असे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विधिमंडळ नेते व आ. आदित्य ठाकरे यांनी सांगितले.

यावेळी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले विधान परिषदेतील गटनेते सतेज पाटील अंबादास दानवे यांच्या दोन्ही सभागृहातील आमदार उपस्थित होते.





December 20, 2024 | 4:00 PM to 7:00 PM
Venue: MGM Stadium, N-6, Chhatrapati Sambhajinagar

### जालन्यात युवक काँग्रेस व डॉ.बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमची निदर्शने

# शहा यांचा प्रतीकात्मक पुतळा दहन करण्याचा प्रयत्न

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी संसदेत संविधानावर सुरू असलेल्या चर्चेदरम्यान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केलेल्या विधानामुळे देशभर संतप्त प्रतिक्रिया उमटत असून, जालन्यात युवक काँग्रेसच्यावतीने प्रदेश सचिव तथा डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोशल फोरमचे जिल्हाध्यक्ष शेषराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली आज गुरुवार दि. १९ डिसेंबर रोजी मस्तगडवरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ अमित शहा यांचा प्रतिमात्मक पुतळा दहनाचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, वेळीच पोलीस पोहोचल्याने कार्यकर्त्यांनी निदर्शने करून अमित शहा यांचा तीव्र




शब्दात निषेध केला

माजी मंत्री आ. डॉ. नितीन राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेल्या आंदोलनप्रसंगी बोलताना शेषराव जाधव म्हणाले की, अमित शहा यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याबद्दल केलेल्या विधानामुळे संपूर्ण देशाचा आणि भारतीय राज्यघटनेचा अपमान झाला असून, देशात संतापाचे वातावरण आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाचे शिल्पकार आणि सामाजिक न्यायाचे अध्वर्यू म्हणून ओळखले जातात. त्यांच्याबद्दल कोणतेही अवमानकारक वक्तव्य करणे हे निंदनीय आणि अस्वीकार्य आहे. अशा प्रकारच्या विधानांमुळे समाजात तणाव निर्माण होऊ शकतो आणि भारतीय समाजातील एकतेला धक्का लागू शकतो. अशा वक्तव्यांवर कठोर कारवाई होऊन अमित शहा यांनी संपूर्ण देशाची माफी मागावी, अन्यथा देशभर तीव्र आंदोलन पेटेल आणि त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील, असा इशारा शेषराव जाधव यांनी दिला. डॉ. आंबेडकर यांचे विचार आणि योगदान सर्वधर्मीय व सर्व समाजासाठी प्रेरणादायी आहेत, त्यामुळे अशा महामानवाचा अपमान कदापिही सहन केला जाणार नाही, असे ते म्हणाले.

या आंदोलनात चंद्रकांत रत्नपारखे, भाऊसाहेब कुवारे, प्रभू दाभाडे, अनिल खिल्लारे, सिद्धार्थ बोर्डे, प्रभाकर कोल्हे, बाबासाहेब मस्के यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.

## मस्साजोग येथील घटनेचा भोकरदन जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने निषेध

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**



बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग येथे संतोष देशमुख यांची निघृणपणे हत्या करण्यात आली.या घटनेचे पडसाद संपूर्ण महाराष्ट्रात उमटत असून,आरोपींना तत्काळ अटक करून कठोर शिक्षा देण्यात यावी यासाठी भोकरदन येथे जिजाऊ ब्रिगेडच्या महिला पदाधिकाऱ्यांकडून निषेध नोंदवत भोकरदन तहसीलदार मार्फत महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन पाठवले असून त्यामध्ये सदरील हत्या ही माणुसकीला काळीमा फासणारी आहे.या हत्येमागे एक मोठी बलाढ्य शक्ती आहे.ज्यामुळे समाजातील निरपराध लोकांचा बळी जात आहे.या प्रवृत्तीला वेळीच आवर घातला नाही तर समाजाचा पोलीस यंत्रणेवरील व न्यायपालिकेवरचा विश्वास संपून जाईल.तसेच परभणी येथील आंदोलन कर्ते व संविधान रक्षक अँड सोमनाथ सूर्यवंशी यांचा देखील पोलीस कोठडीत मृत्यू झाला.या दोन्ही प्रकरणातील दोषींना कठोरातील कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी जिजाऊ ब्रिगेड यांच्या वतीने या निवेदनात करण्यात आली असून यावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हा उपाध्यक्ष सुप्रिया देशमुख,हेमा बापुसाहेब जाधव तालुका अध्यक्षा,वैशाली अमोल शिंदे सचिव,आशा कृष्णा बावस्कर सहसचिव, प्रभावती देशमुख,संघटक,संतोषी डकले यांची यावेळी निवेदन देताना उपस्थिती होती.

## संक्षिप्त

### राष्ट्रीय क्रीडा सप्ताहाचा समारोप

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

पुणे क्रीडा व युवक सेवा संचालनालय अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व चंदनझिरा येथील जीवनराव पारे विद्यालयाच्या सहकार्याने दि.१८ डिसेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय क्रीडा सप्ताह कार्यक्रमाचा समारोप दुपारी ३ वाजता जीवनराव पारे विद्यालयात पार पडला.

प्रारंभी हॉकीचे जादुगार मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. क्रीडा अधिकारी आरती चिल्लारे, रेखा परदेशी, सिध्दार्थ कदम, प्रा.हेमंत वर्मा, सुभाष पारे, अमर लोढें, निसार सय्य़द, प्रतिमा मसवले, विजय खांडीभराड, माधव भद्रे, राहूल गायके, शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी व पालकांच्या उपस्थितीत समारोपाचा कार्यक्रम पार पडला. यावेळी दि.१२ ते १८ डिसेंबर २०२४ या दरम्यान राष्ट्रीय क्रीडा सप्ताहानिमित्त जालना जिल्ह्यातील विविध शाळा व महाविद्यालयामध्ये आयोजित विविध स्पर्धा व इतर उपक्रमांमध्ये सहभाग घेवून यश संपादन केलेल्या शाळेतील विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ, प्रमाणपत्र व सन्मानचिन्हाचे वितरण करण्यात आले. असेही जिल्हा क्रीडा अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### गांधी चमन परिसरात दुचाकिस्वार ऑटोरिक्षाला धडकला



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना शहारातील गांधी चमन परिसरात जिल्हा स्त्री रुग्णालया समोरं गर्दी वाढल्याने दुचाकीस्वारांना गर्दीतुन मार्ग शोधावा लागतोय, चारचाकी व तीनचाकी वाहनधारक हे आपले वाहन रोडवर उभे करून निघून जातात. त्यामुळे सर्वसामान्याना अपघाताला सामोरे जावं लागतंय. जालन्यातील मध्यवस्तीत असलेल्या गांधी चमन परिसरात दुचाकीस्वारांना गाडी चालवण्यास मोठी कसरत करावी लागतेय. जालना शहरातील मध्यवस्तीत असलेल्या महिला बालरुग्नालया समोर काही वाहनधारकांनी आपला थांबाचं तयार केला असून त्याचा त्रास रूग्णालयात येणाऱ्या रूग्नवाहीका तसेच सामान्य जनतेला सोसावा लागतोय हे नित्याचे बनलंय. छोटे – मोठे अपघात हे दररोजचं झाले असून याकडे शहर वाहतूक शाखेचे सोयीस्कर दुर्लक्ष होताना दिसतेय. आज दि.१९ गुरुवार रोजी दुपारी अडीच वा.च्या सुमारास दुचाकीस्वार एका आटोला धडकला त्यात तो किरकोळ जखमी झाला.शहर वाहतूक शाखेच्या गलथान कारभारामुळे वाहनधारक या ठिकाणी आडवे–तिडवे वाहन लावून निघून जातात. त्यामुळे स्त्री रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना याचा त्रास होतोय. तसेच गांधीचमन हा परिसर जास्त वर्दळीचा आहे. या रोडवर जि.प, शाळा,पोस्ट आफीस,महानगर पालिका,रेल्वे स्टेशन,बँक,खाजगी दवाखाने ई. महत्वाची स्थळे असल्याने या परिसरातून वाहनधारकांची नेहमी वर्दळ असते. परंतू शहर वाहतूक शाखेचा कुठलाही धाक नसल्याने बेशिस्त वाहनधारकांमुळे छोटे–मोठे अपघात घडून वाहनधारकात वाद होत असल्याचे नेहमी पहावयास मिळत आहे. त्यामुळे शहर वाहतूक शाखेने बेशिस्त वाहन धारकांवर लगाम कसावी व वाहतूक आणि रस्ते सुरळीत करावी अशी नागरीकांमधून मागणी होत आहे.

### निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षणाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

उद्योग संचालनालय आणि महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राकडून अनुसूचित जाती व जमातीच्या उद्योजकांसाठी भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर विशेष सामुहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत नि:शुल्क १८ दिवसीय निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षणाचे आयोजन छत्रपती संभाजीनगर येथे दि.२४ डिसेंबर २०२४ रोजी करण्यात आले आहे. इच्छुकांनी प्रशिक्षणाच्या नाव नोंदणीसाठी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र कार्यालयाशी (०२४८२ २२०५९२, मो.८०८७२८३०६५) संपर्क साधावा. असे प्रकल्प अधिकारी, एमसीईडी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## मोटारसायकल चोरीचे रॅकेट उघड; १४ मोटर सायकली जप्त, दोघे अटकेत



**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन/प्रतिनिधी**

भोकरदन शहरासह तालुका भरात सध्या मोटारसायकल चोरीचे प्रमाण वाढले असल्याने पोलीस अधिक्षक जालना यांच्या आदेशाने मोटारसायकल चोरीबाबत विशेष लक्ष देवून गुप्त पणे माहीती काढणेकरीता पो.नि किरण बिडवे यांच्या मार्गदर्शनाखली पोउपनि पवन राजपुत यांचे नेतृत्वात पोलीस नाईक प्रशांत उबाळे, विकास जाधव पोलीस अंमलदार संदीप भुतेकर, गणेश पिंपळकर, अर्जुन टेकाळे, किशोर मोरे यांचे पथक स्थापन करण्यात आले. दरम्याण पोलीस ठाणे येथे मोटारसायकल चोरीबाबत गुरनं ५३०/२०२४ दाखल झाला असल्याने त्या गुन्हयाचे तपास दरम्याण किरण एम बिडवे पोलीस निरीक्षक यांना गोपनीय माहीती मिळाली की, मौजे देहेड येथे एक पल्सर मोटारसायकल होस ट्रक्टरच्या क्रमांकाची बनावट नंबर प्लेट आहे. त्यावरुन पोलीस निरक्षक श्री. किरण एम बिडवे यांनी पोउपनि राजपुत यांचे पथकास मार्गदर्शन करुन कारवाई करण्याचे सांगीतले.

त्यावरुन पोउपनि राजपुत व त्यांचे पथक माहीती घेत असतांना मौजे देहेड येथील मोसा चालक हा बाहेरगावी असल्याने त्याचेवर बरेच दिवस पहारा ठेवुन सदर ईसम प्रभाकर बावस्कर हा गावात आल्याची माहीती मिळताच पथकाने सापळा रचुन शिताफीने त्यास मोटारसाकल सह ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याचेजवळील मोटारसायकल हौस एका ट्रक्टरचा बनावट क्रमांक दिसुन आल्याने त्याबाबत त्याचेकडील पल्सर मोटारसायकल ही करंजगांव ता. भोकरदन येथील अमोल नाना लोखंडे याचेकडुन विकत घेतली असल्याचे सांगीतले. त्यावरुन अमोल नाना लोखंडे यास तात्काळ ताब्यात घेवुन विचारपुस केली असता अमोल लोखंडे याचेकडे पोलीस ठाणे भोकरदन जि. जालना येथे दाखल असलेल्या गुरनं ५३०/२०२४ मधील युनिकॉर्न मोटारसाकल सह एक एचएफ डिलक्स मोटारसकल मिळुण आली. त्याबाबत आणखी विचारपुस करता अमोल नाना लोखंडे याने त्याचे गावातील बशीर शेख याचे मदतीने गावामध्ये चोरीच्या मोटारसायकल दिले असल्याचे सांगीतले. गावातील अमोल लोखंडे व बशीन शेख यांनी दिलेल्या चोरीच्या एकुण १४ मोटारसायकल जप्त करुन विचारपुस केली असता अमोल नाना लोखंडे व बशीर शेख यांनी सुनिल पुंजाजी दांडगे रा. वरखेडी ता.पाचोरा जि. जळगांव याने आम्हाला मोटारसायकल आणुन दिलेल्या होत्या.

## हॉटेल कॅफे कॅनव्हासचे मोठ्या थाटात उद्घाटन



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना शहरात नवीन सुरू झालेल्या हॉटेल कॅफे कॅनव्हासचे उद्घाटन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या हस्ते मोठ्या थाटात उद्घाटन करण्यात आले.यावेळी उद्घाटन प्रसंगी बोलतांना माजी आमदार चव्हाण म्हणाले की ग्रामीण भागातील युवकांनी नौकरीच्या मागे न लागता स्वतः व्यवसायाकडे वळले पाहिजे. व्यवसाय छोटा असो किंवा कोणताही असो त्यामध्ये मेहनत व सातत्य ठेवले पाहिजे. हॉटेल कॅफे कॅनव्हासचा व्यवसाय ग्रामीण भागातील तरूणांनी सुरू केला ही अत्यंत आनंदाची बाब आहे असे हॉटेल कॅफे कॅनव्हासचे उद्घाटन प्रसंगी माजी आमदार चव्हाण बोलत होते.या उद्घाटन प्रसंगी राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हा कार्याध्यक्ष किशोर सवडे, तालुका कार्याध्यक्ष समाधान राठोड , सी.ए.गोविंदराव धांडे, गोविंदराव देशमुख, विष्णू देशमुख, कृषी सेवक पऊळ सर, कृषी सहायक लोंढे , कॅफे कॅनव्हासचे मालक समाधान देशमुख व गजानन जाधव यांच्या सह गांवकरी व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## दारूसाठी पैसे न दिल्याने दिले घर पेटवून, पती विरुध्द पत्नीने केली पोलिसांत तक्रार

**तभा वृत्तसेवा**
**माहोरा/प्रतिनिधी**

जाफ्राबाद तालुक्यांतील माहोरा येथील गोसावी वाडीतील हात वर व मोलम मजुरी काम धंदा पोट भरून सुखी संसार करित असलेले गोसावी वाडीतील पती आरोपी दिनेश देवगिर लावडकर यांने दारू पेऊन आल्यामुळे पत्नी गौरी दिनेश लावडकर, यास विचार फुस करूण्यास तुम्ही दारु पिऊन आले आहे का? तु ,मला परत दारु पिण्यास पैसे दे,पत्नी गौरी लावडकर हिने पती दिनेश लावडकर यास पैसे देण्यास नकार दिल्याने यातिल पती आरोपी यांने रांग आनावर आल्याने स्व:ताचे घर दार पेट्टुन देऊन पळ काढला?त्यामुळे पती, पत्नी ,च्या एक क्षणांत पती ,पत्नीत,च्या वाद विकोपाला गेला आणि सुखी संसार दारू मुळे सुखी संसाराची राख रागोळी झाली ! त्यामुळे पत्नी गौरी लावड कर हिने चक्क जाफ्राबाद पोलिस ठाणे ला पती विरूध्द तक्रार देऊन आरोपी पती दिनेश लावड कर विरुध्द गु.रं नं.२०२४ कलम ३२४, (४ ),११५, ३५२, दाखल झालेले असुन आरोपी फरार असल्यांचे समजते, तसेच आरोपी हा सतत दारु पिऊन बायकोस मारहाण करतो ! तसेच मुलाचे शाळेचे कागद पत्र, अधार, कार्ड, कपडे, अन्न धान्य, भांडे, वैगरे संसार उपायोगी वस्तु जळुन खाक झालेले आहे. तसेच काही रोख रक्कम सुध्दा दारू पिणाऱ्या पतीने , बायकोने घरात पैसे असुन दारू पिण्यास पैसे न दिल्याने घरास आग लाऊन त्या ठिकाणा वरुन पळ काढला, म्हणुन सदरील आरोपी दिनेश लावडकर याचा शोध घेत आहे.

गोसावी वाडील दारू चे दुकान बंद करा गौरी लावड कर,ची, मांगणी!

माहोरा येथील गोसावी वस्ती असुन या गोसावी वाडीत देशी , दारूचे अवैध प्रकारे दारू विक्री केल्या जाते? त्यामुळे बऱ्याच ठिकाणी अवैध दारू विक्री केल्या जात आहे. त्यामुळे महिला चे संस्कार उघडयावर पडत आहे. संबंधीत माझे पती दिनेश लावडकर विरुध्द कडक कार्यवाही करून अटक करावे व माझ्या संसाराची राख रागोळी झालेले आहे. व माझे घरादार उघडयावर संसार आहे व माझे दोन लाख रुपये नुकसान झालेले आहे. मला तातडीने नुकसान भरपाई द्यावी, व माहोरा येथे अवैध देशी दारू विक्री होत असलेली तातडीने बंद करावी अशी मांगणी जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे कडे गौरी लावडकर, यांनी केली आहे.

## मदत करण्याचे औदार्य मात्र एखाद्या कडेच असते– जिल्हाप्रमुख अंबेकर



**तभा वृत्तसेवा**
**जालना/प्रतिनिधी**

जालना शहरातील प्रसिध्द उद्योजक घनश्याम गोयल यांनी शांतीनिकेतन विद्या मंदिर या शाळेस सदिच्छा भेट दिली असता त्यांच्या वाढदिवसांचे औचित्य साधून शिवसेना जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी त्यांचा यथोचित सत्कार केला. तसेच त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने शाळेतील अनेक गरजु विद्यार्थ्यांना शालेय गणवेश व साहित्याचे वाटप करण्यात आले.

यावेळी घनश्याम खाकीवाले, बाला परदेशी, संस्थेचे संचालक अश्विन अंबेकर यांची उपस्थिती होती. यावेळी जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर म्हणाले की, पैसा धन अनेकांकडे मोठ्या प्रमाणावर आहे. परंतु त्याच्यातून गरजवंतांना मदत करण्याचे औदार्य उद्योजक घनश्याम गोयल यांच्यासारख्या एखाद्याकडेच असते. जालना शहरातील अनेक सामाजिक उपक्रम क्रिडा स्पर्धा यासह अनेक गरजवंतांना मदत करण्याचे काम घनश्याम गोयल करीत असतात. त्यांच्यासारखे शांत संयमी व उमदं व्यक्तीमत्व हे आपल्या शहराचे वैभवच आहे. घनश्याम गोयल यांनी आपल्या उद्योगाच्या माध्यमातून हजारो तरुणांना रोजगार उपलब्ध करुन दिला. याप्रमाणे आपल्या उत्पन्नातील किमान १० टक्के वाटा सामाजिक उपक्रमासाठी प्रत्येकाने खर्च केल्यास मोठ्या प्रमाणावर गरजुंना मदत होईल, असेही अंबेकर बोलतांना म्हणाले. यावेळी उद्योजक घनश्याम गोयल यांनी शांतीनिकेतन विद्या मंदिर शाळेच्या प्रगतीचे व शैक्षणिक कार्याचे कौतुक केले. तसेच विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून ती साकारण्यासाठी सदैव प्रयत्नशिल रहावे, असे आवाहन गोयल यांनी केले.

जालना शहरात गुणवत्तापुर्ण शिक्षण देणार्या परंतु आर्थिक दृष्टीने सक्षम नसलेल्या काही शाळांत विद्यार्थ्यांना बसण्यासाठी बाकड्यांची उपलब्धता नसल्याने विद्यार्थ्यांची परवड होत आहे. ही बाब त्यांच्या कानावर घातली असता त्यांनी शहरातील अशा शाळांना बाकांची उपलब्धता करुन दिली, असे घनश्याम गोयल हे संवेदनशिल व्यक्ती असल्याचे अंबेकर यांनी सांगून त्यांना दिर्घयुष्याच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांसह शिक्षकांची उपस्थिती होती.

# अवैध वाळू वाहतुकीचे टिप्पर आणखी किती बळी घेणार!

## महसूल विभाग व वाळूमाफीयांची मिली भगत तर नसेल ना? असा सवाल होतोय उपस्थित

**तभा वृत्तसेवा**
**मंठा/प्रतिनिधी**

**मंठा शहरासह तालुक्यामध्ये विनापरवाना अवैधरित्या मुरूम व वाळूचे उत्खनन करून राजुरस्पने विक्री केली जात आहे. यासह अवैद्य वाळू वाहतूक करण्यासाठी विना नंबरच्या वाहनांचा सरास वापर केला जात आहे. आदित्य वाळू वाहतूक रोखण्यासाठी व विना नंबरच्या वाहनावर कार्यवाही करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी माजी बाजार समिती संचालक तथा ज्येष्ठ समाजसेवक प्रदीप वाघमारे यांनी प्रतिनिधीशी बोलतांना केली.**

मंठा शहरासह तालुक्यामध्ये खुलेआम अवैद्य मुरुम तसेच वाळू उत्खनन व विक्रीचा गोरख धंदा वाळू माफियांनी चालवला असल्याचे दिसून येत आहे. दोन दिवसापूर्वी हारून इब्राहिम कुरेशी यांचा जालना रोडवर पेट्रोल पंपासमोर अवैध वाळू वाहतुकीच्या टिप्परने धडक दिल्याने मृत्यू झाला होता. मंठा तालुक्यात अवैध वाळू वाहतुकीचे टिप्पर आणखी किती जणांचे बळी घेणार ? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेतून विचारला जात आहे. वाळू माफियांना महसूल विभागाचे अभय मिळत असल्याची चर्चा नागरिकांतून होत आहे. अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीवर जिल्हाधिकाऱ्यांनी कार्यवाही करावी अशी मागणी नागरिकांतून जोर धरत आहे. मंठा शहरापासून जवळच असलेल्या गारपिराच्या माळावरून रात्रंदिवस अवैध मुरूमाचा उपसा माफिया करत आहेत.जेसीबीच्या साह्याने उत्खनन करून टिप्परद्वारे मंठा शहराच्या परिसरामध्ये मुख्य रस्त्यावरून खुल्याआमपणे वाहतूक केली जात आहे. यासह मंठा तालुक्यातील वाळू घाटावरून अवैधरीत्या वाळूचे उत्खनन करून चढ्या दराने मंठा शहरांमध्ये दिवस रात्र वाळू पुरवठा केला जात आहे. याकडे महसूल विभागाचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे. शहरांमध्ये खुलेआम वाळू व मुरुमाचे टिप्पर भरून जातात परंतु यावर महसूल विभागासह अन्य कुठलाही विभाग कार्यवाही करत नाही. सुसाट वेगाने टिप्पर चालक वाहने चालवतात. त्यामुळे सर्वसामान्य लोकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे.

मंठा शहरासह परिसरामध्ये वाळू माफियाकडून तहसीलदार, मंडळ अधिकारी व महसूल मधील काही कर्मचारी हाताशी धरून मुरूम व वाळू विक्रीचा गोरख धंदा राजरोसपणे करीत असतात. यामुळे शासनाचा कोट्यावधीचा महसूल बुडत आहे. या सर्व बाबीकडे जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची मागणी पर्यावरण प्रेमीतून होत आहे.

## टॉप २०० सेल्फ-मेड एंटरप्रेन्योर्सची यादी केली जाहीर

पुणे : आईडीएफसी फर्स्ट प्राइवेट बँकिंग आणि हुरुन इंडिया ने 'आयडीएफसी फर्स्ट प्रायव्हेट आणि हुरुन इंडियाज टॉप २०० सेल्फ-मेड एंटरप्रेन्योर्स ऑफ मिलेनिया २०२४'ची दुसरी आवृत्ती लॉन्च केली आहे. हि सन २००० नंतर स्थापन झालेल्या भारतातील २०० सर्वात महत्वाच्या कंपन्यांची यादी आहे. या कंपन्यांना त्यांच्या मूल्यानुसार रँक केले जाते, जे सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल आणि असूचीबद्ध कंपन्यांचे मूल्यांकन म्हणून परिभाषित केले जाते. या यादीत प्रवेश करण्याची कट-ऑफ तारीख २५ सप्टेंबर २०२४ होती. ही यादी केवळ भारतातील मुख्यालय असलेल्या कंपन्यांचा संदर्भ देते. (सरकारच्या मालकीच्या कंपन्या आणि परदेशी कंपन्यांच्या उपकंपन्या यामध्ये समाविष्ट नाहीत).

## फ्लिपकार्टमुळे महिलांचे लखपती दीदी होण्यासाठी सक्षमीकरण

छत्रपती संभाजीनगर : गोवा राज्य ग्रामीण उपजीविका अभियान (जीएसआरएलएम) ने भारतातील आघाडीच्या देशांतर्गत ई-वाणिज्य प्लॅटफॉर्म असलेल्या फ्लिपकार्टसोबत भागीदारी केली असून त्याद्वारे पणजीतील स्वयंसहाय्यता समूहांमधील महिला उद्योजकांचे सक्षमीकरण केले जाईल. या सहयोगाचा भाग म्हणून या कुशल महिलांनी तयार केलेली उत्पादने फ्लिपकार्टच्या ऑनलाइन मार्केटप्लेसवर प्रदर्शित करून विकली जातील. हा उपक्रम सुरू करण्यासाठी मंगळवारी एका कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या निमित्ताने बोलताना गोव्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांचे विकसित भारताचे स्वप्न सत्यात उतरवण्याची ही अत्यंत योग्य वेळ असल्याचे मत व्यक्त केले. असे उपक्रम लक्ष्याधारित प्रशिक्षण कार्यक्रमांद्वारे पंतप्रधानांच्या स्वप्नातून साकारलेली लखपती दीदी मोहीम यशस्वी करण्यासाठी उपयुक्त ठरतील असे ते म्हणाले.

## ५० गोल्डन रूल्स ऑफ लाइफ पुस्तकाचे प्रकाशन

पुणे : सुप्रसिद्ध लेखक आणि लाइफ कोच संतोष जोशी यांच्या ५० गोल्डन रूल्स ऑफ लाइफ या पुस्तकाचे पुणे येथील फर्ग्युसन कॉलेज मध्ये एनबीटी द्वारे आयोजित बुक फेअरमध्ये दिमाखात प्रकाशन करण्यात आले. संध्याकाळी ६ ते ७ या वेळेत झालेल्या या कार्यक्रमात पुस्तकप्रेमी आणि मान्यवरांची मोठी उपस्थिती होती.कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून प्रसिद्ध कवि, कथा लेखक, चित्रपट निर्माते आणि दिग्दर्शक रामदास फूटाने यांची उपस्थिती होती. आपल्या भाषणातून त्यांनी या पुस्तकाचे महत्त्व अधोरेखित केले आणि सांगितले की, हे पुस्तक वाचकांना जीवनांना सकारात्मक दृष्टिकोन आणि प्रेरणा देणारे असेल.

## महाराष्ट्रातील सातारा येथे रस्तासुरक्षा जागरुकता मोहिम

सातारा : रस्ता सुरक्षेप्रती सुरू असलेल्या कटिबद्धतेचा भाग म्हणून होंडा मोटरसायकल अँड स्कूटर इंडिया (एचएमएसआय)ने आज सातारा, महाराष्ट्र येथे रस्ता सुरक्षा जागरूकता मोहिमेचे आयोजन केले. या उपक्रमाने महाराजा सयाजीराव विद्यालय अँड ज्युनिअर कॉलेजमधील २८०० हून अधिक विद्यार्थी व कर्मचारीवर्गामध्ये जनजागृती केली, ज्यामधून तरूणांना रस्त्यावर जबाबदारीने वागण्याबाबत प्रेरित करण्याप्रती एचएमएसआयची समर्पितता अधिक दृढ झाली. सुरक्षित रस्ता संस्कृतीला आकार देण्यामध्ये तरूण बजावणाऱ्या महत्त्वपूर्ण भूमिकेला ओळखत एचएमएसआयच्या मोहिमेचा सर्वसमावेशक व परस्परसंवादात्मक प्रोग्राम्सच्या माध्यमातून रस्त्यावर सुरक्षितता बाळगण्याची सवय बिंबवण्याचा मनसुबा होता. शाळा, महाविद्यालये आणि सरकारी व गैर-सरकारी संस्थांमध्ये असे उपक्रम नियमितपणे राबवत एचएमएसआय रस्त्यावरील अपघात मोठ्या प्रमाणात कमी करण्याचा आणि रस्त्यावर जबाबदारीने वागण्याच्या संस्कृतीला चालना देण्याचा प्रयत्न करते. या मोहिमा रस्ता सुरक्षा जनजागृतीसाठी गरजेची पूर्तता करतात आणि विशेषत: तरूण राइडर्समध्ये जबाबदार ड्रायव्हिंग सवयी बिंबवण्याचा प्रयत्न करतात.

## आजच्या काळात पालकत्वाचा वस्तुपाठ आहे

माताने किंवा पित्याने एकट्याने आपल्या अपत्यांचे संगोपन करणे ही आपल्याला आधुनिक काळातील समस्या वाटते. आपल्या जोडीदाराची साथ नसताना मुलांना मोठे करण्याची जबाबदारी हे पालक आपल्या एकट्याच्या खांद्यांवर वाहात असतात. पण ही जबाबदारी केवळ आजच्या काळातील पालकच घेत नाहीयेत, तर आपल्याला कल्पना नाही, इतक्या पूर्वी देखील अशी उदाहरणे सापडतात. कित्येक शतकांपूर्वी अयोध्येची साम्राज्ञी असणाऱ्या सीतेने ही जबाबदारी निभावली आहे आणि सिंगल पॅरेंटिंगचा एक आदर्श वस्तुपाठ घालून दिला आहे. सोनी सबवरील 'श्रीमद् रामायण' मालिकेत दाखविल्याप्रमाणे, सीतेचा प्रवास हा सोशिकतेचा, ताकदीचा, स्वातंत्र्याचा प्रवास आहे आणि अनेक प्रतिकूलतांना तोंड देऊन तिने आपल्या मुलांचे उत्तम संगोपन केले आहे.

## 'पुष्पा इम्पॉसिबल'मध्ये पुष्पाने बादशाहला थप्पड मारली

पुष्पा (करुणा पांडे) या धडाडीच्या स्त्रीची प्रेरणादायक गोष्ट सांगून सोनी सब वरील 'पुष्पा इम्पॉसिबल' मालिका प्रेक्षकांची लाडकी मालिका बनली आहे. पुष्पा ही अत्यंत कणखर आणि खंबीर स्त्री आहे आणि आयुष्यातील प्रत्येक आव्हानाला ती हिंमतीने तोंड देते. अलीकडेच प्रेक्षकांनी पाहिले आहे की, गुन्हेगारी वृत्तीच्या काही किशोरवयीन मुलांना सुधारण्याची जबाबदारी पुष्पाने स्वीकारली आहे. कारण तिचे ठाम मत आहे की, प्रेम आणि करुणेने त्यांच्या जीवनाचा कायापालट होऊ शकतो. एका घटनेत दीप्ती (गरिमा परिहार) कडून एक ऑफिस फाइल घेण्यासाठी आलेला बद्रीनाथ (नयन भटनागर) म्हणजे स्टॅपलर वरुणचे (आर्या धर्मराज कुमार) पाकीट चोरतो. पण पुष्पा त्याचा छडा लावते आणि बद्रीनाथला समजावते की, चोरी करणे हे पाप आहे. त्यापेक्षा त्याने काहीतरी चांगले काम करावे असा सल्ला ती त्याला देते.

## गीतांजली मिश्रा स्वत:ला नवीन कार गिफ्ट केली!

एण्ड टीव्हीवरील मालिका 'हप्पू की उलटन पलटन'मध्ये राजेशची भूमिका साकारणाऱ्या गीतांजली मिश्रा यांनी नुकतेच स्वत:ला स्पेशल गिफ्ट देत वाढदिवस साजरा केला. उत्साही ऊर्जा व अद्वितीय कॉमिक टाइमिंगसाठी ओळखल्या जाणाऱ्या गीतांजली यांनी दहा वर्षांनंतर स्वत:साठी नवीन कार खरेदी करत वाढदिवस साजरा करण्याचे ठरवले. या स्लीक, आधुनिक कारमधून वर्षानुवर्षे त्यांचे स्वत:वरील प्रेम, अथक मेहनत आणि चिकाटी दिसून येते. या अर्थपूर्ण गिफ्टबाबत सांगताना गीतांजली ऊर्फ राजेश म्हणाल्या, ''यंदाचा वाढदिवस माझ्यासाठी अत्यंत विशेष आहे. दहा वर्षांपूर्वी मी माझ्या बचतीमधून माझी पहिली कार खरेदी केली होती आणि आणि दहा वर्षांनंतर मी नवीन कार खरेदी केली आहे, जी आरामदायीपणा व लक्झरी देते.

## हंगामाकडून क्रिप्टोकरन्सी आणि गुन्हेगारीचे काळे रहस्य उलगडणारी पिरॅमिड ही नवी थ्रिलर वेब सिरीज सादर

छत्रपती संभाजीनगर , १९ डिसेंबर २०२४ : भारतातील आघाडीचे डिजिटल मनोरंजन मंच असलेले हंगामा ओटीटी क्रिप्टोकरन्सी आणि गुन्हेगारीच्या गूढ जगात प्रेक्षकांना गुंतवून ठेवणारी पिरॅमिड ही आपली नवीन ओरिजिनल मालिका सादर करत आहे. विशेषत्वाने हंगामा ओटीटीवरून स्ट्रीम होणारी ही वेब सिरीज रहस्य, रोमांच आणि थरारक कथानकाने प्रेक्षकांना खिळवून ठेवण्याची हमी देते. हेली शाह, रोहन मेहरा, हर्षद अरोरा, करण शर्मा आणि क्रिसन बरेटो या प्रतिभावान कलाकारांच्या सहभागाने सजलेली ही वेब सिरीज अर्जुन बॅनर्जी यांच्या खळबळजनक हत्येचा तपास उलगडते. अर्जुन हा पिरॅमिड नावाच्या नाविन्यपूर्ण क्रिप्टोकरन्सी प्लॅटफॉर्मचा निर्माता आहे. त्याच्या अचानक मृत्यूमुळे लाखो लोकांचे खाते ब्लॉक झाले असून उत्तरांच्या शोधात देश अस्वस्थ झालेला आहे. पत्रकार वृंदा (हेली शाह) या घटनेतील सत्य शोधण्यासाठी तपास करत असते. या तपास प्रवासात तिला फसवणुकीच्या जाळ्यातील छुपे हेतू, विश्वासघात आणि अनेक रहस्यांचा सामना करावा लागतो. तिचा सत्यशोध तिला एका धोकादायक मार्गावर नेत असतो, जिथे प्रत्येक वळणावर धोका असतो आणि प्रत्येक गोष्ट तितकी सोपी नसते जितकी ती दिसते. हंगामा डिजिटल मीडियाचे व्यवस्थापकीय संचालक नीरज रॉय म्हणाले की, क्रिप्टोकरन्सी जागतिक अर्थव्यवस्थेला नवा आकार देत असताना, ही मालिका त्याच्या गडद बाजूंवर प्रकाश टाकते आणि प्रेक्षकांना एक रोमांचक अनुभव देते.

# एमजीएमचा ४२ वा वर्धापन दिन सोहळा सोनम वांगचुक यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार संपन्न

छत्रपती संभाजीनगर, दि.१९ : महात्मा गांधी मिशनचा (एमजीएम) ४२ वा वर्धापन दिन सोहळा शुक्रवार, दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी सायंकाळी ५ वाजता शिक्षणतज्ञ आणि पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांच्या प्रमुख उपस्थितीत एमजीएम क्रिकेट स्टेडियम, एन - ६, सिडको येथे आयोजित करण्यात आला आहे. महात्मा गांधी मिशनच्या ४२ व्या वर्धापन दिनानिमित्त यावर्षी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून सायं.४ ते सायं.७ वाजेदरम्यान एमजीएम स्टेडियमवर महात्मा गांधी मिशन वर्धापन दिन सोहळा आणि 'आओ उजाला करें' हे कार्यक्रम होणार आहेत.

या वर्धापन दिन सोहळ्यास महात्मा गांधी मिशनचे अध्यक्ष कमलकिशोर कदम, उपाध्यक्ष डॉ. पी.एम.जाधव, विश्वस्त डॉ.सुधीर कदम, नितीन कदम, उज्वल कदम, एमजीएम विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.विलास सपकाळ, एमजीएम आयएचएसचे कुलगुरू डॉ.शशांक दळवी तसेच संस्थेचे विविध पदाधिकारी उपस्थित असणार आहेत.

पार्श्वभूमी आणि इतिहास : नांदेड जिल्ह्यातील 'निळा' या गावी गरीब, दुर्बल घटकांना आरोग्य सेवा देण्यासाठी वर्ष १९८२ मध्ये आरोग्य केंद्र सुरू केले. २० डिसेंबर १९८२ ला महात्मा गांधी मिशन म्हणजेच एमजीएम या संस्थेची खऱ्या अर्थाने मुहूर्तमेढ रोवली गेली आणि एमजीएम संस्थेची रीतसर नोंदणी झाली. सुरूवातीचा काळ अत्यंत कठीण होता. संस्था उभारणीसाठी लागणारे पाठबळ नव्हते किंबहुना आर्थिक पाठबळ हीच मोठी समस्या होती. तत्कालीन मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांनी कमलकिशोर कदम यांना अभियांत्रिकी महाविद्यालय सुरू करण्याचे सुचवले. यादरम्यान महाराष्ट्रात विनाअनुदानित शिक्षण संस्थासाठीचे धोरण जाहीर झाले होते. त्यामुळे खाजगी अभियांत्रिकी महाविद्यालय चालेल का? जागेची अडचण, पैशाची अडचण तरीही कमलकिशोर कदम यांनी आपली जिद्द सोडली नाही. शरदचंद्र पवार यांना महात्मा गांधी मिशन संदर्भात सत्य परिस्थिती सांगितली. त्यांनी मदतीचा हात देत स्वतः बँक गॅरंटर राहून एमजीएमला बँकेकडून अर्थसहाय्य मिळवून दिले. शरदचंद्रजी पवार यांची समर्थ साथ आणि स्नेहबंध एमजीएमच्या प्रती आजही टिकून आहे. कमलकिशोर कदम, डॉ.पी.एम. जाधव, गंगाभाऊ पाथरीकर, प्राचार्य प्रताप बोराडे, डॉ.सुधीर कदम, डॉ.नितीन कदम आणि उज्वल कदम हे एमजीएमचे आधारस्तंभ! समान ध्येयाने प्रेरित झालेली ही मंडळी एकत्र आली आणि एमजीएमने आपल्या यशस्वी प्रवासास सुरुवात केली. आज शिक्षण, सेवा आणि संशोधन हे ब्रीद घेऊन संस्था गेली ४ दशके आपली सामाजिक बांधिलकी जपत कार्यरत आहे.

कल्याणराव पाटील यांनी जागेचा प्रश्न सोडवला आणि विवेकानंद महाविद्यालय औरंगाबाद येथे एका मजल्यावर जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालय प्राचार्य प्रतापराव बोराडे यांच्या नेतृत्वात सन १९८३ मध्ये सुरू झाले. याच ठिकाणी हजारो विद्यार्थी घडवत जगभरात आपले नावलौकिक प्राप्त करणाऱ्या जेएनईसीचा प्रारंभ झाला. एक वैचारिक अधिष्ठान आणि कल्याणकारी दृष्टिकोन घेऊन संस्थेच्या विस्ताराची योजना आखली गेली. शैक्षणिक पुनर्रचनेतूनच राष्ट्रनिर्मितीचे स्वप्न साकार होऊ शकते हे आम्ही विश्वस्तांनी जाणले होते, यामुळेच उच्चतम ध्येयवाद आणि प्रचंड इच्छाशक्ती उराशी बाळगून पुढची वाटचाल सुरू झाली. या दरम्यान अनेक हात पुढे आले. विजयअण्णा बोराडे, बॅरिस्टर गांधी, सुदामअप्पा सोळंके, पांडुरंग अण्णा सोळुंके, जणार्धनदादा सोळुंके यांनी आपल्या जमिनीचे सातबारे दिले. आज जगाच्या पातळीवर सर्व सर्व ठिकाणी जेएनईसीचे विद्यार्थी विविध क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवित कार्यरत आहेत.

शिक्षण : केजी ते पीजी पर्यंतचे शिक्षण एमजीएममध्ये आज उपलब्ध आहे. जागतिक स्पर्धेत विद्यार्थी खरे उतरण्यासाठी आणि त्यांना रोजगराभिमुख, कौशल्याधारित शिक्षण देण्याचे काम संस्था गेली ४ दशके अव्याहतपणे करीत आहे. संस्थेच्या माध्यमातून आज २ विद्यापीठे कार्यरत आहेत. यामध्ये महात्मा गांधी मिशन विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर आणि एमजीएम इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थ सायन्सेस यांचा समावेश आहे. विद्यकीय विद्यापीठांतर्गत ४ वैद्यकीय महाविद्यालयासह फिजिओथेरपी, नर्सिंग, फार्मसी,बायोमेडिकल सायन्स अशी विविध महाविद्यालये आज कार्यरत आहेत. अभियांत्रिकीमध्ये छत्रपती संभाजीनगर, नांदेड, मुंबई येथील महाविद्यालयांमधून हजारो विद्यार्थी उत्तीर्ण होऊन जगभरात आपले नावलौकिक करीत आहेत. जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी मिलिंद गोडबोले, कैलास देसाई, श्रीकांत बडवे, डॉ.स्वप्नेषु बसेर या व अशा असंख्य विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर कामगिरी केली आहे. भारताच्या फेसबुकच्या सीईओपदी कार्यरत राहिलेली कार्तिगा रेड्डी ही एमजीएम नांदेड येथील अभियांत्रिकी महाविद्यलयाची विद्यार्थिनी आहे.

संस्थेच्या छत्रपती संभाजीनगर, नांदेड, मुंबई, परभणी आणि नोयडा या ठिकाणी असलेल्या विविध शैक्षणिक संकुलांमधून आजपर्यंत हजारो विद्यार्थी शिक्षण घेऊन बाहेर पडले आहेत. विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण देत असताना आज एमजीएमने आपले राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक प्राप्त केले आहे. भारत विकास ग्रुप, आयआयटी मुंबई अशा राष्ट्रीय स्तरावरील संस्थासह लीभेर अप्लायन्सेस प्रा.लि, टेनेसी विद्यापीठ, अमेरिका, आरडब्लूटीएच आखन विद्यापीठ, जर्मनी अशा विविध आंतरराष्ट्रीय संस्थासमवेत एमजीएम आज काम करीत आहे. काळाची गरज ओळखत अभियांत्रिकी शिक्षणापासून सुरू झालेला एमजीएमचा प्रवास आज पत्रकारिता, व्यवस्थापन, वाणिज्य, संगणक, माहिती तंत्रज्ञान, हॉटेल मॅनेजमेंट, जैवतंत्रज्ञान, डिझाईन, फिल्म आर्ट, विज्ञान, कला, सामाजिक शास्त्र, भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, भूविज्ञान,पर्यावरणशास्त्र, फार्मसी, लॉ, फोटोग्राफी, फॉरेन्सिक सायन्स, कॉस्मेटिक टेक्नॉलॉजी, फॉरेन लँग्वेजेस, सामाजिक विज्ञान, गांधी तत्त्वज्ञान, बुद्ध तत्त्वज्ञान, क्रीडा, नाट्य व संगीत इथपर्यंत येऊन पोहचला आहे.

आजघडीला एमजीएम अंतर्गत १०३ शाळा आणि महाविद्यालये कार्यरत असून विविध संस्थांमध्ये सुमारे ३५००० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. आजपर्यंत १०५००० विद्यार्थ्यांनी आपले शिक्षण पूर्ण केले असून विविध क्षेत्रात आपले योगदान देत आहेत. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध संस्थांशी १५५ सामंजस्य करार करण्यात आलेले आहेत.

आरोग्य : आपली सामाजिक बांधिलकी जपत एमजीएम रुग्णालय गेल्या ४ दशकांपासून रुग्णांसाठी आपले योगदान देत आहे. मुंबई आणि छत्रपती संभाजीनगर येथे गरीब आणि सामान्य नागरिकांना अत्यल्प दरात सर्व अत्याधुनिक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या रुग्णालयांच्या माध्यमातून हजारो रुग्णांनी आजवर उपचार घेतले आहेत. वैद्यकीय शिक्षणासोबतच आरोग्य सेवेचा मंत्र इथे जपला जातोय. आज देशभरातील विद्यार्थी वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी एमजीएम वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेत आपले शिक्षण पूर्ण करीत आहेत.

एमजीएम अंतर्गत ४ वैद्यकीय महाविद्यालये आणि ५ सुपर स्पेशालिटी रुग्णालये आज कार्यरत आहेत. या माध्यमातून अवयवदान, नेत्रज्ञान, किडनी ट्रान्सप्लांट, कॅन्सर रिसर्च, अत्याधुनिक फिजिओथेरपी सेंटर, रोबोटिक सर्जरी, एन्डोस्कोपी, रोबोटिक सर्जरी,कॉर्डिऑलॉजी, टेस्ट ट्यूब बेबी सेंटर या अत्यंत महत्वपूर्ण सुविधांसह अनेक आधुनिक उपचार पद्धतींचा रुग्ण आज येथे लाभ घेत आहेत. त्याचप्रमाणे सध्याच्या धक्काधकीच्या जीवनात निसर्गोपचार हे वरदान ठरले आहे. संस्थेच्या 'आरोग्यम्' या निसर्गोपचार केंद्राच्या माध्यमातून सर्व सोयींनी परिपूर्ण असे निसर्गोपचार केले जातात. या केंद्राच्या माध्यमातून योगा, प्राणायाम, पंचकर्म, अँक्युप्रेशर, आदी उपचार केले जातात. नैसर्गिक तत्वांचा वापर करून निरोगी जीवनशैली समृध्द करण्यावर या केंद्रात सातत्याने प्रयत्न केले जातात. एमजीएममध्ये फिजीओथेरपी आणि नर्सिंग महाविद्यालयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण दिले जात आहे. एमजीएम रुग्णालयात तृतीयपंथीयांची विशेष काळजी घेतली जात असून आवश्यकतेप्रमाणे याठिकाणी त्यांच्यासाठी स्वतंत्र राखीव खाटांची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

# एनआयआयटी फाऊंडेशनच्या भागीदारीत इंडस टॉवर्सची 'डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन व्हॅन' लातूर येथे सुरू

लातूर १९ डिसेंबर : जगातील सर्वात मोठ्या टेलिकॉम इन्फ्रास्ट्रक्चर कंपन्यांपैकी एक असलेल्या इंडस टावर्सने, त्यांच्या सीएसआर उपक्रमांतर्गत एनआयआयटी फाउंडेशनच्या भागीदारीत महाराष्ट्रातील लातूरमध्ये 'डिजिटल ट्रांसफॉर्मेशन व्हॅन' (डीटीव्ही) सुरू केली आहे. या नाविन्यपूर्ण उपक्रमाचा उद्देश लातूरमधील ग्रामीण आणि शहरी झोपडपट्ट्या असलेल्या समुदायांमध्ये डिजिटल संसाधनांमध्ये प्रवेश वाढवणे आहे.



डीटीव्हीचे उद्घाटन श्री प्रमोद सपकाळे, संचालक (राज्य समन्वय), महाराष्ट्र एलएसए, दूरसंचार विभाग, पुणे आणि आणि श्री .सोमनाथ रेड्डी, जिल्हा नियोजन अधिकारी, लातूर यांनी इतर प्रमुख पाहुण्यांसह केले. एक वर्षाच्या कालावधीत, डीटीव्ही लातूर आणि धाराशिवमधील १२ गावांमध्ये पोहोचेल आणि १२ वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या मुलांना, तसेच तरुण, प्रौढ आणि वृद्धांना डिजिटल शिक्षण आणि संसाधने पुरवेल.

इंडस टावर्सच्या प्रमुख सीएसआर कार्यक्रम सक्षम अंतर्गत, डिजिटल ट्रांसफॉर्मेशन व्हॅन (डीटीव्ही) हे २१-सीटर, सौर उर्जेवर चालणारे वाहन आहे ज्यामध्ये इंटरनेटचा वापर, नवीनतम संगणक, प्रिंटर, सॉफ्टवेअर आणि ई-लर्निंग साधने आहेत. यामध्ये घराघरात मोफत डिजिटल शिक्षण देण्यासाठी लाइव्ह मॉनिटरिंग क्षमता देखील आहे. सहभागी लोकांनाही बेसिक आयटी कौशल्य, सायबरसुरक्षा, इंटरनेट ऑफ थिंग्स (खेढ) आणि आर्थिक साक्षरता यासारख्या क्षेत्रांमध्ये प्रमाणपत्र मिळवता येईल. त्याच्या शैक्षणिक ऑफर व्यतिरिक्त, डीटीव्ही हे विशिष्ट समुदाय जागरूकता सत्रे आणि सामूहिक साक्षरता उपक्रम राबविण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करते. सर्व कार्यक्रम एनआयआयटी फाउंडेशनच्या प्रशिक्षकांद्वारे आयोजित केले जातात, जे समुदायाच्या गरजेनुसार अतिरिक्त सहाय्य देखील पुरवतात.

भारत सरकारच्या डिजिटल साक्षरता मिशनशी संरेखित होऊन लोकांमध्ये डिजिटल कौशल्ये वाढवणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे. या प्रकल्पात महिलांसाठी आणि वयोवृद्धांसाठी विशेष बॅचेस असतील, तसेच सरकारी शिक्षक, पोलिस अधिकारी, रस्त्यावर विक्री करणारे, मुले आणि संबंधित समुदायांसाठी विशेष कार्यक्रम देखील उपलब्ध असतील, जेथे विविध लक्ष्य गटांना लक्षात घेऊन जागरूकता सत्रे आयोजित केली जातील. 'टिकाऊ डिजिटल पायाभूत सुविधा आणि सेवा द्वारे जीवन बदलण्याच्या इंडस टॉवर्सच्या मिशनच्या अनुषंगाने, डिजिटल ट्रांसफॉर्मेशन व्हॅन (डीटीव्ही) विविध पार्श्वभूमीतील व्यक्तींना आवश्यक आणि मागणीनुसार कौशल्यांनी सुसज्ज करते. यामध्ये डिजिटल साक्षरता, बेसिक आयटी शिक्षण आणि सायबरसुरक्षा समाविष्ट आहेत, ज्यामुळे सर्व वयाच्या विद्यार्थ्यांना सक्षम बनवले जाते आणि त्यांच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक विकासास चालना मिळते.

लाँच दरम्यान, श्री प्रमोद सपकाळे, संचालक (राज्य समन्वय), महाराष्ट्र एलएसए, दूरसंचार विभाग, पुणे म्हणाले, डिजिटल ट्रांसफॉर्मेशन व्हॅन सुरू केल्याबद्दल मी इंडस टावर्स आणि एनआयआयटी फाउंडेशनचे मनापासून अभिनंदन करतो. हा उपक्रम डिजिटल विभागातील अंतर कमी करण्यासाठी आणि समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत डिजिटल शिक्षणाचा समान प्रवेश सुनिश्चित करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. हे डिजिटलदृष्ट्या सक्षम राष्ट्र निर्माण करण्याच्या भारत सरकारच्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे, जे शहरी आणि ग्रामीण लोकसंख्येमधील अंतर कमी करते आणि नाविन्य, विकास आणि टिकाऊ प्रगतीची संस्कृती तयार करते. श्री. सोमनाथ रेड्डी, जिल्हा नियोजन अधिकारी, लातूर म्हणाले, हा प्रकल्प अधिक समावेशक समाज निर्माण करण्यासाठी एक सामूहिक समर्पणाचे प्रतीक आहे, जिथे प्रत्येकजण, त्यांचा पार्श्वभूमी किंवा परिस्थिती काहीही असो, मौल्यवान कौशल्ये मिळवू शकतो आणि चांगले भविष्य घडवू शकतो. अत्याधुनिक संसाधने आणि प्रशिक्षण वंचित समुदायांच्या दारापर्यंत आणून, व्हॅन लोकांना आजच्या तंत्रज्ञान-चालित जगात यशस्वी होण्यासाठी आवश्यक कौशल्यांनी सुसज्ज करते.

श्री सुकेश थरेजा, सर्कल सीईओ, महाराष्ट्र, इंडस टावर्स लिमिटेड डीटीव्ही कार्यक्रमाबद्दल बोलताना म्हणाले, इंडस टावर्समध्ये, आम्हाला तंत्रज्ञानाच्या परिवर्तनीय शक्तीवर विश्वास आहे. डीटीव्ही कार्यक्रम हे डिजिटल विभागातील अंतर कमी करण्यासाठी आणि समुदायांना, विशेषतः महिलांना आणि तरुणांना डिजिटल युगासाठी आवश्यक कौशल्यांसह सक्षम बनवण्याच्या दिशेने आमचे एक पाऊल आहे. त्यांच्या गरजा पूर्ण करणारे अभ्यासक्रम ऑफर करून, आम्ही डिजिटल विभागातील अंतर कमी करण्यास आणि वास्तविक संधी निर्माण करण्यास मदत करत आहोत. हा उपक्रम राष्ट्रीय डिजिटल साक्षरता मोहिमेशी (एनडीएलएम) तंतोतंत जुळलेला आहे आणि हे सर्व लोकांना आजच्या डिजिटल जगात यशस्वी होण्यासाठी आवश्यक कौशल्ये मिळवून देण्याबद्दल आहे.

सुश्री चारू कपूर, कंट्री डायरेक्टर, एनआयआयटी फाउंडेशन म्हणाल्या, इंडस टावर्ससोबत आमच्या सहकार्यामुळे आम्हाला प्रभावी कार्यक्रम राबविण्यात मदत मिळाली आहे. महाराष्ट्रातील लातूरमध्ये डीटीव्ही लॉन्च करून, आम्ही विविध वर्गांतील लोकांना आवश्यक डिजिटल, आर्थिक आणि आयटी कौशल्ये प्रदान करण्याचे उद्दिष्ट ठेवत आहोत, जे टिकाऊ समुदाय विकासासाठी महत्त्वाचे ठरतील.

२०१८ मध्ये लॉन्च झालेल्या डीटीव्हीने आतापर्यंत दिल्ली, देहरादून (उत्तराखंड), भोपाळ (मध्यप्रदेश), सूरजपूर (छत्तीसगड) आणि रांची (झारखंड) मधील विविध समुदायांमध्ये आणि गावांमध्ये भेट दिली आहे. हा कार्यक्रम १२ वयाच्या वयानंतर विविध पार्श्वभूमीतील समुदाय सदस्यांना डिजिटल साक्षरता देईल. यामध्ये मुले, महिलां, स्वयंसेवी गट, गृहिणी, कंपन्यांमध्ये काम करणारे एंट्री-लेव्हल कर्मचारी, शेतकरी आणि प्रौढ यांचा समावेश आहे.

# उद्योजकांनी घेतले शेअर मार्केटचे धडे

वाळूज महानगर (प्रतिनिधी):उद्योजकांच्या मसिआ संघटनेच्या वतीने लघु व मध्यम उद्योगांच्या विकासाला चालना देण्यासाठी तसेच मुख्य बाजारपेठेत आयपीओच्या प्रक्रियेबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी चर्चासत्राचे मंगळवारी मोरे चौकातील मसिआच्या सभागृहात आयोजन करण्यात आले होते. या चर्चा सत्रात उद्योजकांना शेअर मार्केट विषयी मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी सीए पीयूष बजाज, विघ्नेश पालकर, रोहित जॉयसर व चेतन भुतडा यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उद्योजकांना मार्गदर्शन केले.

बजाजनगरातील मसिआ सभागृहामध्ये उद्योजकांची आर्थिक भरभराट करण्याच्या उद्देशातून तसेच त्यांच्या शेअर मार्केट, आयपीओ यासंदर्भातील माहितीमध्ये भर टाकण्याच्या उद्देशातून या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. मार्गदर्शकांनी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशनच्या माध्यमातून आयपीओ मसिआ कार्यालयात उद्योजकांना मार्गदर्शन करताना सीए विघ्नेश पालकर. आणि मुख्य बाजारपेठ, आयपीओ प्रकियांची समज, नियामक अनुरूपता आणि कायदेशीर बाबी, लघु व मध्यम उद्योगांच्या विकासासाठी आर्थिक फायदे व संधी याबाबत मार्गदर्शन केले. याप्रसंगी मसिआचे अध्यक्ष चेतन राऊत, उपाध्यक्ष अर्जुन गायकवाड यांच्या कल्पनेतून सदरील चर्चासत्राचे आयोजन करण्यात आल्याने सर्वांनी दोघांचे कौतुक केले. याप्रसंगी सचिव राजेश मानधनी, रमाकांत पुलकुंडवार, प्रीतिश चटर्जी, मनिष अग्रवाल, मंगेश निदूरकर, शिवप्रसाद जाजू, हरिश्चंद्र पठाडे, दिगंबर नाईक, जनार्दन औताडे, राजेंद्र चौधरी, सचिन गायके, सर्जेराव साळुंके, सुरेश खिल्लारे, कमलाकर पाटील, प्रल्हाद गायकवाड, तुकाराम पोटले, एस. डी. वर्मा, प्रणव भारद्वाज, रुपेश बाहेती, मनोज शिरसाट आदी उद्योजकांची उपस्थिती होती.

पंजाब एण्ड सिंध बैंक
PUNJAB & SIND BANK
(भारत सरकारचा उपक्रम)
मुंबई अंचल

जागेची आवश्यकता

शाखा उघडणे / स्थलांतरित करण्यासाठी निम्न परिसरात तळमजल्यावरील जागा किमान १५ वर्षांसाठी भाडेपट्टीवर घेण्यास बँक इच्छुक आहे.

| शाखेचे नाव व परिसर | चटई क्षेत्र चौ.फूट |
|---|---|
| जालना शहर, जि. जालना, महाराष्ट्र | १०००-१२०० |

इच्छुक पक्षांकडून दोन वेगवेगळ्या लिफाफ्यांमध्ये निर्धारित नमून्यात तांत्रिक व आर्थिक बोलीच्या निविदा मागविण्यात येत आहेत. दोन वेगवेगळ्या लिफाफ्यांमध्ये मोहोरबंद निविदा जमा करण्याची अंतिम तारीख २ जानेवारी २०२५ आहे.

अधिक तपशीलाकरिता बँकेच्या वेबसाइट www.punjabandsindbank.co.in ला भेट द्या.

आंचलिक प्रबंधक, मुंबई

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

कि.दि.अर्ज क्र.५८८/२०२४

पु-ता. ६/१/२०२५

अर्जदार : १) कृष्णाबाई भ्र. कारभारी पानकर, वय ६९ वर्षे धंदा शेती व घरकाम रा. तुर्काबाद खराडी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर २) रेखा भ्र. राजु थोरात, वय ३२ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. बाभुळगाव नांगरे ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर ३) संगिता भ्र. शिवनाथ कराळे, वय २९ वर्षे, धंदा शेती व घरकाम रा. टाकळी सागज पो चिंचडगाव ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

गैरअर्जदार : निरंक

प्रकरण : बॉम्बे रेग्लुशेन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र (वारसप्रमाणपत्र) मिळणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. पी एस पांडे यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र.१ ही अर्जदार क्र.२ व ३ यांची सख्खी आई आहे. अर्जदार क्र.२ व ३ या विवाहीत असुन त्यांच्या सासरी वरील पत्यावर राहतात. अर्जदार क्र.१ चे पति व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील नामे कारभारी कडु पानकर हे मौजे तुर्काबाद खराडी ता. गंगापुर येथे दिनांक २२/०९/२०२४ रोजी मयत झालेले आहे, मृत्युसमयी त्यांचे वय ७३ वर्ष होते. मयत कारभारी कडु पानकर यांना अर्जदार क्र.१ ते ३ हे कायदेशीर वारसदार असुन अर्जदारांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन मयताचे मृत्यु पश्चात शासकीय व निम शासकीय कामासाठी या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केलेला आहे.

त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तूत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुद्दीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक १९/१२/२०२४ रोजी दिले.

कनिष्ठ लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. सह दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर, २ रे (श्री. के. एस. जाधव साहेब) औरंगाबाद यांच्या न्यायालयात**

एम.ए.आर.जे.आय. क्र. १६१४/२०२४

अर्जदार : १. लक्ष्मीबाई भ्र. बापुराव मुळे, वय ७८ वर्षे, धंदा गृहीणी, रा. माळीवाडा, ता. जि. औरंगाबाद २. बाबु पिता बापुराव मुळे, वय-४६ वर्षे, धंदा शेती, रा. वरील प्रमाणे ३. सुनिल पिता बापुराव मुळे, वय ४१ वर्षे, धंदा शेती, रा. वरील प्रमाणे ४. अरुण पिता बापुराव मुळे, वय ४४ वर्षे, धंदा शेती, रा. वरील प्रमाणे

विरूद्ध

गैरअर्जदार : महाराष्ट्र शासन तर्फे, जिल्हाधिकारी, औरंगाबाद

विषय : वारस हक्क प्रमाणपत्र / लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.

ज्या अर्थी अर्जदारांनी या न्यायालयात ॲड. नंदकिशोर पुंडलीकराव ढंगारे रा. माळीवाडा, ता.जि. औरंगाबाद यांच्यामार्फत वारस हक्क प्रमाणपत्र / लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत अर्ज दाखल केला आहे की,

अर्जदारांनी असे निवेदन केले आहे की, अर्जदार क्र. १ चे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडील बापुराव विश्वनाथ मुळे यांच्या मृत्यु दिनांक १६/०५/२०२० रोजी झाला आहे. अर्जदार यांना मयताचे कायदेशीर वारसदार म्हणुन शासकीय निमशासकीय कामा निमीत्ताने वारस हक्क प्रमाणपत्र / लिगल हेअरशिप सर्टिफिकेटची अत्यंत आवश्याकता आहे. तसेच मयत बापुराव विश्वनाथ मुळे यांच्या नावे मौजे माळीवाडा, ता. जि. औरंगाबाद येथील शेत गट नं. १२ मधील एकुण क्षेत्रफळ ७ हेक्टर १६ आर पोटखराब ७९ आर त्यात मयत यांच्या नावे स्वतंत्र असलेले १० आर आणि सामाईक स्वरुपात असलेले १ हे. २६.९५ आर, पोटखराब ७९ आर पैकी आर्धा हिस्सा या मिळकती अर्जदार यांच्या नावे करण्याकरीता सदर प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता सदरील प्रकरण दाखल केले आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, ज्या कोणास वरील नमुद वारस हक्क प्रमाणपत्र / लिगल हेअरशिप सर्टिफिकेटची अर्जदारांच्या नावे देण्याबाबत कसल्याही प्रकारचे उजर, आक्षेप, हक्क, हरकत असल्यास तर त्यांनी आपला आक्षेप सदरील जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत मुळ कागदपत्रांसह लेखी स्वरुपात या मा. न्यायालयात नोंदवावा. मुदतीत कोणाचा उजर, आक्षेप न आल्यास मयतांच्या नावे असलेली मिळकतीबाबत वारस हक्क प्रमाणपत्र / लिगल हेअरशिप सर्टिफिकेटची देण्यात येईल. मुदतीनंतर आलेला आक्षेप विचारात घेतला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

करिता आज दिनांक १८/१२/२०२४ रोजी सदरील जाहीर प्रगटन माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्यानिशी दिले आहे. सदरील प्रकरणाची पुढील तारीखः ३१/०१/२०२५ ठेवण्यात आलेली आहे.

क. लिपीक — न्यायालय अधिक्षक

मा. दिवाणी न्यायालय व स्तर, औरंगाबाद.

## अग्रलेख...

# संविधानाचे खरे मारेकरी कोण?

संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये भारतीय संविधानाच्या ७५ वर्षांच्या गौरवशाली वाटचालीवर प्रकाश टाकणारी चर्चा झाली. भारतात संविधान लागू झाल्याने या देशातील जनतेच्या दैनंदिन जीवनात टप्प्याटप्प्याने कसा बदल होत गेला, सामान्य माणसाचे जीवनमान कसे सुधारत गेले, संविधानाची गरज का पडली, ते लागू झाले नसते तर देश कुठल्या दिशेला गेला असता, संविधान नसताना या देशाचे राज्यशकट कसे चालत होते, ते चालवण्याची कोणती पद्धती अस्तित्वात होती, न्याय मिळविण्यासाठी कोणकोणती साधने त्यावेळी जनतेसाठी उपलब्ध होती, अशा एक ना अनेक प्रश्नांची उत्तरे यानिमित्ताने जनतेपुढे मांडता आली असती. पण विरोधकांनी त्यांना मिळालेली सोन्याची संधी गमावली. संविधानावरील चर्चेत केवळ सत्ताधाऱ्यांवर आरोप करून विरोधकांनी आपली उंची तेवढी खुजी करून ठेवली. संविधानावरील मजबुतीसाठी तुम्ही काय केले, हा राज्यसभेतील विरोधी पक्ष नेत्याने उपस्थित केलेला प्रश्न वेळ मारून नेणाराच म्हणायला हवा. ही चर्चाच मुळी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या मागणीमुळे सुरू झाली. या चर्चेत संविधानाचा मूलभूत गाभा, त्याच्यातील अधिकारांची अंमलबजावणी, धोरणात्मक तत्त्वे, त्या तत्त्वांचा देशातील व्यवस्थेवर झालेला परिणाम, यावर प्रकाश टाकणे अपेक्षित होते. पण ती चर्चा राहिली बाजूला आणि विरोधकांनी त्यात राजकारण आणल्याने सत्ताधाऱ्यांनाही आपल्या भाषणांचा सूर बदलवावा लागला. ज्यात विरोधक तोंडाच्या भारावर आपटले, असे म्हंटले तर वावगे वाटू नये. संविधानाच्या निर्मितीत काँग्रेसचे योगदान काय आणि सध्याच्या सत्ताधारी पक्षाने त्यात काय भर घातली यावर बोलण्याची चांगली संधी राहुल गांधी, प्रियांका वढेरा, मल्लिकार्जुन खडगे यांना चालून आली होती, पण त्यांनी ती घालवली. इतिहासाला उजाळा देऊन संविधान निर्मितीत काँग्रेसच्या सदस्यांनी बाजवलेली कामगिरी उद्धृत करता आली असती. भारतीय जनता पक्षाकडून सातत्याने घटनाबदलाचे लावण्यात आलेले आरोप सबळ पुराव्यांद्वारे खोडून काढता आले असते. नेहरू-गांधी परिवारावर संविधानाची हत्या केल्याच्या आरोपाला उत्तरे देता आली असती. पण त्यापैकी काही एक न करता विरोधकांनी केवळ सत्ताधाऱ्यांवर गेल्या ११ वर्षांत केलेली कामगिरी दाखवा, असे तुणतुणे लावून दिले. त्या तुलनेत पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, अर्थमंत्री निर्मला सीतारामन्, भाजपाध्यक्ष जे. पी. नड्डा आणि रालोआच्या इतर प्रादेशिक घटक पक्षांनी मिळालेल्या संधीचा उत्तम उपयोग करून, काँग्रेस आणि विरोधी पक्षांवर सारा मुद्दा उलटवला.

आपल्या राज्यघटनेचा ७५ वर्षांचा प्रवास रचनाकारांची दूरदृष्टी आणि द्रष्टेपणामुळे यशस्वी झाला. संविधान निर्माण करण्याच्या प्रक्रियेत महान स्वातंत्र्यसैनिक, लेखक, विचारवंत, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणतज्ज्ञ आणि इतर विविध क्षेत्रांतील व्यावसायिकांचा समावेश होता याचे स्मरण करत पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, हे सर्व जण भारताच्या एकतेच्या वस्तुस्थितीबाबत अत्यंत संवेदनशील होते. संविधान निर्मात्यांच्या मनात आणि हृदयात एकता होती, मात्र, स्वातंत्र्यानंतर, विकृत मानसिकतेमुळे किंवा स्वार्थामुळे, देशाच्या ऐक्याच्या मूळ भावनेला सर्वांत मोठा धक्का बसला. विविधतेत एकता हे भारताचे वैशिष्ट्य राहिले आहे, यावर त्यांनी जोर दिला. आपण देशाची विविधता साजरी करतो आणि देशाची प्रगती ही विविधता साजरी करण्यात आहे. मात्र, वसाहतवादी मानसिकतेचे लोक, ज्यांना भारतात काही चांगले दिसत नव्हते आणि ज्यांना भारताचा जन्म १९४७ मध्ये झाला असे वाटत होते, त्यांनी या विविधतेत केवळ विरोधाभास शोधला. विविधतेच्या या अमूल्य खजिन्याचा उत्सव साजरा करण्याऐवजी, ज्यामुळे देशाची एकता बिघडेल या उद्देशाने त्यात विषारी बीजे पेरण्याचे प्रयत्न केले. विविधतेचा उत्सव आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनवण्याचे आवाहन पंतप्रधानांनी सर्वांना केले आणि हीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना खरी श्रद्धांजली असेल, असे ते म्हणाले. तसे बघितले तर लोकशाही मजबूत करण्यासाठी नव्हे तर एका घराण्यासाठी राज्यघटनेत दुरुस्त्या केल्या गेल्या, ही वस्तुस्थिती असून, काँग्रेसच्याच ५५ वर्षांच्या कार्यकाळात एकूण ७७ वेळा घटनादुरुस्त्या झालेल्या आहेत. भारतीय जनता पार्टीने १६ वर्षे देशावर सत्ता गाजविली आणि २२ वेळा घटनेत संशोधन केले. काँग्रेसच्या घटनादुरुस्तीमागे केवळ सत्ता वाचवणे आणि व्होट बँक शाबूत ठेवणे, हे उद्देश होते तर भारतीय जनात पक्षाच्या सरकारांनी एकता प्रस्थापित करणे तसेच मागास समाजाला पुढे आणण्याकरिता घटनादुस्त्या केलेल्या आहेत. आज काँग्रेसचे नेते संविधानावर आपलाच अधिकार असल्यासारखे वागत असून, संविधानाची प्रत फडकवण्यात धन्यता मानत आहेत. नेहरू-गांधी परिवाराने तर विरोधी पक्षांच्या नेत्यांना तुरुंगात डांबून लोकशाही आणि संविधानाची लक्तरे वेशीवर टांगण्याचा पराक्रम केलेला आहे. १९४९ मध्ये गिरणी मजुरांसाठी आयोजित करण्यात आलेल्या सभेत मजरुह सुलतानपुरी या कवीने एक कविता सादर केली होती. पण ती कविता पंडित नेहरू यांच्या विरोधात होती. या प्रकरणात माफी मागण्यास नकार दिल्याने मजरुह सुलतानपुरी आणि बलराज साहनी यांना तुरुंगात डांबले गेले. काँग्रेसचा इतिहासच संविधानविरोधी राहिलेला आहे. महाराष्ट्रातच गतकाळात याचा अनुभव लोकांनी घेतला. राज्यातील महाविकास आघाडीवर टीका करणाऱ्या समाजमाध्यमातील पत्रकारांना आणि पक्षाच्या धोरणाविरुद्ध व्यक्त होणाऱ्या सामान्य लोकांना काँग्रेसने दिलेली वागणूक अंगावर शहारे आणणारी होती. मायकेल एडवर्ड्स लिखित नेहरूंवरील चरित्रात काही आक्षेपार्ह भाग आढळून आल्याने काँग्रेसने या लेखकाचे तोंड बंद करून या पुस्तकावरच बंदी आणली होती. शहाबानो प्रकरणात १९८६ मध्ये सर्वोच्च न्यायालयाचा निकाल आल्यानंतर काँग्रेसने घटनादुरुस्तीद्वारे हा निकालच बदलवून टाकून मुस्लिम महिलांच्या अधिकारांवर गदा आणली.

भाजपाच्या कार्यकाळात जिथे वस्तू आणि सेवा करासाठी घटनादुरुस्ती केली गेली तिथे पंतप्रधानांना न्यायिक कक्षेबाहेर ठेवण्याची घटनादुरुस्ती काँग्रेसच्या राज्यात झाली. भाजपाने मागासवर्गीय आयोगाला संवैधानिक दर्जा दिला तर काँग्रेसने अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घातला. ओबीसींबाबतचे अधिकार भाजपाने राज्य सरकारांकडे हस्तांतरित केले तर काँग्रेसने राष्ट्रपती शासनाचा कार्यकाळ वाढवण्याची घटनादुरुस्ती केली. भाजपाच्या कार्यकाळात महिलांना आरक्षण देण्याचे काम झाले मात्र काँग्रेसचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्याकडे राक्षसी बहुमत असतानाही महिलांच्या आरक्षणाचा मुद्दा निकाली काढला नाही. काँग्रेसच्याच कार्यकाळात कलम ३५६ चा दुरुपयोग झालेला आहे. एकट्या काँग्रेसने गैरकाँग्रेसी सरकारे आपल्या पक्षाची सत्ता कायम राहावी म्हणून ९० वेळा बरखास्त केली, हा संविधानाचा दुरुपयोग असल्याचे मोदी म्हणत असतील तर त्यात काहीच चूक नाही. इंदिरा गांधींनीच तब्बल ५० वेळा गैरकाँग्रेसी सरकारे बरखास्त करण्यासाठी कलम ३५६ चा दुरुपयोग केलेला आहे. ज्या भाजपा सरकारवर ते संविधान बदलतील असा आरोप केला जातो, त्या मोदींच्या कार्यकाळात एकदाही या कलमाचा दुरुपयोग करण्यात आलेला नाही. काँग्रेसने तर भौगोलिक रूपरेषेशी संबंधित कलम १ मध्ये कुठलेही संशोधन न करता एका समझोत्याअंतर्गत कच्चातिवू द्वीप श्रीलंकेला देऊन टाकले, ही बाब या संदर्भातील चर्चेत अमित शाह यांनी उपस्थित केली. संसदेच्या दोन्ही सदनांमध्ये कुठलीही चर्चा न करता घटनेमध्ये ३५ (ए) हे कलम जोडण्याचा आगाऊपणा काँग्रेसनेच केला. काँग्रेस आज आरक्षणाची ५० टक्के असलेली मर्यादा उठविण्यासाठी प्रयत्नशील आहे. पण त्यांना मागासवर्गीयांबद्दल कळवळा आहे, असा समज कुणीही करून घेऊ नये. या माध्यमातून मुस्लिमांना धार्मिक आरक्षण मिळावे, यासाठी त्यांना आटापिटा सुरू असल्याची बाब जनतेने ध्यानात घ्यावी. घटनेतील ३७० कलमाला दस्तुरखुद्द डॉ. आंबेडकरांचा विरोध होता, तरीदेखील त्यांच्या विचारांची पायमल्ली करून काँग्रेसने हे कलम त्यात घुसविले. संविधानावरील चर्चेच्या निमित्ताने अशा कितीतरी घटनाविरोधी तसेच काँग्रेस आणि नेहरू गांधी परिवाराच्या विरोधात जाणाऱ्या कृती सत्ताधारी पक्षाने उजागर करून, विरोधकांना धोबीपछाड दिला आहे. आता संविधानाचे खरे मारेकरी कोण? हा कौल जनतेलाच करायचा आहे.

## इतस्ततः

**डॉ. विवेक राजे**

# शतकोत्तर वाटचालीतील आव्हान

निवडणूक निकाल आले आणि अनेकांना वाटलं की, हा महाराष्ट्रातील देवेंद्र युगाचा हिंदुत्ववादी आरंभ आहे. काहींना वाटतंय की, हा महाराष्ट्रातील हिंदूंना जातिपातीत विभागणाऱ्या काँग्रेसी राजकारणाच्या धाटणीचा अंत आहे. कोणाला वाटतंय हा शरद पवारांच्या मतलबी आणि कोलांटउड्यांच्या राजकारणाचा अंत आहे. कोणाच्या मते हा देशातील आणि महाराष्ट्रातील तत्त्वहीन, अराजकतावादी अर्बन नक्षली राजकारणाचा अंत आहे. कुणाच्या मते विकाऊ आणि वेश्यावृत्तीच्या पत्रकारितेला बसलेली चपराक आहे. कुणाच्या मते तथाकथित पुरोगामी व भयवादी समाजवादी विचारवंतांना जनतेने मारलेली धोबीपछाड आहे. हे सगळं जर थोडे बाजूला सारले तर लक्षात येते की, आपल्या मतांशी एकनिष्ठ राहण्याच्या अट्टहासाने ध्येयवाद जोपासता येतो, हे दाखवणाऱ्या युगाची ही सुरुवात आहे. त्या ध्येयासाठी शांतपणे कठोर परिश्रम करीत, आपल्या ध्येयाच्या दिशेने चाललेल्या प्रवासात सर्व समविचारी वा कुठेतरी सांधे जुळू शकतील अशा सर्वांना बरोबर घेणाऱ्या, राष्ट्रीय चारित्र्य निर्माणाचे कार्य करणाऱ्या राष्ट्र सबल करण्याचा ध्यास घेत, शंभर वर्षे वाटचाल सुरू ठेवणाऱ्या संघ विचारांचा सखोल ठसा उमटवणाऱ्या युगाचा हा आरंभ आहे. हळूहळू पण निश्चितपणे संघ विचारांचा ठसा सगळ्याच सामाजिक क्षेत्रात उमटताना दिसतो आहे. राजकारणात तर भाजपाला संघाकडून जे मनुष्यबळ, बौद्धिक बळ, प्रशासनिक व नियोजनात्मक अनुभवाचे बळ मिळते आहे, त्यामुळे तो पक्ष आजच्या राजकारणात इतर पक्षांना त्यांच्याच भाषेत उत्तर देऊनही आपले वेगळे स्थान राखून आहे. संघ विचारांना आज जगभरातून मिळणाऱ्या मान्यतेचा हा प्रारंभ आहे. जी गोष्ट जगभरात नावाजली जाते ती गोष्ट महाराष्ट्रातदेखील नावाजली जाणे साहजिकच आहे.

१९२५ मध्ये पाच स्वयंसेवकांपासून परमपूजनीय डॉ. हेडगेवारांनी रुजवलेल्या 'राष्ट्र आणि राष्ट्रासाठी संघटन' या विचारांचे आज बहुआयामी अशा विशाल संघटनेमध्ये रूपांतर झालेले दिसते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, राष्ट्र सेविका समिती, विश्व हिंदू परिषद, भारतीय मजदूर संघ, भारतीय जनता पक्ष, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, भारताबाहेर काम करणारे संघटन हिंदू स्वयंसेवक संघ, राष्ट्रीय शीख संगत, जनजाती कल्याण आश्रम, मुस्लिम राष्ट्रीय मंच अशा अनेक क्षेत्रांत काम करणाऱ्या संघटनांच्या द्वारे संघ राष्ट्र आणि या राष्ट्रासाठी हिंदूंचे संघटन करण्याचे कार्य अव्याहतपणे मागील १०० वर्षे सुरू आहे. हे करताना संघाची भाजपाव्यतिरिक्त कोणतीही संघटना राजकीय क्षेत्रात काम करीत नाही, ही विशेष बाब म्हणावी लागते. भारतरत्न नानाजी देशमुख एकदा म्हणाले होते की, 'राजकीय पक्ष म्हणजे सत्तापिपासू लोकांच्या टोळ्या बनलेल्या आहेत.' आजही या वक्तव्याला भारतीय जनता पार्टी हा मोठा अपवाद आहे. या सगळ्या संघटना समाजाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात काम करीत असल्या, त्यांची उद्दिष्टे जरी त्यामुळेच वेगवेगळी असली, तरी त्यांच्यामध्ये कोणताही विसंवाद असल्याचे दिसत नाही. अपवादात्मक परिस्थितीत एखाद्या वेळी अंतर्विरोध निर्माण झाला तरी तो समन्वयाच्या माध्यमातून लगेचच मिटवला जाईल, याचीही काळजी संघ नेहमीच घेत असतो. लाखो नि:स्वार्थ आणि सेवाभावी कार्यकर्ते पिढ्यान्‌पिढ्या तयार करणेदेखील संघाचे मुख्य उद्दिष्ट नाही. या देशातील हिंदूंचे संघटन करणे आणि राष्ट्र कार्यासाठी चारित्र्यवान व्यक्तींचे निर्माण करण्यासाठी चाललेल्या कार्याच्या ओघात आपोआपच नि:स्वार्थ कार्यकर्ते तयार होतात; जे संघ कार्यासाठी समर्पित जीवन जगतात. संघ कार्य करताना त्यांची समाजाकडून वा संघाकडून कोणतीही अपेक्षा नसते. त्यामुळेच संघाने सांगितलेले काम समर्पित वृत्तीने आजही पिढ्यान्‌पिढ्या चाललेले आहे. या कार्यात एखादी व्यक्ती संघाच्या चारित्र्याच्या संकल्पनेत बसू शकत नसेल तर अशी व्यक्ती फार काळ संघाच्या परिघात टिकत नाही. अधिकार पदांवरील व्यक्तींना अभिनिवेश नाही. त्यामुळे वरिष्ठ पातळीवर विचारांचे आदानप्रदान होऊन त्यातून भविष्यातील दिशा निश्चित केली जाते आणि सामान्य स्वयंसेवकापासून ते सरसंघचालकांपर्यंत आपल्या सर्व क्षेत्रातील संघटनांना बरोबर घेऊन संघ कार्यपथावर वाटचाल करताना दिसतो. अर्थात त्यामुळे चारित्र्यवान, विचारी आणि अभ्यासू माणसांची संघात कमी नाही. याच लोकांच्या कार्यामुळे आज भारतात राष्ट्रवाद भक्कम पायावर उभा आहे. 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स' आणि तत्सम ठिकाणी शिकून आलेली माणसे महत्त्वाच्या स्थानी बसवून मागील १०० वर्ष 'डीप स्टेट' भारताला दिशाहीन करून आर्थिक वसाहत म्हणून वापरत आले. त्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक वसाहतवादाला मागील १० वर्षांत पायबंद घातला गेल्यामुळे या देशातील सोरोस आणि फोर्ड फाऊंडेशन प्रणीत विरोधी पक्ष व तथाकथित विचारवंत आज अस्वस्थ झालेले दिसतात. लोकसभा निवडणुकीत दिसलेल्या थोड्या पीछेहाटीनंतर हरयाणा आणि महाराष्ट्रातील निवडणुकांनी संघ विचारांची खोलवर रुजवलेली मुळे नव्याने जाणवली आहेत. त्यामुळे या निवडणूक निकालांच्या पृष्ठभूमीवर हिंदुत्ववादी विचारवंतांनी एक नवे आव्हान स्वीकारायला हवे. हे आव्हान म्हणजे युरोप-अमेरिकेच्या दृष्टिकोनातून तयार करण्यात आलेल्या विविध प्रमाणकांना उत्तर देणे हे होय. काही वर्षांपूर्वीपर्यंत हा देश कोणत्या ना कोणत्या गोष्टींसाठी या पाश्चात्त्य देशांच्या मदतीवर अवलंबून होता. आज या परिस्थितीत मोठा बदल झालेला दिसतो. सगळ्यात महत्त्वाचा बदल म्हणजे आज हा देश युरोप-अमेरिकेच्या डोळ्याला डोळा देताना दिसतो आहे. त्यामुळे या स्थितीत विविध क्षेत्रातील जागतिक प्रमाणकांना आव्हान दिले पाहिजे.

ही प्रमाणके म्हणजे मानव संसाधन विकास निर्देशांक (एचआरडी इंडेक्स), जागतिक भूक निर्देशांक (वर्ल्ड हंगर इंडेक्स), जागतिक आनंद निर्देशांक (हॅपीनेस इंडेक्स) इत्यादी. कारण ही सगळी प्रमाणके फक्त अमेरिका आणि युरोपीय देश नजरेसमोर ठेवून तयार केली जातात. ती तयार करताना तिसऱ्या जगातील देशांतील व्यवस्था अयोग्य आहे हे सिद्ध करण्याचाच उद्देश असतो. हे निर्देशांक खरोखर एखाद्या देशाची एखाद्या क्षेत्रातील वस्तुस्थिती विशद करू शकतात का हा प्रश्नच आहे. हेच काही निर्देशांक दोन वर्षांपूर्वीपर्यंत आमचे शेजारी असलेले श्रीलंका, बांगलादेश भारताच्या तुलनेत नेहमीच सुस्थितीत दाखवत होते. असेच उदाहरण जागतिक भूक निर्देशांकाच्या बाबतीत देता येईल. ही तालिका तयार करताना युरोप-अमेरिकेत आवश्यक असलेले उष्मांक (कॅलरीज) गृहीत धरले जातात. भारतीय उपखंडात सुदृढ आणि निरोगी राहण्यासाठी तितक्या उष्मांकाची आवश्यकताच नाही. म्हणजे युरोप-अमेरिकेत घेतल्या जाणाऱ्या उष्मांकांपेक्षा कमी उष्मांक घेऊन येथील हवामानात निरोगी जीवन जगता येते; नव्हे कमी उष्मांक घेऊनच निरोगी राहता येते. तेव्हा आपल्या आहारात कमी उष्मांक घेणाऱ्या लोकांची संख्या भारतात जास्त आहे. त्यामुळे त्या निर्देशांक तालिकेच्या आधारे केलेल्या परीक्षणात कमी उष्मांक घेणे म्हणजे कुपोषित असणे होय. या विषयात डॉ. सुरेश तेंडुलकर यांचे संशोधन आणि अहवाल वेगळी तथ्ये विशद करतात. हेच शिक्षण क्षेत्रातील विविध संस्थांची क्रमवारिता लावताना घडत असते. युरोप-अमेरिकेत जिथे मुळात लोकसंख्या कमी आहे, तेथे १५-२० विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक हे प्रमाण मान्य होणारे आहे. आमच्या इथे अतिरिक्त लोकसंख्या असताना आणि सर्वांना शिक्षणाची संधी मिळणे हे ध्येय असताना १५ विद्यार्थ्यांना एक शिक्षक हा रेशो ठेवताच येणारा नाही. त्यामुळे अशा प्रकारची प्रमाणके भारतीय उपखंडात चुकीचीच ठरतात. त्यामुळे आजच्या जागृत हिंदू भारतात या प्रमाणकांना प्रथम नाकारले पाहिजे. आज तरी हे सर्व करण्याची बौद्धिक कुवत असलेल्या माणसांची संघाकडे कमतरता नाही. मग आपण अपेक्षा करायला काय हरकत आहे...

९८८१२४२२२४

## वेध

**नंदकिशोर काथवटे**

# माओवादाला अखेरची घरघर

राज्याच्या पटलावर नैसर्गिकदृष्ट्या सर्वांत श्रीमंत जिल्हा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गडचिरोली जिल्ह्याच्या ४ दशकांतील भूतकाळावर नजर टाकल्यास केवळ माओवादामुळे गडचिरोली जिल्हा देशातील २५ मागास जिल्ह्यांत अव्वल स्थानावर पोहोचला होता. मात्र या जिल्ह्याने आता प्रगतीचा एकेक दगड सर करत विकासाच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. नक्षलवादाच्या विळख्यात अडकलेल्या या जिल्ह्याला बाहेर काढण्यासाठी जर कोणी शर्थीचे प्रयत्न केले असतील तर ते म्हणजे गृहविभागाने. केंद्र आणि राज्य शासनाच्या समन्वयाने गडचिरोली जिल्ह्यातील नक्षलवाद संपविण्यासाठी गृहविभागाची भूमिका अतिशय महत्त्वपूर्ण ठरली आहे. केंद्राने गडचिरोलीसाठी पाठविलेले सुरक्षा दल व विकासकामांसाठी लागणारा निधी आणि राज्य सरकारने उचललेली कठोर पावले या बळावर गडचिरोलीच्या नक्षलवादाला आता अखेरची घरघर लागली आहे. परवा भामरागड तालुक्यातील अतिदुर्गम व नक्षलप्रभावित पेनगुंडा येथे पोलिस विभागाने नव्याने पोलिस मदत केंद्र स्थापन केले असून, छत्तीसगड राज्यामधून छुप्या पद्धतीने गडचिरोलीच्या सीमावर्ती भागात येणाऱ्या नक्षल चळवळीला रोखण्याचे काम केले आहे. या पोलिस मदत केंद्राच्या पाहणीसाठी व जवानांच्या अडचणी जाणून घेण्यासाठी खुद्द राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला पेनगुंडाच्या जंगलात दाखल झाल्या. यामुळे निश्चितच नक्षलवाद्यांशी दोन हात करणाऱ्या जवानांचे मनोबल उंचावले आहे. पोलिस प्रशासनाचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे. अतिशय अडचणींचा सामना करून, प्रतिकूल परिस्थितीत गडचिरोलीच्या पोलिस दलाने नक्षलवादाची पाळेमुळे खणून काढली आहेत. त्यामुळे पोलिस विभागाचे वरिष्ठ अधिकारीसुद्धा जवानांच्या पाठीशी असल्याचा विश्वास त्यांच्या कृतीतून आता देऊ लागले आहे. रश्मी शुक्ला पेनगुंडा येथे दाखल झाल्यानंतर त्यांनी भामरागडचे उपविभागीय पोलिस अधिकारी अमर मोहिते व प्राणहिता सी-६० पोलिस अंमलदार श्रीराम सोरी यांचा वाढदिवस केक कापून साजरा केला आणि जवानांशी मनमोकळेपणे संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. निश्चितच ही बाब नक्षलवादाविरोधात लढणाऱ्या जवानांचे मनोबल उंचाविणारी आहे. पोलिसांनी केवळ बंदुकीने गडचिरोली जिल्ह्यातील माओवादाला हद्दपार केले नाही तर गडचिरोली पोलिसांचे 'सोशल पोलिसिंग' हे शस्त्र प्रभावी ठरले असल्याचे आता स्पष्ट होत आहे. राज्याच्या कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी सांभाळणाऱ्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला ११ डिसेंबरला गडचिरोलीत दाखल झाल्या आणि थेट अतिदुर्गम पेनगुंडा गाठत जवानांना धीर देत प्रशासन जवानांच्या पाठीशी असल्याचा विश्वासही दिला. दादालोरा खिडकीच्या माध्यमातून लोकांच्या जवळ जात पोलिस विभागाने आदिवासींच्या समस्या सोडविल्या, त्यांचा विश्वास जिंकला आणि प्रेमाने त्यांच्याशी वागून नक्षलवादावर विजय मिळविला. शासनानेसुद्धा स्थापन केलेल्या आत्मसमर्पण योजनेला जे बळ मिळाले ते केवळ गडचिरोली पोलिसांच्या सोशल पोलिसिंगमुळेच आहे. पूर्वी पोलिस विभागाचे वरिष्ठ अधिकारी गडचिरोली जिल्ह्यात वर्षानुवर्षे येत नव्हते. त्यामुळे येथील पोलिसांच्या अडचणी, त्यांच्या समस्या प्रशासन व शासनापर्यंत पोहोचत नव्हत्या. मात्र आता वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांचे दौरे गडचिरोली जिल्ह्यात सातत्याने होत असल्याने येथील नक्षलवादाच्या समस्या शासनापर्यंत पोहोचू लागल्या असून त्या दिशेने पावलेसुद्धा उचलली जात आहेत. पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांनी माओवाद संपवून गडचिरोली जिल्ह्याचा विकास करू आणि शासकीय योजनांचा लाभ जास्तीत जास्त लोकांना मिळवून देण्याचा प्रयत्न करू असे आश्वासन गडचिरोली जिल्ह्याच्या जनतेला दिले आहे. त्यामुळे नक्षलवादाची आता अखेरची घरघर सुरू आहे. पोलिसांच्या आक्रमतेमुळे नक्षलवादी बॅकफूटवर असून गडचिरोलीच्या सीमावर्ती भागातून त्यांना हाकलून लावण्यास पोलिसांना यश आले आहे. यासाठी पोलिसांनी राबविलेली आपली गुप्तचर यंत्रणासुद्धा तितकीच प्रभावी ठरली आहे. सोशल पोलिसिंगमुळे पोलिसांची गुप्तचर यंत्रणा अधिक बळकट झाली असून पोलिसांच्या अडचणी शासनाने सोडविण्याठी प्राथमिकता दर्शविल्याने गडचिरोलीच्या पोलिस दलाची संपूर्ण राज्यात चर्चा आहे. नक्षलप्रभावित म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यातील लोकसभा व विधानसभेच्या निवडणुकीत पोलिसांनी राबविलेल्या नियोजनबद्ध सुरक्षा व्यवस्थेमुळे या जिल्ह्यात दोन्ही निवडणुकांमध्ये विक्रमी मतदान झाले आणि मतदानाच्या टक्केवारीकडे अख्ख्या राज्याचे लक्ष गडचिरोलीने वेधून घेतले. यासाठी गडचिरोलीचे पोलिस अधीक्षक नीलोत्पल हे सुद्धा तितकेच अभिनंदनास पात्र ठरतात. अशीच सक्षम सुरक्षा व्यवस्था गडचिरोली जिल्ह्यात कायम राहिल्यास हा जिल्हा नक्षलवादमुक्त होईल, यात तिळमात्रही शंका नाही.

९९२२९९९५८८

## दिल्ली वार्तापत्र

**श्यामकांत जहागीरदार**

# 'एक देश एक निवडणूक' विधेयक काळाची गरज

बहुचर्चित असे 'एक देश एक निवडणूक' विधेयक सरकारने लोकसभेत सादर केले. या विधेयकाला काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांचा विरोध असल्यामुळे त्यांनी विधेयक सादर होत असताना नेहमीप्रमाणे गोंधळ घातला. मात्र विरोधकांच्या गोंधळाला न जुमानता सरकारने हे विधेयक लोकसभेत सादर केले. या विधेयकावर व्यापक सहमती करण्यासाठी ते संयुक्त ससदीय समितीकडे पाठवण्याची घोषणाही कायदा मंत्री अर्जुनराम मेघवाल यांनी केली. हे विधेयक संसदेत पारित झाल्यानंतर देशात लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका एकाचवेळी होतील. लोकसभेच्या तसेच विधानसभेच्या निवडणुका सध्या वेगवेगळ्या होतात, त्यामुळे पैशाचा तर चुराडा होतो, पण आचारसंहिता आणि अन्य कारणांमुळे देशातील विकासकामेही महिनोमहिने ठप्प होतात.

सध्या हे विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवले जाणार आहे, या समितीचा अहवाल आल्यानंतर ते अंतिम मंजुरीसाठी लोकसभेत सादर केले जाईल. काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांची भूमिका पाहता संयुक्त संसदीय समितीतही या विधेयकावर सहमती होण्याची शक्यता नाही. संसदेच्या दोन्ही सभागृहांत हे घटनादुरुस्ती विधेयक दोन तृतीयांश बहुमताने पारित झाले पाहिजे. लोकसभेत सत्ताधारी पक्षाला म्हणजे रालोआला स्पष्ट बहुमत नसले तरी रालोआतील तसेच रालोआबाहेरील काही पक्षांच्या मदतीने भाजपा हे विधेयक पारित करून घेईल. या विधेयकावर भाजपाची खरी अडचण राज्यसभेत होण्याची शक्यता आहे. कारण राज्यसभेत सध्या भाजपाचे साधे बहुमत आहे. राज्यसभेतही हे विधेयक पारित होण्यासाठी दोन तृतीयांश बहुमताची गरज आहे. त्यामुळे राज्यसभेत विधेयक पारित करून घेणे, ही भाजपाची सत्त्वपरीक्षा ठरणार आहे.

एक देश एक निवडणूक विधेयक संसदेच्या दोन्ही सभागृहांत पारित झाले तरी त्यानुसार २०२९ मध्ये निवडणूक होणे सध्या तरी कठीण वाटते. मोदी सरकारने एक देश एक निवडणूकबाबत माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या नेतृत्वात २ सप्टेंबर २०२३ ला एक उच्चाधिकार समिती नियुक्ती केली होती. या समितीने १४ मार्च २०२४ ला आपला अहवाल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना सादर केला. २०३४ मध्ये यानुसार एकत्र निवडणुका घेण्याची अहवालात शिफारस आहे. मोदी सरकारने देशाच्या व्यापक हितासाठी घेतलेल्या कोणत्याही निर्णयाला विरोध करणे ही काँग्रेसची नेहमीची सवय झाली आहे. मुळात आपण विरोध का करतो, हे काँग्रेसनेत्यांनाही समजत नाही. काँग्रेसचा विरोध हा विरोधासाठीचा विरोध आहे. त्यामागे कोणतेही तर्कसंगत कारण नाही.

देशात लोकसभेच्या तसेच विधानसभेच्या निवडणुका एकाचवेळी घेण्याचा मोदी सरकारचा आग्रह ही काही नवीन बाब नाही, तसेच यासंदर्भातील विधेयक पारित झाल्यानंतर देशात पहिल्यांच या पद्धतीने निवडणुका होतील, असेही नाही. देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर १९६७ पर्यंत देशात लोकसभेच्या तसेच विधानसभेच्या निवडणुका एकत्रच होत होत्या. विशेष म्हणजे तेव्हा देशात काँग्रेसचेच सरकार होते. म्हणजे देशात एक देश एक निवडणुकीची सुरुवात काँग्रेसच्याच शासनकाळात झाली होती. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनीच याची सुरुवात केली होती, याचे स्मरण आज या विधेयकाला विरोध करणाऱ्या काँग्रेस नेत्यांनी ठेवले पाहिजे. म्हणजे जुन्या काँग्रेस सरकारांनी सुरू केलेल्या एक देश एक निवडणूक पद्धतीलाच काँग्रेसचे आजचे तरुण तुर्क आणि म्हातारे अर्क नेतृत्व विरोध करत आहे. मुळात काँग्रेसमध्ये काही वर्षांपूर्वीच पन्नाशी ओलांडलेले नेतृत्व स्वत:ला तरुण समजत असल्यामुळे खरी समस्या आहे.

१९६७ पासून लोकसभेच्या तसेच विधानसभेच्या निवडणुका एकत्र घेण्याच्या पद्धतीला तडा गेला वा काँग्रेसच्या तेव्हाच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी त्याला जाणीवपूर्वक तडा दिला. कारण १९६७ मध्ये देशातील काही राज्यांत पहिल्यांदाच विरोधी पक्षांची सरकारे आली होती. लोकसभेची निवडणूक वर्षभर आधी घेतल्यामुळे तसेच विरोधी पक्षशासित राज्यातील सरकार राजकीय कारणास्तव बरखास्त करण्यात आल्यामुळे एक देश एक निवडणूक पद्धतीला तेव्हा तडा गेला. त्यानंतर देशात लोकसभेच्या निवडणुका वेगळ्या आणि विधानसभेच्या निवडणुका वेगळ्या होऊ लागल्या.

मात्र आताही देशात लोकसभा निवडणुकीसोबत सिक्कीम, ओडिशा, आंध्रप्रदेश, आणि अरुणाचलप्रदेशात विधानसभेच्या निवडणुका होत आहे, याचे भान या विधेयकाला विरोध करताना काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी ठेवले पाहिजे. विशेष म्हणजे एक देश एक निवडणूक लागू झाल्यानंतर केंद्रात ज्या पक्षाचे सरकार बनेल, त्याच पक्षाचे राज्यातही सरकार येईल, अशी भीती विरोधकांना वाटते, ती निराधार असल्याचे या राज्यांच्या विधानसभा निवडणूक निकालांवरून आपल्या लक्षात येईल. लोकसभेसोबत ओडिशा आणि आंध्रप्रदेशात विधानसभेच्या निवडणुका होत असतानाही यावेळच्या निवडणुकीचा एकमेव अपवाद वगळता आतापर्यंत ओडिशात बिजू जनता दलाचेच सरकार येत होते. आंध्रप्रदेशातही कधीच भाजपाचे सरकार आले नाही.

लोकसभा आपला कार्यकाळ पूर्ण करू शकली नाही वा काही राज्यांतील सरकारे मुदतीपूर्वीच पडली तर काय, असा प्रश्न विरोधक या विधेयकाला विरोध करण्यासाठी उपस्थित करत आहे. पण त्याचेही उत्तर रामनाथ कोविंद समितीने आपल्या अहवालातून दिले आहे. समजा केंद्र सरकार आपला कार्यकाळ पूर्ण करू शकले नाही, तर हा मुद्दा २००४ नंतर देशात उद्भवलाच नाही. २००४ ते २०१४ पर्यंत संपुआच्या सरकारने पाच वर्षांचे आपले दोन कार्यकाळ यशस्वीपणे पूर्ण केले, तर २०१४ पासून २०२४ पर्यंत मोदी सरकारनेही पाच वर्षांचे आपले दोन कार्यकाळ पूर्ण केले, आता मोदी सरकारची वाटचाल पाच वर्षांचा तिसरा कार्यकाळ पूर्ण करण्याच्या दिशेने सुरू आहे.

१९७७, १९८०, १९९८ आणि १९९९ मध्ये देशात मुदतपूर्व निवडणुकांची स्थिती उद्भवली होती. एक देश एक निवडणूक विधेयक पारित झाल्यानंतर लोकसभेबाबत अशी परिस्थिती उद्भवण्याची दूरदूरपर्यंत कोणतीच शक्यता नाही. एखाद्या राज्यातील सरकार कोणत्याही कारणाने मुदतपूर्व कोसळले वा आपला कार्यकाळ पूर्ण करू शकले नाही, तर उर्वरित कालावधीसाठी निवडणूक घेण्याची तरतूद या विधेयकात आहे. लोकसभेबाबतही अशीच तरतूद आहे. म्हणजे काहीही झाले तरी देशात लोकसभेसोबत विधानसभेच्या निवडणुका घेण्याने वेळापत्रक कधीच प्रभावित होणार नाही. त्यामुळे काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्षांनी एक देश एक निवडणूक विधेयकाला असलेला आपला विरोध सोडून द्यावा. सत्ताधारी पक्षानेही विरोधी पक्षांचे या विधेयकावर जे आक्षेप आहे, त्याचे मुद्देसूद निराकरण केले पाहिजे आणि सहमतीने देशाच्या व्यापक हिताचे असे हे विधेयक पारित करून घेतले पाहिजे.

९८८१७१७८१७

## शेकोटी हद्दपार झाली, माणसे गायब झाली

शिशिर महिन्यात हवेचा गारवा चांगलाच वाढला होता. थंडी बोचरी होती. बचावासाठी स्वेटर, मफलर, शॉलचा वापर वाढला तरी शेकोटी पेटवून अशी थंडी घालविण्याची मजा काही औरच आहे. पूर्वीच्या काळी प्रचंड घनदाट जंगले असल्यामुळे सूर्यास्तानंतर या थंडीचा प्रादुर्भाव जाणवायचा. लहान गावात सायंकाळी ७ नंतर सर्वत्र शुकशुकाट असायचा.



त्या काळी इंधन म्हणून लाकडे वापरली जात. वेगवेगळ्या आकाराच्या टोपल्यांना माती आणि शेणाने सारवून घरोघरी शेकोटी भोवती गोळा होऊन गप्पांचा फड रंगत असे. शाळेचा गृहपाठ शेकोटी शेजारी बसूनच होत असे. मनोरंजनाचे साधन मुख्य रेडिओ. विविध भारती, बुधवारचा बिनाका गीतमाला आणि शेकोटी यांचे एक वेगळेच नाते असे.

घरटी एकतरी दमेकरी किंवा वात विकाराचा रुग्ण असे. त्यांना या शेकोटीचा मोठा आसरा असायचा. दमेकरीचा घट्ट कफ शेकोटीच्या उष्णतेने पातळ तर वातवाल्याचा वायू उष्ण होऊन चलनवलन व्यवस्थित ठेवत असे. त्यांचा त्रास आटोक्यात राही. चित्रपटगृहातील रात्रीच्या शोला तुरळक प्रेक्षक राहत. बाहेर रस्त्यावर पिवळ्या दिव्यांचा अंधुक प्रकाश, सर्वत्र सामसूम आणि चौकात वाटसरूंसाठी डांबर ड्रममध्ये मोठी शेकोटी असायची. रात्री घरी जाणारे हमखास थांबून हात शेकत. थोडी ऊर्जा घेऊन मार्गस्थ व्हावयाचे. आठवण येते खरी, मात्र आता जंगलतोड थांबली, कौलारू घरांची जागा सिमेंट स्लॅबने घेतली. शेकोटी आणली तरी तिच्याभोवती गप्पांचा फड रंगवणारे माणसे आणायचे कुठून?

**संजय पाठक**/९४२२१४७६७७

## वाचक पत्रे

### सुरक्षित अंतर गरजेचे

बर्डी उड्डाण पुलावर कार एकावर एक आदळल्याने अपघात झाल्याचे वृत्त वाचले. लक्षात येते की त्या क्षणी प्रत्येक कार ही निर्धारित वेगापेक्षा अधिक वेगाने जात असाव्यात. अधिक वेग आणि सुरक्षित अंतर न ठेवल्यामुळे असे अपघात होतात. नियमांच्या पालनाचा विसर होणे ही जणू फॅशन झाली आहे. नको त्या ठिकाणी अशी जीवघेणी स्पर्धा विनाकारण सुरळीत मार्ग अवरुद्ध करत असते, ज्याचा त्रास नियमांचे पालन करणाऱ्या वाहनचालकांना भोगावा लागतो. मार्ग सुरळीत करण्यासाठी म्हणून वाहतूक थांबवावी लागते, ज्यामुळे इतर मार्गावर ताण वाढतो.

वाहनचालकांनीच भान ठेवून सुरक्षित अंतर ठेवले तर अशा अपघातांना आळा बसेल, लोकांचा वेळ, श्रम, पैसा वाचेल. कृपया वाहनचालकांनी नियमांचे पालन करत, निर्धारित वेगमर्यादा पाळत, सुरक्षित अंतर राखून वाहन चालवावे, असे आवाहन यानिमित्ताने करावेसे वाटते.

**अतुल ठाकरे**/नागपूर

### केंद्र सरकारची पर्यटन विकासाबाबत मोठी योजना

सध्या पर्यटन क्षेत्र हे वेगाने विकसित होणारे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे. देशातील महत्त्वाची अशी जागतिक दर्जाची सुमारे १०० स्थळे जागतिक दर्जा प्रमाणे विकसित केली जातील, ही बातमी नुकतीच वाचली. भारत देश हा नैसर्गिक साधनसामुग्रीने नटलेला आहे. अनेक अभयारण्ये विकसित झाली आहेत, अनेक जागतिक दर्जाची पर्यटन स्थळे आहेत. दरवर्षी यावर उलाढाल वाढतच आहे. पर्यटकांची वाढती संख्या स्थानिक रोजगाराना प्राधान्य देते. शिवाय उलाढाल मोठ्या प्रमाणात होत असल्याने विकासाला प्राधान्य मिळते. सरकारने पर्यटनासाठी एक विकास आराखडा तयार करण्याचे काम सुरू केले आहे. त्यानुसार आगामी सुमारे पाच वर्षांत देशातील एकूण १०० पर्यटन स्थळे विकसित करण्याचे धोरण आहे. या आराखड्यापासून देशात परदेशी पर्यटनाकडे विशेष लक्ष दिले जाईल. ही योजना कार्यान्वित करण्यासाठी चर्चा सुरू असून त्यांची कार्यवाही काही दिवसांतच केली जाईल. आगामी सुमारे २५ वर्षांच्या काळात म्हणजेच २०४७ च्या दरम्यान भारतात १०० दशलक्ष विदेशी पर्यटक भेटीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. २०२३ मध्ये देशात विदेशी पर्यटक सुमारे ९.२३ दशलक्ष एवढ्या मोठ्या संख्येने आले होते. सध्या आपण अर्थव्यवस्थेच्या बाबतीत सहाव्या क्रमांकावर आहोत. अमेरिका प्रथम, त्यानंतर चीन, जर्मनी, जपान व इटलीचे क्रमांक आहेत. जगात तिसरे स्थान मिळविण्याचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत. भारतात वैद्यकीय उपचार स्वस्त असल्यामुळे अनेक परदेशी रुग्ण भारतात येतात. अशी काही स्थळे सुद्धा विकसित करण्यावर भर देण्यात येणार आहे. पर्यटन विकासाचे सरकारचे हे पाऊल म्हणजे योग्य दिशेने टाकलेले पाऊल आहे, असे वाटते.

**शांताराम वाघ**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# औशातील उड्डाणपुलाच्या जागेची रस्ते प्राधिकरण अधिकाऱ्यांकडून पाहणी

## केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या आदेशानुसार सर्वेक्षण; आशिवचा उड्डाणपुल तर उजनीतील पुलाचा समावेश...



**तभा वृत्तसेवा**
**आसौ, दि.१९ डिसेंबर -**

औसा शहरातील टी पॉईंट व याकतपूर मोड येथे उड्डाणपूल, आशिव पाटी येथे उड्डाणपूल व राष्ट्रीय महामार्गावरील टोलनाका मोठ्या नाल्यांचे बांधकाम आणि उजनी येथील तेरणा नदीवरील उड्डाणपुलाची पुनर्बांधणी करून मोठी नाली बांधकाम करण्यासह इतर अनेक मागण्यांसाठी आमदार अभिमन्यू पवार यांनी देशाचे रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची भेट घेतली त्यांनी दिलेल्या सूचनेनुसार रस्ते प्राधिकरण अधिकाऱ्यांच्या पथकाने मंगळवार दि.१७ रोजी या तिन्ही ठिकाणीची पाहणी करीत सर्वेक्षण केले. यासंदर्भात शुक्रवारी नागपूर येथे उच्चस्तरीय बैठक पार पडणार आहे.

औसा शहरातील टी पॉईंट व याकतपुर मोड येथे राष्ट्रीय महामार्गावर उड्डाणपूल व्हावा. यासाठी औसेकर अनेक दिवसांपासून मागणी करीत होते.

त्याच बरोबर आशिव पाटीवर उड्डाणपूल, आशिव टोलनाक्याजवळ नाली नसल्याने पावसाचे पाणी शेतकऱ्यांच्या शेतात थांबून होत असलेले नुकसान,उजनी जवळील उड्डाणपुलाची पुनर्बांधणी करून मोठी नाली काढण्याची मागणी केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे आमदार अभिमन्यू पवारांनी केली होती.

आमदार अभिमन्यु पवारांनी केलेल्या मागणीला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी तात्काळ प्रतिसाद दिला असून रस्ते प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी मंगळवार दि.१७ रोजी दुपारी भेट दिली. व या तीन ठिकाणची पाहणी केली. त्यामुळे औशाच्या उड्डाणपुलासह इतर कामे मार्गी लागण्याची खात्री निर्माण झाली आहे. औसा शहराच्या मधून जाणाऱ्या ३६१ राष्ट्रीय महामार्गावरील टी पॉईंट येथे वाहतुकीची कोंडी होऊन लोकांना याचा त्रास होत होता. या ठिकाणी उड्डाणपुलाची मागणी लोकांकडून केली जात आहे.

शहरातील लोकांना होणारा त्रास पाहून आमदार अभिमन्यू पवारांनी अधिवेशनाच्या पूर्वसंध्येला नितीन गडकरी यांची भेट घेऊन औशाच्या उड्डाणपुलासह आशिव येथे उड्डाणपूल, आशिव टोलनाक्याजवळ रस्त्याच्या कडेला साचणारे पाणी वाहून जाण्यासाठी मार्ग नसल्याने पावसाचे पाणी शेतात साचून शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत होते. त्याच बरोबर उजनी येथेही बांधण्यात आलेल्या पुलामुळे पाण्याचा निचरा व्यवस्थित होत नसल्याने अडचणी येत होत्या.

या ठिकाणी पुलाची पुनर्बांधणी करून नाल्या काढण्याची मागणी आमदार अभिमन्यू पवारांनी केली. याची तात्काळ दखल घेऊन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी रस्ते प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना पाहणी करून अहवाल सादर करण्याच्या सूचना केल्या. त्यांच्या सूचनेनुसार प्राधिकरणाचे अधिकारी यांनी भेटी देऊन पाहणी केली. या पहाणीचा अहवाल वरिष्ठांना पाठवून त्यावर तात्काळ कारवाई होणार असल्याने आमदार अभिमन्यू पवारांच्या या कामाचे सर्व बाजूनी स्वागत आणि कौतुक होत आहे.

यावेळी भाजपा औसा तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, जिल्हा प्रभारी संतोष मुक्ता, जिल्हा उपाध्यक्ष किरणअप्पा उटगे, सभापती चंद्रशेखर सोनवणे, औसा शहर अध्यक्ष सुनील उटगे, संगायो समितीचे अध्यक्ष काकासाहेब मोरे, लहू कांबळे, शिवजी मुरगे, इंगायो समितीचे तालुकाध्यक्ष सदाशिव जोगदंड, विनोद जाधव, अच्युत पाटील यांच्यासह मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भुगर्भातील स्फोटक आवाजामुळे नागरिकांत घबराहट

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१९ डिसेंबर -**

औसा तालुक्यातील उजनी, आशीव, मातोळा, हसलगण, गुबाळ, सारणी, मंगरूळ या पट्यातील गावात गुरुवार दि.१९ रोजी दुपारच्या सुमारास ११.५६ वा. जमिनीतून स्फोटक आणि गुढ आवाज येताच नागरिक घाबरुन रस्त्यावर आले. प्रशासनाकडे भुकंप झाल्याची नोंद दुपारपर्यंत झाली नाही. मात्र भुकंपासारख्या गुढ आवाजाने नागरिकांतून घबराहट दिसून येत आहे.

रोजच्या प्रमाणे आजही नागरिकांची रेलचेल सुरु होती. मात्र दुपारच्या सुमारास आचानकपणे जमिनीतून स्फोटक आवाज आला.

या आवाजासोबत जमिन हलल्याची जाणिव घरात असलेल्या नागरिकांना झाली. यामुळे घरातील नागारिकांनी घराबाहेर पळ काढला. औसा तालुक्यातील उजनी, आशीव, मातोळा, हसलगणा, गुबाळ, मंगरूळ, नांदुर्गा, सारणी, लिंबाळा, गांजनखेडा व तालुक्यालगतच्या धाराशिव जिल्ह्यातील सास्तूर, नळदुर्ग, आरणी भागात गुढ आवाज झाला. भूकंपाचा आवाज समजून लोक घर- दुकानाबाहेर पडले. अनेक नागरीक हा भूकंपाचा धक्का असल्याची चर्चा करीत आहेत.

पण या आवाजाने व धक्याने कोणतेही नुकसान झाले नाही.

## शेतकऱ्यांना विविध योजनांचा लाभ एका क्रमांकावर मिळणार : उपविभागीय अधिकारी झाडके

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.१९ डिसेंबर -**

निलंगा तालुक्यातील नणंद येथे आज ॲग्रोस्टिक योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना एक क्रमांक दिला जाणार आहे. त्याचे उद्घाटन उपविभागीय अधिकारी शरद झाडके यांच्या हस्ते करण्यात आले.

शेतकऱ्यांना वारंवार अनेक योजनेसाठी सतत आधार कार्ड, बँक पासबुक, मोबाईल नंबर, सातबारा, आठ अ असे द्यावे लागायचे पण शासनाने आता कोणत्याही योजनेसाठी शासनाकडून एक क्रमांक दिला जाणार आहे. त्या क्रमांकाच्या माध्यमातून सर्व योजनांचा लाभ शेतकऱ्यांना मिळणार आहे असे प्रतिपादन निलंगा तालुक्याचे उपविभागीय अधिकारी शरद झाडके यांनी आपले मत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या वेळी निलंग्याचे तहसीलदार प्रसाद कुलकर्णी, तालुका कृषी अधिकारी शिंदे, मंडळ अधिकारी देशमुख, तलाठी ननावरे, कृषी सहायक लासुणे इत्यादी प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. यावेळी युवा सेनेचे उपजिल्हाप्रमुख प्रा. अण्णासाहेब मिरगाळे यांनी आभार व्यक्त केले.

यावेळी सरपंच हरिभाऊ बोळे, उपसरपंच दिगंबर सूर्यवंशी ग्रामविकास अधिकारी भोसले व गावातील असंख्य शेतकरी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची घेतली आ. अभिमन्यू पवारांनी भेट




### जलसंपदा विभागातील विविध विकासकामांचा पाठपुरावा

**तभा वृत्तसेवा**
**औसा, दि.१९ डिसेंबर -**

बेलकुंड उपसा जलसिंचन योजना, तावरजा व तेरणा प्रकल्पासह औसा मतदारसंघातील जलसंपदा विभागातील विविध विकास कामांसाठी आ. अभिमन्यू पवार यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन पाठपुरावा केला. मतदारसंघातील जलसिंचन क्षेत्रातील वाढीच्या दुष्टीने भेट महत्वपर्ण ठरली असून जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांना तात्काळ कार्यवाही करण्याच्या सुचना यावेळी दिल्या आहेत.

बेलकुंड उपसा जलसिंचन योजनेचा निम्न तेरणा प्रकल्पात समावेश करून सुधारित प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यात यावी. नागझरी (ता. लातूर) परिसरातील वाहून जाणारे पाणी तावरजा प्रकल्पात आणण्यासाठी सर्वेक्षण कामास मंजुरी देण्यात यावी. तावरजा नदीवरील सेलू येथील कोल्हापुरी पद्धतीच्या बंधाऱ्याच्या नूतनीकरण कामास विशेष बाब म्हणून मंजुरी देण्यात यावी. निम्न तेरणा प्रकल्पात मोठ्या प्रमाणावर गाळ जमा झाल्याने हक्काचे पाणी कर्नाटक राज्यात वाहून जात आहे, वाहून जाणारे पाणी पुनर्स्थापित करण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी.

तेरणा नदीवरील किल्लारी कवठा बॅरेजच्या बुडीत क्षेत्रात पाण्याखाली गेलेल्या किल्लारी ते एकोंडी रस्त्याचे काम व पुलाचे बांधकाम नव्याने करण्यास मंजुरी देण्यात यावी. तेरणा नदीवरील मदनसुरी बॅरेजच्या बुडीत क्षेत्रात कोकळगाव व परिसरातील शेतीकडे जाणाऱ्या रस्त्यावर पुलाचे बांधकाम करण्यास मंजुरी देण्यात यावी. आशा अनेक मागण्याचा पाठपुरावा आ. अभिमन्यू पवार यांनी केला आहे.

या विषयांसंदर्भात बैठक घेऊन तात्काळ कार्यवाही करण्याच्या सूचना यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर यांना दिल्या आहेत.

## विद्यार्थ्यांनी व्यक्तिमत्व विकासासाठी बालसभेत सहभागी व्हावे : राम तत्तापुरे

**तभा वृत्तसेवा**
**अहमदपूर, दि.१९ डिसेंबर -**



मुलांचा सर्वांगीण विकास प्राथमिक स्तरावरील शिक्षणामध्ये होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी शाळेत होणाऱ्या बाल सभेच्या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग नोंदवावा त्यातूनच खरे बाल कलाकार घडतात, असे आग्रही प्रतिपादन पर्यवेक्षक राम तत्तापुरे यांनी केले. ते यशवंत विद्यालयात वर्ग सहावीच्या वतीने आयोजित बाल सभेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

बाल सभेच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य गजानन शिंदे, व्यासपीठावर सह शिक्षक बालाजी सोनटक्के, सह शिक्षक श्रीधर लोहारे, विजयाताई स्वामी, सविता झोळगीकर यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती. यावेळी चिमुकल्या राजनंदनी बनसोडे, आराध्या पाटील, नंदनी नागरगोजे, अहिरीश सय्यद, संध्या कोम्पले या विद्यार्थ्यांनी विविध समाज सुधारकांच्या जीवनावर प्रकाश टाकणारी भाषणे झाले. बाल सभेचा अध्यक्षीय समारोप प्राचार्य गजानन शिंदे यांच्या भाषणाने करण्यात आला. बाल सभेचा शुभारंभ भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आला. विद्यार्थ्यांना वाचनाची सवय लागावी म्हणून ग्रंथ प्रदर्शन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्रीधर लोहारे यांनी सूत्रसंचालन सुरभी मुसळे, भक्ती बिराजदार, मानसी गुंडेवाड यांनी तर आभार राधिका डुकरे यांनी मानले.

## देवणी तालुक्यात ज्वारीवर किडरोगांचा प्राद्रुभाव

**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.१९ डिसेंबर -**



तालुक्यात गेल्या आठ दिवसापासुन ढगाळ व पावसाळी वातावरण असल्यामुळे चारावर्गीय पिकावर विविध रोगांचा प्रादुर्भाव झाला असून चिकटा, मावा व लष्कळी अळीमुळे चार वर्गीय पिके धोक्यात आली आहेत.

तालुक्यातील मांजरा नदिकाठासह साठवण तलावाची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने ज्वारीचा पेऱ्यात दरवर्षी वाढ होत आहे. शिवाय यावर्षी समाधानकारक पाऊस झाल्याने रब्बीचे क्षेत्र वाढले असुन चारागवर्गीय पिकाचे क्षेत्र वाढले आहे. दशकभरापासुन दुधोत्पादनात वाढ झाल्याने चाऱ्याची गरज म्हणुन एकदल पिकाखालील क्षेत्रात वाढच होताना दिसत आहे.

त्यातुन बडीज्वारी, पिवळीच्या क्षेत्रात मोठी वाढ झाली आहे. मात्र बदलत्या वातावरणात लष्करी अळी, पांढरा व हिरवा मावा, चिकटा रोगाचा प्रादुर्भाव झाला असुन उत्पादनात मोठी घट येण्याची भीती आहे. सध्या वाढ अवस्थेत असलेल्या पिकावर रोंगाचा प्रादुर्भाव झाल्याने पाने पिवळी पडणे, करपणे, अळीच्या प्रादुर्भावाने पिकांचे नुकसान होण्याने पिकक्षेत्र धोक्यात आले आहे.

**रानडुकरांचा मोठा प्रादुर्भाव**

बडीज्वारी पिवळीच्या पिकांना शेतशिवारात रानडुकरांचा मोठा प्रादुर्भाव होत आहे. रात्रीच्या वेळी रानडुकराकडुन बहरात आलेले पिक उद्धस्त केले जात आहे. उसाचे फड रिकामे झाल्याने रानडुकरांनी आपला मोर्चा ज्वारीकडे वळवला असुन त्यामुळे शेतकरी त्रस्त झाले आहेत.

पिकक्षेत्राच्या कडेने तारेचे कुंपण, साड्या लावणे, रात्रीच्या वेळी शेतीत थांबुन डुकरांचा बंदोबस्त केला जात आहे.

## श्यामार्य कन्या विद्यालयात विनोदाचा बादशाह गीतगायन, पाककला, पालक उखाणे स्पर्धा संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.१९ डिसेंबर -**

श्यामलाल स्मारक शिक्षण संस्था संचलित श्यामलाल विज्ञान कला व क्रीडा अकॅडमी प्रस्तुत श्यामलाल कला पंधरवाडा अंतर्गत संस्थाअध्यक्ष सुपोषपाणी आर्य, संस्था सहसचिव अंजुमनीताई आर्य यांच्या मार्गदर्शनातून विनोदाचा बादशहा, गीत गायन व पालक उखाणे स्पर्धा आयोजित करण्यात आलेले होते. या स्पर्धेमध्ये खूप मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक सहभाग नोंदवलेला होता.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी व त्यांना प्रेरणा देण्यासाठी प्रत्येक उपक्रमासाठी खुले व्यासपीठ देण्याचे कार्य निरंतर करत असते.

त्या अंतर्गत विनोदाचा बादशहा, गीत गायन, पालक उखाणे स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या होत्या. या सर्व स्पर्धांमध्ये उत्स्फूर्तपणे खूप मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवलेला होता. चिट्टे शलाका, शेंडगे आरती, कदम सरस्वती, शेवाळे अंबिका, बिरादार मनस्वी, बिरादार अपेक्षा, जाधव अर्पिता, काळे अपूर्वा, पल्लेवाड प्रतिक्षा, नरहारे अमृता, कांबळे साक्षी, बिरादार अक्षरा, बावगे अस्मिता, टेकूळे वैभवी, निलेवाड मोनिका, जाधव अदा, देवरोट्रे अमृता, बिरादार निकिता, लोगरणे सानवी शिंदे, खडके नेहा, बजागरे मुग्धा, केंद्र सृष्टी, शेख बुशरा, स्नेहा मुरतळे, वाघमारे प्रसन्नो या विद्यार्थिनी विनोदाचा बादशहा या उपक्रमामध्ये सहभागी झालेल्या होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अत्तार महेक, शेख आर्थिया या मुलींनी केले.

या स्पर्धेमध्ये खूप मोठ्या संख्येने पालक सहभागी झालेले होत्या. कुलकर्णी विनया, आरने अनुराधा, खांडेकर अनुसया, सत्यभामा कदम, काळे पुजा, पहलेवर अंबिका, गुंडिले रेश्मा, शेवाळे छाया, मुंडकर मनिषा, सुर्यवंशी शाहू, केंद्र रेणुका, माने अरुणा, काळे मिना, शेंडगे राधा, संध्या गोटमुकले, योरे ज्योती, मोरतळे अवंतिका या पालकांनी व सर्व महिला शिक्षकांनी सहभाग नोंदवलेला होता.


कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विनोदाचा बादशहा व उखाणे स्पर्धांचे प्रमुख वनमाला मुक्कावार, पाककला प्रमुख सारिका कुलकर्णी, स्वाती मोरतळे, प्रेमा होन्ना, प्रभा समदरे तर गीतगायन प्रमुख मदन पाटील यांनी काम पाहिले.

स्टेज सजावटचे कार्य पर्यवेक्षक विजयकुमार बैले, सल्लाउद्दीन शेख, शिक्षकेतर कर्मचारी समाधान कांबळे, दिलीप वाघमारे व स्वामी यांनी काम पाहिले.

## आजपासून वलांडी येथे अखंड शिवनाम सप्ताहाची सुरूवात

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.१९ डिसेंबर -**

तालुक्यातील वलांडी येथील राचोटेश्वर स्वामी महाराज यांच्या संजिवन समाधी सोहळ्या निमित्त अखंड शिवनाम सप्ताह व ग्रंथराज परमरहस्य पारयणाची सूरूवात शूक्रवार दि-२० डिसेंबर पासून सूरूवात होत आहे.



'दैनंदिन कार्यक्रम' सकाळी ६ ते ८ श्रीचा अभिषेक, ८ ते ११ ग्रंथराज परमरहस्य पारायण, सायंकाळी ४ ते ६ मन्मथ गाथा, ६ ते ८ शिवपाठ, रात्री ८:३० ते ११ शिवकिर्तन, मध्यरात्री शिवजागर व पहाटे शिवपाठ आदी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

मन्मथ पाटील महाराज जानापूर, संगीता पाटील महाराज नांदेड, तानाजी पाटील महाराज थोटवाडीकर, अनिता हैबतपुरे उदगीरकर, लक्ष्मण विभूते महाराज लातूरकर, शिवराज नावंदे गुरूजी उदगीरकर, निकीता स्वामी करवंदीकर, अमोल लांडगे महाराज बनवसकर, सोमनाथ स्वामी महाराज चांदेगावकर यांच्या किर्तनानंतर सकाळी ६ वाजता श्रीची पालखी १० ते १२ वाजता मिरवणूक प्रसाद किर्तन व महाप्रसाद होईल.

तरी वलांडी व पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे

## ▶▶ क्राईम वृत्त...



### येरोळ जिल्हा परिषद शाळेमध्ये विज्ञान प्रदर्शन संपन्न

**येरोळ, दि.१९ डिसेंबर -**

येरोळ (ता. शिरूरअनंतपाळ) येथील जिल्हा परिषद शाळेत ५२ वे तालुकास्तरीय दोन दिवसीय विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. याचे उद्घाटन पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी अनिल पागे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी केंद्र प्रमुख दामाजी बालूरे, प्रभाकर हिप्परगे, बालाजी भिसे, मुख्याध्यापक धर्मपाल निचळे, उपसरपंच सतिश सिंदाळकर, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष तानाजी घाडगे, प्राचार्य बालाजी महावरकर, प्रभाकर चोचंडे, तुकाराम पाटील उपस्थित होते. या विज्ञान प्रदर्शनात उच्च प्राथमिक इयत्ता ६ ते ८ वीचे एकूण १५ प्रयोग सादर करण्यात आले असून माध्यमिक व उच्च माध्यमिक इयत्ता ९ ते १२ विद्यार्थ्यांचे १४ प्रयोग सादर केले आहेत. यावेळी राहुल गायकवाड, एम.एस. बिरादार, प्रकाश नागटिळक, हामीद शेख, विलास हासबे यांच्यासह तालुक्यातील विद्यार्थी, पालक, नागरिक उपस्थित होते.



### उदयगिरीत देश का प्रकृती परीक्षण अभियान आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**उदगीर, दि.१९ डिसेंबर -**

येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, अंधश्रद्धा निर्मूलन समिती उदगीर व धन्वंतरी आयुर्वेदिक महाविद्यालय, उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने देश का प्रकृती परीक्षण अभियानांतर्गत महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यासाठी बनवलेल्या विशेष एप्लीकेशनची माहिती देण्याविषयीच्या शिबिराचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष रामचंद्र तिरुके, सचिव म.ए. सोसायटी उदगीर हे होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य दत्तात्रय पाटील यांनी प्राध्यापक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आयुर्वेद ही मानवी जीवनशैली बनली पाहिजे, असे मत व्यक्त केले. प्रमुख उपस्थिती अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे कोषाध्यक्ष प्राचार्य विजयकुमार पाटील, बाबुराव माशाळकर तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य राजकुमार मस्के यांनी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.बी.एस. भुक्तरे यांनी केले तर आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. बालाजी होकरणे त्यांनी मानले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.



### कोनाळी येथे रब्बी हंगाम हरभरा पिक शेतीशाळा

**देवणी, दि.१९ डिसेंबर -**

पिकावरील किड व रोग सर्व्हेक्षण सल्ला प्रकल्प अंतर्गत कोनाळी (ना) येथे रब्बी हंगाम हरभरा पिक शेतीशाळा दुसऱ्या वर्गाचे आयोजन तालुका कृषि अधिकारी कार्यालय, देवणी यांच्यावतीने करण्यात आले होते. पिकास कृषि तंत्रज्ञानाची जोड देत पिकाचे उत्पादन वाढावे यासाठी कृषि विभाग शेतीशाळेच्या माध्यमातून काम करत आहे. हरभरा पिकामध्ये किड व रोग होवू नये या करिता एकात्मिक किड व रोग व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. खर्च कमी करण्यासाठी पिकामध्ये कामगंध सापळे, पक्षी थांबे यांचा वापर करून किड नियंत्रण करणे तसेच घरच्या घरी निंबोळी अर्क, दशपर्णी अर्क तयार करणे आणि हरभरा पिकातील मर रोग व्यवस्थापन करण्यासाठी जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्माचा वापर आणि त्याचे फायदे याबाबत मार्गदर्शन गावचे कृषि सहाय्यक पी.बी. कारभारी यांनी केले. सदर कार्यक्रमास उपसरपंच रामदास बिरादार, विष्णू बिरादार, श्रीहरी बिरादार, गोवर्धन पाटील, गंगाधर भोळे, भागवत पोलकर, लक्ष्मीबाई बिरादार, छाया बिरादार इत्यादी शेतकरी उपस्थित होते.

### भाजपाचे दिलीप नाईक यांचे निधन

**निलंगा, दि.१९ डिसेंबर -**

भाजपचे जेष्ठ नेते व दीनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दिलीप गोविंदराव नाईक यांचे बुधवारी (दि.१८) रात्री अल्पशा आजाराने निधन झाले.



मृत्यूसमयी त्यांचे वय ७१ वर्ष होते. भारतीय जनता पक्षाचे संस्थापक सदस्य अशी त्यांची ओळख होती. भाजपात तालुका आणि जिल्हा पातळीवर त्यांनी विविध जबाबदाऱ्या यशस्वीपणे सांभाळल्या. निलंगा शहरालगत असलेल्या दापका येथील दीनदयाल उपाध्याय प्राथमिक आश्रम शाळा व गोविंद नाईक माध्यमिक विद्यालयाचे ते संस्थापक अध्यक्ष होते. गुरुवारी (दि. १९) सकाळी १०.३० वाजता त्यांच्या पार्थिव देहावर निलंगा येथील शांतीवन स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर तसेच निलंगा येथील नागरिक आणि नातेवाईकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. कै. दिलीप नाईक हे दिवंगत स्वातंत्र्यसैनिक गोविंदराव नाईक यांचे पुत्र तथा सुभाष नाईक यांचे कनिष्ठ बंधू होते. मयत दिलीप नाईक यांच्या पक्षात पत्नी, दोन भाऊ, तीन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## पोलीस हक्क संरक्षक संघटनेच्यावतीने आरोग्य शिबिर संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**जळकोट, दि.१९ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील जळकोट येथील ग्रामपंचायत कार्यालयात शनिवार (दि.२१) रोजी कांताबाई बाबुराव इंदुरकर बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित , अखिल भारतीय पोलीस हक्क संरक्षक संघटनेच्या जीवनसेवा ग्रुपच्यावतीने मोफत आरोग्य तपासणी व आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

जळकोट येथील ग्रा. पं. कार्यालयात शनिवारी सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास हे आरोग्य शिबिर पार पडणार आहे. या शिबिरात निजामाबाद येथील डॉ. नागनाथ देवकते व डॉ. एम. चंद्रशेखर व तज्ञ डॉक्टर मंडळी रुग्णांची तपासणी व उपचार करणार आहेत. यात मोफत फेजीवोथेरपी, मोफत मसाज थेरपी, मोफत निसर्गोपचार व बी. पी. शुगर तपासणी करण्यात येणार आहे. तरी जळकोट व परिसरातील नागरिकांनी या मोफत आरोग्य शिबिर व तपासणीचा लाभ घ्यावा. असे आवाहन कस्तुरा कारभारी व गार्डीकर यांनी केले आहे.



### ▸▸ संक्षिप्त वृत्त...



### धनगरवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह सोहळ्यास उत्साहात प्रारंभ

**इटकळ, दि.१९ डिसेंबर -**


तुळजापूर तालुक्यातील धनगरवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला. १६ ते २२ डिसेंबर या कालावधीत सुरू असलेल्या या सोहळ्यात नियमीत काकडा आरती, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, कीर्तन, प्रवचन, हरीनाम, हरिपाठ, हरी जागर असे विविध कार्यक्रम संपन्न होत आहेत. हभप राम महाराज गायकवाड, हभप. विठ्ठल महाराज दिंडेगावकर, हभप. वैभव महाराज कानेगावकर यांच्या किर्तनाचा तर हभप. विष्णु मुंढे, हभप. दगडू जोडभावे, शिवाजी चव्हाण, चव्हाणवाडी, यांच्या प्रवचनाची सेवा संपन्न होणार आहे. २२ डिसेंबर रोजी हभप. आप्पा महाराज दिंडेगावकर यांच्या काल्याचे किर्तन संपन्न होणार आहे. यामध्ये तुळजापूर तालुक्यातील अनेक गावातील भजनी मंडळानी हरी जागरमध्ये सहभाग नोंदवला. यासाठी जय हनुमान भजनी मंडळ व धनगरवाडी ग्रामस्थांनी पुढाकार घेतला आहे.



### राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने नागेंद्र होसाळे सन्मानित

**शिराढोण, दि.१९ डिसेंबर -**

कळंब तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा एकुरका येथील विद्यार्थिप्रिय शिक्षक नागेंद्र होसाळे यांच्या ३२ वर्षातील केलेल्या शैक्षणिक कार्याची दखल घेऊन प्रेरणा फाऊंडेशन ठाणे यांनी नुकताच दि.१५ डिसेंबर रोजी बल्लाळेश्वर मंगल कार्यालय बदलापूर येथे सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल, पुष्पगुच्छ देऊन राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार २०२४ ने गौरविण्यात आले. कार्यक्रमासाठी अतिथी म्हणून रामजित गुप्ता, मोहन शुक्ला, दिलीप नारकर, डॉ. अविनाश म्हात्रे, अभिनेत्री लेखा तोरसेकर, फाऊंडेशनच्या अध्यक्षा दिप्ती गावकर, वैभव कुलकर्णी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमासाठी शीला बाळापुरे, संदीप बाळापुरे, कल्पना बाळापुरे, विद्या होसाळे, निखिल होसाळे यांची आवर्जून उपस्थिती होती.



### जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा येथे क्रीडा सप्ताहाचे आयोजन

**उमरगा, दि.१९ डिसेंबर -**

उमरगा क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय धाराशिव, धाराशिव जिल्हा लाठी असोसिएशन, धाराशिव जिल्हा लेझीम असोसिएशन व जिल्हा परिषद हायस्कूल उमरगा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित फिट इंडिया मोहिम अंतर्गत क्रीडा सप्ताह अति उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक पद्माकर मोरे, लाठी इंडियाचे संचालक महंमद रफी शेख, क्रीडाशिक्षक राजू सरपे, बशीर शेख, विद्यानंद सुत्रावे, संजय रुपाजी, सरिता उपासे, सोनाली मुसळे उपस्थित होते. प्रशालेतील सातवी ते दहावीच्या शंभर मुलींना लाठीचे प्रशिक्षण देण्यात आले तर आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांना लेझीमचा सराव घेऊन मुलांना स्पर्धेची तयारी करण्यात आली. विजयी खेळाडूंचा अभिनंदनपर सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय रुपाजी तर आभार सोनाली मुसळे यांनी मांडले. यावेळी प्रशालेतील विद्यार्थी व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### पोलिस पाटील संघटनेच्या वतीने राजे सावंत यांचा सन्मान

**कळंब, दि.१९ डिसेंबर -**

कळंब तालुक्यातील देवधानोरा येथील राजे सावंत यांना नुकताच अत्यंत मानाचा समजला जाणारा, कळंब तालुका पत्रकार संघाचा कै. गणेश घोगरे यांच्या स्मरणार्थ दिला जाणारा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्याबद्दल पोलिस पाटील महासंघाचे जिल्हाध्यक्ष राजेभाऊ वाघमारे, विक्रम सुतार, प्रदीप वायसे, महेश पांचाळ यांनी सत्कार केला. यावेळी अशोक कुलकर्णी, सागर कांबळे, युवराज पंडित, बापुराव सुरवसे, शहाजी गवळी, वासुदेव वेदपाठक, दिनेश हुंबे, राजेश हुंबे आदी उपस्थित होते.

# कुरनूर प्रकल्पाच्या दुरूस्तीसाठी १४ कोटी रुपयांची तरतुद

▸▸ हिवाळी अधिवेशनात मंजूरी; कामास प्रारंभ.... ▸▸ आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची माहिती....



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१९ डिसेंबर -**

नळदुर्ग परीसरातील कुरनूर मध्यम प्रकल्पातील ५५ वर्ष जुन्या पाणी वितरण व्यवस्थेच्या दुरुस्तीसाठी हिवाळी अधिवेशनात १३ कोटी ९७ लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे. दुरूस्तीअभावी मुख्य कालव्याला अनेक ठिकाणी गळती लागली आहे. त्यामुळे पूर्ण क्षमतेने पाणी वितरण होत नसल्याने साडेतीन हजार हेक्टर क्षेत्राला फटका सहन करावा लागत आहे. वितरण व्यवस्थेत सुधारणा, अस्तरीकरण आणि बांधकाम दुरूस्तीसाठी २९ कोटी रूपये मंजूर झाले आहेत. त्यापैकी १३ कोटी ९७ लाख रुपयांचा निधी उपलब्ध झाल्यामुळे आता १० गावांतील तीन हजार ६४३ हेक्टर क्षेत्राला त्याचा लाभ होणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

कुरनूर मध्यम प्रकल्पाचा मुख्य कालवा आणि वितरीकेमार्फत प्रकल्पाच्या लाभ क्षेत्रातील नळदुर्ग, अणदूर, चिवरी, गुजनूर, खुदावाडी, सराटी, शहापुर, वागदरी आणि बाभळगाव आदी दहा गावांना शेतीसाठी कालव्याद्वारे पाणी दिले जाते. दहा गावांतील तीन हजार ६४३ हेक्टर क्षेत्र या पाण्यावर अवलंबुन आहे. मात्र प्रकल्पाची वितरण व्यवस्था ५५ वर्षे जुनी आहे. आजवर कालव्याचा झालेला वापर, कालव्याची वेळेवर न झालेली दुरूस्ती, अशा अनेक कारणांमुळे पाण्याचा विसर्ग ५० टक्क्यांवर येऊन ठेपला आहे. कालवा भरावातुन, बांधकामातुन अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात गळती लागली आहे. त्यामुळे कालव्याच्या शेवटच्या भागातील शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचण्यास अडचण निर्माण झाली आहे. सिंचन अवर्तनाचा कालावधीतही त्यामुळे वाढ झाल्याने सिंचन क्षेत्रात मोठी घट झाल्याचे तसेच अनेक ठिकाणी शेवटच्या टोकाला कालवा बुजविला गेल्याचेही निदर्शनास आले असल्याचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी सांगितले.

मागील ५५ वर्षांत या कालव्याकडे झालेल्या दुर्लक्षामुळे परिसरातील गावांना त्याचा तोटा सहन करावा लागत आहे. अनेक शेतकरी बांधवांनी उपोषण केले.अनेकांनी आत्मदहनाचे पत्र दिले. रब्बी आणि उन्हाळी हंगामात कालव्याच्या नादुरूस्तीमुळे अनेकांच्या पिकाला पाणी मिळू शकले नाही. त्यामुळे या प्रकल्पातुन पाण्याचा कार्यक्षम वापर व्हावा, सिंचन क्षेत्रामध्ये झालेली घट दूर व्हावी आणि सिंचन क्षेत्र वाढावे, याकरिता वितरण व्यवस्थेच्या अस्तरीकरण आणि त्यावरील बांधकाम दुरूस्तीसाठी महायुती सरकारकडे आपण सातत्याने पाठपुरावा केला होता. राज्याचे तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा जलसंपदा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यासाठी तब्बल २९ कोटी ६५ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला होत. त्यामुळे कालव्याच्या लाभ क्षेत्रातील वरील १० गावांमधील शेकडो शेतकरी बांधवांची मागणी महायुती सरकारमुळे पुर्णत्वास येणार आहे. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या सहकार्याने महायुती सरकारने १३ कोटी ९७ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे. १० किलोमीटर लांबीच्या मुख्य कालव्यासह २४ किलोमीटर लांबीच्या पाणीवितरण व्यवस्थेच्या कामाचे अस्तरीकरण आणि बांधकाम कामाची निविदा यापुर्वीच दि. ७ ऑक्टोबर रोजी जाहीर झाली आहे. मागील ५५ वर्षांपासून दुरूस्तीअभावी रखडलेल्या कुरनुर मध्यम प्रकल्पाच्या कामाला सुरूवात झाली आहे. त्यामुळे या दहा गावातील शेतकर्यांना त्यांच्या हक्काचे पाणी लवकरच उपलब्ध होणार असल्याचा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

> ▸▸ मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातुन निधी उपलब्ध झाल्याने आता कामास सुरुवात झाली असून या रब्बी हंगामात पिकांना पाणी देण्यात येणार असुन हे करत असताना याच्या दुरुस्तीचे आव्हानात्मक काम करण्याचे ठरवले आहे. जेणेकरून शेतकरी बांधवांचे पाण्याअभावी होणारे नुकसान टळणार आहे. हे काम पुर्ण झाल्यानंतर प्रकल्पावर आधारीत असलेल्या सर्व शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत बंद पाईपलाईन द्वारे पाणी देण्याचा प्रकल्प हाती घेण्यात येणार आहे.

## किर्तन हे उद्धाराचे साधन, मनोरंजनाचे नाही : हभप. टिकले गुरुजी महाराज

**तभा वृत्तसेवा**
**खामसवाडी, दि.१९ डिसेंबर -**

किर्तन हे उद्धाराचे साधन असुन यातुन माणुस घडतो. मात्र संप्रदयातही भोंदुगिरी वाढल्याने किर्तनाकडे मनोरंजन म्हणुन समाज भगत असल्याची खंत हभप. शिवराज महाराज टिकले यांनी व्यक्त केली. कळंब तालुक्यातील खामसवाडी येथे अखंड हरिनाम सुरु असून यावेळी महाराज बोलत होते.

हभप. वै.स्व. रामकृष्णभाऊ एडशीकर यांनी पंचावन्न वर्षांपूर्वी खामसवाडीत चालु केलेल्या या हरिनाम सप्ताह सेवा अखंडपणे चालु आहे. सद्याच्या परिस्तितीथ समाजात भोंदुगिरी महाराजांची संख्या वाढत आहे परिणामी किर्तनाकढे समाजाचा दृष्टकोन मनोरंजन म्हणून होत आहे. किर्तनातून माणुस घडतो. सांप्रदाय जर अजून टिकून असेल तर फक्त संतांचे आशीर्वाद शिकवण यामुळे संत नामदेव, संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत एकनाथ, संत गोरोबा काका अशा अनेक संत मंडळींनी जगातील संप्रदायाची घडी बसविली. जगाला संप्रदायाची शिकवण दिली, असे ते म्हणाले. मुलींनी घराण्याचे मुलांनी आई-वडीलांचे संस्कार अंगिकारले पाहिजेत, शिक्षणाचा उपयोग सतकर्णी लागला पाहिजे अशी आशा त्यांनी व्यक्त केली. अखंड हरिनाम सप्ताहातील बुधवार त्यांची पाहिली सेवा होती. तत्पूर्वी हभप. टिकले गुरुजी महाराज यांच्या हस्ते कलशपुजन झाले. तर हभप. भारत महाराज शेळके यांच्या हस्ते गाथा पुजन करण्यात आले.

सद्यस्थितीत सगळीकडे थंडीची तीव्रता जास्त आहे. या हरिनाम सप्ताहात महिलांची संख्या लक्षणीय होती.

## श्री तुळजाभवानी मातेचा आशीर्वाद निश्चितच माझं बळ वाढवणार : ममता सपकाळ

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१९ डिसेंबर -**

तुळजापूरच्या आई भवानीचा पदस्पर्श झालेली कवड्यांची माळ आज आशीर्वाद म्हणून पदरात आली आहे. हा आशीर्वाद निश्चितच माझं बळ वाढवणार आहे, अशी भावना समाजसेविका ममता सिंधुताई सपकाळ यांनी व्यक्त केली.



नवीन वर्षाच्या सुरुवातीला तुळजापूरचा योग निश्चित झालाय. आई म्हणजेच सिंधुताई सपकाळ अनेकदा तुळजाई नगरीत आल्या होत्या. माईंना मानणारा खूप मोठा वर्ग मराठवाड्यात आहे. मी कधीही तुळजाई नगरीत आले नाही. प्रथमच मला हिरकणी पुरस्काराच्या निमित्ताने आई श्री तुळजाभवानी मातेच्या दर्शनासह माई परिवाराच्या सर्व सदस्यांना भेटायची ओढ लागली आहे अशी भावना ममता सिंधुताई सपकाळ यांनी बोलून दाखवली. श्री क्षेत्र तुळजापूर येथे राज्यस्तरीय हिरकणी पुरस्कार सोहळा जानेवारी महिन्यात पार पाडतो आहे. या सोहळ्याचे निमंत्रण देण्यासाठी हिरकणी पुरस्कार समितीचे सदस्यांनी मांजरी पुणे येथील माईंच्या समंती बाल निकेतन संस्थेत जाऊन ममताताईंची भेट घेतली.

ममताताई सपकाळ यांचा आई तुळजाभवानी मातेचा आशीर्वाद रुपी कवड्याची माळ, प्रतिमा देऊन सत्कार केला. याप्रसंगी पुजारी नगर फाऊंडेशन अध्यक्ष गणेश पुजारी, गोविंद डोंगरे, बाबा घोंगते, शिवशंकर भारती, हरिदास मदने, नागेश नरवडे, मुख्य संयोजक अनिल आगलावे उपस्थित होते.

## 'लांडगा आला रे... लांडगा आला' प्रमाणे बिबट्याचे होऊ नये; सुज्ञ शेतकऱ्यांची अपेक्षा

### अफवेवर विश्वास ठेवू नका : वन विभाग तुळजापूर

**तभा वृत्तसेवा**
**मंगरूळ, दि.१९ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील कसई, चव्हानवाडी, सरडेवाडी, होनाळा यासारख्या अनेक गावांत गेल्या २ डिसेंबर रोजीच्या मध्यरात्रीपासून बिबट्या आढळून आल्याची चर्चा सोशल मीडियाच्या माध्यमातून जोर धरू लागली आहे.

याबाबत कुठलेही ठोस पुरावे वन विभागाच्या अधिकाऱ्यांना परिसराची पाहणी व शहानिशा केली असता उपलब्ध झाले नसल्याचे त्यांना संपर्क साधून माहिती घेतली असता अफवेवर विश्वास ठेवू नका. अफवा पसरवनार्यावर योग्य ती कारवाई करू असा सज्जड इशाराही वन परिक्षेत्र अधिकारी तुळजापूर यांनी दिला आहे. तसेच



रात्रीच्या वेळी लाठी काठी, बॅटरी, रेडिओ किंवा मोठ्या आवाजाचा ध्वनिक्षेपक जवळ बाळगून शेतकऱ्यांनी रात्रीचे दैनंदिन कामकाज करावे व शेतकरी शेतमजूर नागरिकांनी सतर्कता बाळगावी, असे आवाहन केले आहे. बिबट्या हा हिंस्र प्राणी असून शक्यतो.

हा प्राणी मोठे जंगल, दरी खोऱ्यात वावरणारा असून आपल्या तुळजापूर तालुक्यातील कुसळी भागात आढळणे दुरापास्त असल्याचेही तज्ज्ञांचे मत आहे. गेल्या दोन तीन महिन्यापूर्वी आपसिंगा फॉरेस्ट येथे आढळून आलेली एकमेव घटना सोडल्यास अशी कुठलीही घटना घडल्याचे निष्पन्न झाले नाही.

यामुळे जशी लहान मुलांना आपण 'लांडगा आला रे लांडगा आला' ही बालकथा ऐकवतो तशी गत बिबट्याची होऊ नये म्हणजे झाले, अशी चर्चा शेतकरी वर्गातून होऊ लागली आहे.

## कागदी कपांवर बंदी घालण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१९ डिसेंबर -**

कॅन्सर सारख्या जीवघेण्या आजारांना कारणीभुत ठरत असलेल्या चहाच्या कागदी कपावर इतर जिल्ह्याप्रमाणे धाराशिव जिल्ह्यातही प्रशासनाने तात्काळ बंदी घालावी, अशी मागणी नागरीकांमधुन होत आहे.



चहाचे कागदी कप बनविताना त्यामध्ये बीपीए नामक केमिकलचा उपयोग मोठ्या प्रमाणात केला जातो. सदरील कागदी कपात गरम चहा किंवा पाणी घातल्यास कपाच्या आतील मायक्रो प्लास्टिक वितळते आणि त्या कपातुन चहा घेत असतांना लाखो मायक्रो प्लास्टिकचे कण माणसाच्या पोटात जातात आणि यामुळेच आज हजारो नागरीकांना कॅन्सरसारख्या दुर्धर आजाराला सामोरे जावे लागत असल्याचे उघड होत आहे त्यामुळे धाराशिव जिल्हाधिकाऱ्यांनी तात्काळ एक आदेश काढुन चहाच्या कागदी कपावर जिल्ह्यात बंदी घालावी अशी मागणी होत आहे.

आज सर्वत्र हॉटेलमध्ये सगळीकडे चहासाठी कागदी कपच वापरले जात आहेत. वास्तविक पाहता फार पुर्वीच या चहाच्या कागदी कपावर बंदी घालणे आवश्यक होते. आज मोठ, मोठे अधिकारी कधीही कागदी कपातुन चहा पीत नाहीत त्यांच्यासाठी पारंपारीक कप आणि बशी उपलब्ध असते. किंवा काचेच्या ग्लासामधुन ही मंडळी चहा पितात त्यामुळे चहाच्या कागदी कपाचा धोका किंवा गांभीर्य यांना कधीच कळणार नाही.

आज राज्यातील कांही जिल्ह्यात त्या, त्या जिल्ह्याच्य जिल्हाधिकाऱ्यांनी चहाच्या कागदी कपावर बंदी घातली आहे. त्यामुळे चहाच्या कागदी कपाचे धोके लक्षात घेऊन धाराशिव जिल्ह्यातही जिल्हा प्रशासनाने तात्काळ चहाच्या कागदी कपावर बंदी घालावी, अशी मागणी होत आहे.

## येरमाळा पोलिस ठाणे गुन्ह्यातील दोन गुन्हेगार तीन महिन्यासाठी तडीपार

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१९ डिसेंबर -**

येरमाळा पोलिस ठाणे गुन्ह्यातील दोन गुन्हेगारांना तडीपार प्रस्तावाला वरिष्ठ मंजुरी दिल्याने दोन गुन्हेगारांना जिल्ह्यातून तीन महिन्यासाठी तडीपार करण्यात आले आहे. याशिवाय येडेश्वरी देवी मंदिरावरील सुरट, टायगर गेम आदी वादातून घडलेल्या गुन्ह्या नंतर ते गेम पूर्णपणे बंद करण्यात आले आहेत.

पोलीस स्टेशन येरमाळा हद्दीतील गुन्हेगार रामेश्वर शिवाजी शिंदे (रा. पानगाव, ता. कळंब) बालाजी भाऊ शिंदे (रा. चोराखळी, ता. कळंब) यांच्यावरील मुंबई पोलीस कायदा कलमान्वये प्रमाणे प्रस्ताव उपविभागीय कार्यालय कळंब येथे पाठविण्यात आला होता. सदरच्या दोन्ही प्रस्तावातील प्रतिबंधात्मक इसम यांना धाराशिव जिल्ह्यातून तीन महिन्याकरिता हद्दपार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. येथील श्री. येडेश्वरी देवी मंदिरावर मंगळवार, शुक्रवार, रविवार दिवशी सुरट, टायगर गेम अशा जुगाराचे प्रमाण वाढले होते. झुगार खेळवताना होणाऱ्या गर्दीचा फायदा घेऊन पाकीट मारीचे प्रकार वाढले होते. जुगारात हातचलाखीने भाविकांचे खिसे रिकामे केले जात होते. जुगारात पैसे गेल्यानंतर होणाऱ्या वादातून मारामारीचे प्रमाण वाढले होते.

ऑक्टोबर महिन्यात २४ तारखेला पुण्यातील महिला भाविक, भाविकांना पॉकेट चोरी नंतर झुगाऱ्यांकडून मारहान झाल्या प्रकरणी सहा जनावर गुन्हा दाखल होता. या प्रकरणाची दैनिक 'तरूण भारत' ने बातमी प्रसिद्ध केली होती. तसेच याचे व्हिडिओ क्लिप राज्यभरात, भाविकात व्हायरल झाल्याने प्रकरण चांगलेच चर्चेत आल्याने पोलीस प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. शिवाय देवस्थानाची बदनामी होतं असल्याने देवस्थान ट्रस्ट, पोलिसांनी हे प्रकार बंद करावे अशी भाविकातून मागणी होतं होती.

त्यावर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस अधिकारी महेश क्षिरसागर यांनी ॲक्शन घेऊन मंदिर परिसरातील जुगार बंद केला असल्याने ग्रामस्थ व भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.



> श्री. येडेश्वरी मंदिरावरील जुगार प्रकाराबाबत गेल्या आठवड्यात झालेल्या येरमाळा पोलिस ठाणे वरिष्ठ कार्यालयाच्या दोन्ही तपासणीत पोलिस अधीक्षक संजय जाधव,उपविभागीय अधिकारी संजय पवार यांचे मार्गदर्शन घेऊन कारवाई केली असुन भविष्यात असे प्रकार मंदिर परिसरात दिसणार नाहीत.
>
> **- महेश क्षिरसागर, सहायक पोलिस निरीक्षक**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# आरोग्य अधिकारी कार्यालयातील लेखापालास लाच घेताना अटक

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,दि. १९ डिसेंबर**

आरोग्य सेवकाची तीन महिन्याची पगार काढण्यासाठी दीड हजार रुपयांची लाच घेणाऱ्या भोकर येथील तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयातील कंत्राटी लेखापालास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले.

भोकर येथील आरोग्य अधिकारी कार्यालयातील आरोग्य सेवकाचे मागील तीन महिन्यापासूनचे पगार देयके प्रलंबित होते. हे देयके काढून देण्यासाठी कंत्राटी लेखापाल आशिष गंगाधर मोगले यांनी



त्यांच्याकडे लाचेची मागणी केली. याप्रकरणी तक्रारदाराने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली असता लाच लुचपतप्रतिबंधक विभागाने दिनांक ४ डिसेंबर रोजी लाच मागणीची पडताळणी केली. यात कंत्राटी लेखापाल आशिष मोगले यांनी लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर दि. १९ डिसेंबर रोजी लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने सापळा रचून आशिष मोगले यांना १ हजार ५०० रुपयांची लाज घेताना रंगेहात पकडले. या प्रकरणी भोकर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. ही कारवाई लुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस निरीक्षक माधुरी यावलीकर, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र मांजरमकर, पोलीस हवालदार शेख रसूल, रापतवार, रमेश नामपल्ले यांच्या पथकाने केली.

# गृहमंत्री अमित शहांचे वक्तव्य कामकाजातून काढण्याची मागणी

## मुदखेड काँग्रेस कमिटीच्या वतीने निवेदन वक्तव्याचा निषेध!

**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,दि. १९ डिसेंबर**

गृहमंत्री अमित शहांनी देशाच्या संसदेत महामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्याविषयी केलेल्या आपत्तीजनक टिप्पणीचा निषेध दिल्लीपासून गल्लीपर्यंत होत असताना संबंधित वक्तव्य संसदेच्या कामकाजातून काढून टाकण्यात यावे अशा आशयाचे निवेदन तालुका काँग्रेस कमिटी कडून तहसीलदारास देण्यात आले आहे.

काँग्रेस तालुका व शहर कमिटीच्या वतीने पक्ष कार्यालयासमोर ता १९ (गुरुवार) गृहमंत्री अमित यांच्या



वक्तव्याचा निषेध नोंदविण्यात आला. यावेळी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सरकारच्या विरोधात घोषणा देत डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या समर्थनार्थ उद्घोषणा केल्या. यासंदर्भात काँग्रेस पक्षाच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले. यावेळी काँग्रेस तालुकाध्यक्ष प्रताप देशमुख, शहराध्यक्ष कैलास गोडसे,उपाध्यक्ष राजेश चौदंते, माजी नगराध्यक्ष राजबहादूर कोत्तावार, माजी उप नगराध्यक्ष लक्ष्मण देवदे, मोहमद गौस, करीम खान साहेब, गजानन संबोड, सूर्यकांत चौदंते, अविनाश चौदंते, मोईन खान, गिरीश कोत्तावार, मुजिब पठाण, रमेश बोडखे, विनोद चौदंते, मधुकर देवणे, अमोल चौदंते, अज्जगर हुसेन, बालाजी कोलते, बालाजी सूर्यवंशी, ऋषिकेश चौदंते, राधेश्याम ढगे, प्रशांत पाटील मुंगल आदी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### गुंडाबाई चिंतले यांचे निधन

**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील जेष्ठ महिला



गुंडाबाई विठ्ठलराव चिंतले(८५) यांचे दि.१८ डिसेंबर रोजी बुधवारी वृध्दापकाळाने सकाळी ११ वाजता निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी सायंकाळी ६ वाजता शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात दोन मुले,सुना,तीन मुली, जावई,नातवंड असा मोठा परिवार आहे. आदमपूर परिसरातील भूतपूर्व वृत्तपत्र प्रतिनिधी मुकुंद चिंतले यांच्या आई तर आदमपूर प्राथमिक आरोग्य केंद्रातील आशा वर्कर सौ.कुसुमताई चिंतले यांच्या त्या सासू होत.

### नबिसाब(बाबू) पिंजारी यांचे निधन



**आदमपूर**-बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील रहिवासी तथा राज्य शासनाच्या पाणी पुरवठा विभागातील सेवानिवृत्त पंप ऑपरेटर नबिसाब (बाबू) घुडूसाब पिंजारी(७०) यांचे दि.१९ डिसेंबर रोजी गुरूवारी सकाळी ११ वाजता वृध्दापकाळाने निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर दि.१९ रोजी गुरूवारी सायंकाळी ८ वाजता आदमपूर कब्रस्तानात शोकाकुल वातावरणात दफनविधी करण्यात आला. त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले, सूना,दोन मुली,जावई, नातवंड, भाऊ, भावजय, पुतणे असा मोठा परिवार आहे.आदमपूर परिसरातील खाजगी विद्युत कामगार हुजूर पिंजारी यांचे वडील होत.आदमपूर ग्रामपंचायत मधील ऑपरेटर सलीम पिंजारी यांचे काका होते.

### गंगाबाई मोकमपल्ले यांचे निधन

**नायगाव**-बिलोली तालुक्यातील डोणगाव (खु) येथील रहिवासी ज्येष्ठ



महिला गंगाबाई नरसप्पा मोकमपल्ले वय ८५ वर्ष यांचे आज दि् १९ डिसेंबर २०२४ रोजी गुरुवारी सकाळी १० वाजता निधन झाले आहे. स्व. गंगाबाई मोकमपल्ले यांच्या पश्चात चार मुली,जावाई सुना, नातू,पंतू असा मोठा परिवार आहे. गंगाबाई मोकमपल्ले यांच्या पार्थिवावर आज गुरुवारी सायंकाळी ४ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यविधीस गावातील नागरिक पाहुणे मित्रमंडळी उपस्थित होते.

# शिरड येथे किराणा दुकानात पण मिळत आहेत गॅस सिलेंडर

**तभा वृत्तसेवा**
**निवघा (बा),दि. १९ डिसेंबर**


हदगाव तालुक्यातील शिरड येथे गॅस ठेवण्याची कोणतीच परवानगी नसताना पण किराणा दुकानांमध्ये मिळत आहेत खुलेआम पद्धतीने कुठलीच एजन्सी नाही विनापरवाना गॅस ठेवत आहेत किराणा दुकानांमध्ये यांना जबाबदार कोण गॅसचा स्फोट झाला तर यांना जबाबदार कोण गॅसच्या गाडीवाले पण गॅस बुक होऊन पण गॅस सर्वसामान्य नागरिकांना देत नाहीत गॅस संपला उद्या येईल अशी उत्तर देत आहेत एका गॅस मागे पन्नास ते शंभर रुपये घेऊन खुमेआम पद्धतीने विक्री किराणा दुकानदार करीत आहेत सर्वसामान्य नागरिकांची लूट करत आहेत असा किराणा दुकानदाराला आळा कधी बसणार असे सर्वसामान्यातून बोलले जात आहे. गॅस एजन्सी चालकाने शिरड येथे खुलेआम पद्धतीने गॅसची विक्री थांबावी आणि अधिकृत गॅस एजन्सी द्यावी अशी जनतेतून मागणी होत आहे.

# विद्युत तारेच्या शार्कसर्किटमुळे ऊस जळून खाक

**तभा वृत्तसेवा**
**नायगाव,दि. १९ डिसेंबर**

नायगांव तालुक्यातील अंतरगाव येथील(गट नं. ४४७) मधील अल्प भुधारक शेतकरी संतोष माधवराव शिंदे , प्रभाकर यशवंतराव तोडे यांच्या शेतातील विद्युत तारेच्या शॉर्टसर्किटने चार एकरातील ऊस जळून खाक झाल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाली आहे

नायगांव तालुक्यातील बरबडा ते अंतरगाव,इज्जतगांव येथील शेतकऱ्याच्या ऊसाच्या



शेतातून मध्यभागामधून विद्युत वाहिनीची तार गेली असून. दिनांक १८/१२/२०२४ रोजी रोज बुधवारी दुपारनंतर या विद्युत लाईनच्या तारांच्या घर्षणाने शॉर्ट सर्किट होऊन.ऊसात आगीची ठिणगी पडली. त्यामुळे ऊसाला तात्काळ आग लागून शेतातील सर्व ऊस जळून खाक झाला आहे. दरम्यान ही आग विझविण्यासाठी सभोवतालच्या सर्व शेतकऱ्यांनी शर्तीचे प्रयत्न केले. परंतु आगीने रौद्ररूप धारण केल्याने आग काही आटोक्यात येवू शकली नाही आणि सदरील शेतकऱ्याचा जवळपास ४ एकर ऊस जळून पुर्ण खाक झाला.

यामध्ये शेतकऱ्याचे लाखो रुपयांचे नुकसान झालेअसून यावेळी नायगांव तहसील कार्यालयाच्या महसूल अधिकाऱ्यांनी दोन्ही शेतकऱ्याच्या शेतातील नुकसानीच तात्काळ पंचनामा केला असून. सदरील नुकसान भरपाई महावितरण कंपनी ने द्यावे अशी मागणी संबंधीत शेतकऱ्यां ने महसूल विभागाकडे केली आहे.

# अर्धा रब्बी हंगाम गेला तरी डेरला लिफ्टला पाणी पाळ्यांचे नियोजन नाही : शिवाजी सोनखेडकर

**तभा वृत्तसेवा**
**सोनखेड,दि. १९ डिसेंबर**

डेरला लिफ्ट विष्णुपुरी प्रकल्प प्रशासनाच्या दुरुस्तीच्या नावाखाली उदासीन भूमिकेमुळे अर्धा रब्बी हंगाम गेला तरी पाणी पाळ्यांचे नियोजन नाही तरी तात्काळ ७ पाणी पाळ्यांचे नियोजन करण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मराठवाडा शेतकरी प्रतिनिधी प्रा. शिवाजी मोरे सोनखेडकर यांनी केली आहे.

आशिया खंडातील सर्वात मोठा उपसा जलसिंचन प्रकल्प म्हणून विष्णुपुरी जलसिंचन प्रकल्पाला ओळखले जाते. विष्णुपुरी जलसिंचन प्रकल्पातील मुख्य कालवा पांगरा शाखा व डेरला लिफ्ट ही पहिली लिफ्ट योजना आहे. या दोन्हीही शाखेला आज अर्धा हंगाम रब्बी होऊन गेला तरी पाणी पाळ्यांचे नियोजन प्रकल्प कालवा सल्लागार समितीचे सचिव अधीक्षक अभियंता जलसंपदा सर्कल नांदेड यांनी केले नाही. दुरुस्तीच्या नावाखाली वेळकाढूपणा केला जात आहे व एकीकडे पाणी पाळ्यांचे नियोजन न करता दुसरीकडे माती काम करण्याकडे जास्त भर दिला जात आहे आणि यांत्रिकी कामाला तसेच मेकॅनिकल कामांना व हायड्रोलिक कामांना दुर्लक्षित केले जात आहे. त्यांच्या या अनियमिततेमुळे शेतकरी वर्गामध्ये संतापाची लाट आहे. खरीप हंगामामध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे खरीप हंगाम हातचा गेला आहे. आता रब्बी हंगामावर शेतकऱ्यांची आशा असताना जलसंपदा प्रशासनाच्या उदासीन भूमिकेमुळे व सिविल आणि मेकॅनिक हायड्रॉलिक विभागातील असमन्वयामुळे आजपर्यंत डेरला लिफ्टला पाणी पाळ्यांचे नियोजन केले गेले नाही. तसेच अधीक्षक अभियंता सिविल यांच्या उदासीन भूमिकेतून मेकॅनिक विभागाला निधी देत नाहीत व विष्णूपुरीच्या मुख्य शाखा कालवा पांगरा शाखेलासुद्धा पाणी पाळ्यांचे नियोजन केले नाही. एकीकडे अधीक्षक अभियंता हे विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली विष्णुपुरी प्रकल्पाच्या कालवा सल्लागारची बैठक झाली असं सांगतात व त्यामध्ये सात पाणी पाळ्या देणार असल्याचे तोंडी बोलतात, परंतु प्रत्यक्षात कृती काही करत नाही. तरी मुख्यमंत्र्यांनी विष्णुपुरी प्रकल्पाच्या मुख्य शाखा कालवा पांगरा तसेच डेरला लिफ्टला पाणी पाळ्यांचे नियोजन करण्याचे आदेश देऊन सुशासनाचा प्रत्यय द्यावा, अशी मागणी निवेदनाद्वारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मराठवाडा शेतकरी प्रतिनिधी प्रा. शिवाजी मोरे सोनखेडकर, माधवराव देसाई, गोविंदराव मुकदम, बालाजीराव जाधव पिंपळवाडीकर, लिंगोजीराव पाटील हरबळकर, शिवाजीराव पाटील शिंदे यांनी केली आहे

# नुतन मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांना शहरातील विकासाचे मोठे आव्हन

**तभा वृत्तसेवा**
**लोहा,दि. १९ डिसेंबर**

नव्याने रुजू झालेले मुख्याधिकारी श्रीकांत लाळगे यांना शहरात सर्वसामान्याचा विकास करणे मोठे आव्हान आहे. त्यांनी इतरत्र केलेल्या नगर परिषदेतील केलेल्या कामाच्या चुनूकवरुन दिसुन येते



श्रीकांत लाळगे यापुर्वी लोकसंख्येने मोठे शहर आसलेल्या नगर पालिकेत काम केले आशा चर्चेच्या बैठितून विस्वास दिला मी त्या नगरपालिकेच्या विकासासाठी १००/२०० कोटींच्या कामाचे प्रस्ताव तयार करुन लोकप्रतिनिधीला दिले आणि त्या कामाची जुळवाजुळव करुन कॉन्ट्रॅक्टदाराला जोडुन दिलो असे म्हटले.काम करण्याची माझ्यात चुनूक आहे असे सांगण्याचा पर्यंत करत होते,पण याठिकाणी आपनास विकासाला अडथळा निर्माण करणाऱ्या चौकडीला थोडे लांब ठेऊन प्रभागात फेरफटका मारुन विकासाचा अजिंठा तयार केलास अगदी सोपे जाईल .आपनापुढे विकासाचे फार मोठे अहवान आहे.अनेक वर्षे शहरातील घाण पाण्याचा योग्य निचरा होण्याऐवजी शहरातच गटारे दिसुन येतील , यावर आपन कोणता प्रस्ताव तयार करुन शहर गटार मुक्त करणे हि आपली चुनूक दिसुन येईल ,अनेक भागातील प्लाटींगचे एन.ऐ झालेले आहेत पण काही भागात जमिण भुखंड खरेदी करण्याच्या अगोदरच त्या प्लाटचे एन.ऐ. झालेल्या प्लाटधारकाला एन.ऐ.चे प्रमाणात पत्र दिले जाते हा फाईल घोटाळ्याला पावबंद बसेल काय ? , ज्या परिसरात वसाहात नाही त्याठिकाणी ५० कोटी रुपायाचा निधी खर्च झाला आहे ,पण ज्या परिसरात भरगच्च वसहात आहे त्या ठिकाणच्या रस्त्यावर पंधरा टोपले मुरुम टाकले नाही त्या परिसरातील सर्वसामान्याना सुविधा मिळतील काय ? हाळदव परिसरातील कचरा डेपोवर न.पा. लाखो रुपये खर्च करुन ते ही आजच्या घडीला बेदखल आहे. कचरा डेपो कर्मचारीलाच माहित नाही. शहरातील अर्ध्या शहराचा कचरा पालम ते कंधार रोडवर टाकला जातो, आणि उरलेला कचरा नांदेड ते लातुर रोडच्या कडेला टाकला जातो.

# मराठा समाजाच्या वतीने बीड येथील घटनेचा निषेध



**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,दि. १९ डिसेंबर**

मस्साजोग ता केज जि.बिड येथील सरपंच संतोष देशमुख यांच अपहरण करुन निर्घुण हत्या करण्यात आली. या घटनेचा उखळ मार्फत चौकशी करण्यात यावी अशी मागणी सकल मराठा समाजाच्या वतीने उपजिल्हा अधिकारी कार्यालय देगलूर व उपनिरीक्षक पोलीस स्टेशन देगलूर याना निवेदना व्दारे करण्यात आली.

# साईनाथ महाराजांचे समाजोपयोगी कार्य हे सर्वधर्मीयासाठी प्रेरणादायी : शवप्रकाश मुळे

**तभा वृत्तसेवा**
**माहूर दि.१९ डिसेंबर**

माहूरगडावरील श्री आनंद दत्त धाम मठाचे मठाधीश राष्ट्रसंत दभप साईनाथ महाराज वसमतकर यांच्याकडून वर्षभर सतत विविध धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, प्रबोधनात्मक ,आपत्तीकाळात सहकार्यात्मक या जनकल्याणकारी कार्यक्रमासह भगवान श्री दत्तात्रेय यांच्या जन्मोत्सवानिमित्त भरणाऱ्या श्री दत्त जयंती यात्राकाळात साईनाथ महाराजांनी गरजु रुग्णांना जीवनदान ठरणारे रक्तदान शिबिराचे आयोजन करून धार्मिक कार्याला समाज कार्याची जोड दिल्याने त्यांचे हे कार्य सर्वधर्मीय नागरिकांसाठी जीवनदायी तेवढेच प्रेरणादायी आहे ! असे प्रतिपादन रक्तदान शिबिराचे उद्घाटक माहूर पोलीस ठाण्याचे पोनी शिवप्रकाश मुळे यांनी केले.

श्री दत्त जयंती यात्रेनिमित्त माहूरगडावरील आनंद दत्तधाम आश्रम येथे दि.१५ डिसेंबर रोजी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.शिबिराचे उद्घाटक म्हणून ते बोलत होते. पुढे बोलताना पोनी मुळे म्हणाले कि,विविध धार्मिक तथा सामाजिक कार्यासाठी अग्रस्थानी असलेले श्री आनंद दत्त धाम आश्रम हे समाज धार्मिक सामाजिक कार्यासाठी ओळखले जात असून, मठाधिष राष्ट्रसंत द भ प साईनाथ महाराज



वसमतकर यांनी अवलंबविलेल्या सप्तसूत्री अंतर्गत स्वच्छता, आरोग्य, वृक्षारोपण, व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, शिक्षण, देशप्रेम आणि भक्तिमार्ग यामध्ये आता जीवनदान उपक्रमा अंतर्गत रक्तदान शिबिराचे आयोजन या महत्त्वाच्या कार्यक्रमाची देखील भर पडली आहे. महाराजांच्या मठाकडून राबविण्यात येत असलेल्या विविध समाजोपयोगी कार्यामुळे माहूरगडच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.राष्ट्रसंत द भ प साईनाथ महाराज यांनी रक्तदान शिबिराचे आयोजन करून इतर धार्मिक स्थळं, प्रार्थनास्थळांपुढे नवीन आदर्श उभा केला असल्याने भाविक भक्तांसह नागरिकांतून समाधान व्यक्त केले जात आहे. त्यांच्या या कार्यामध्ये सर्वधर्मीय नागरिकांसह अनेक मान्यवर जोडली जात आहेत.त्यामुळे मठ परिसरात येणाऱ्या भाविकांचा देखील प्रचंड ओघ वाढला असल्याचे दिसून येत आहे. परिणामी भाविकांच्या सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विकास कामा अंतर्गत शासकीय मदतीचीही तेवढीच गरज असल्याचे पोनि.मुळे यांनी यावेळी बोलताना मत व्यक्त केले.

श्री दत्त जयंती निमित्त देवदर्शनासाठी गडावर लाखाच्या जवळपास येणाऱ्या भाविकांना वेगवेगळ्या अन्नपदार्थांचा महाप्रसाद भरविला जातो. यावर्षी मठावर आलेल्या जवळपास ६० हजार भाविकांना पुरणपोळी, तूप, आमरसाचा महाप्रसाद देण्यात आला. सोबतच शहरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. यावेळी राष्ट्रसंत द भ प साईनाथ महाराज यांचे उपस्थितीत भाऊराव पाटील हडसणीकर,जवाहरलाल जयस्वाल, शेषराव पाटील, बबनराव जगाडे संभाजीनगर, दत्ता पाटील, गोविंदराव ठोंबरे कारभारी परभणी, पुंडलिक हुंबे सावकार, सुधीर जाधव, मधुकरराव शेंगोळे, वैजनाथ भुजबळ, बालाजी जाधव, गजानन कलाने, लक्ष्मण ढगे, अविनाश हुलकाने यासह अनेक भाविक भक्तांनी सहकार्य केले.

# अर्धापूर दिवाणी न्यायालयात नो पार्किंग मधील वाहनांवर होणार दंड



**तभा वृत्तसेवा**
**अर्धापूर,दि. १९ डिसेंबर**

अर्धापूर दिवाणी व फौजदारी न्यायालय येथे न्यायालयाच्या प्रांगणात पक्षकार व विधीज्ञ यांच्या वाहने प्रवेश द्वार वर व इतर ठिकाणी बेशिस्त पणे लावली जात आहेत हे जिल्हा मुख्य न्यायाधीश यांच्या निदर्शनास आले असता अर्धापूर न्यायालयाचे न्यायाधीश क्यु. आर. सय्यद साहेब यांनी छे पार्किंग चे फलक लावले असता या फलकाचे उद्घाटन अँड शेख आमेर शेख सगीर अर्धापूरकर यांचे हस्ते करण्यात आले या प्रसंगी जेष्ठ विधीतज्ञ अँड ए.आर.चाऊस व अँड डि.बी. दासे न्यायालयातील वकील ॲड सचिन देशमुख,अँड. सय्यद इम्रान, अँड गजानन पत्रे, अँड. गौरव सरोदे, अँड. बालाजी नवले, ॲड मगरे, ॲड मंगेश सरोदे अँड. देवडे व सोबत न्यायालयीन कर्मचारी माळवे मॅडम,लाठकर,तेलंग,मोहिते, कदम उपस्थित होते. तरी सर्वांना आदेशीत करण्यात येते की, दोन चाकी व चार चाकी वाहनासाठी न्यायालयात पार्किंग ची व्यवस्था करण्यात आलेली आहे तरी पक्षकार व विधीतज्ञ यांनी आपली वाहने पार्किंग लावावी.

# बोथी गावात स्व.गोपिनाथराव मुंडे यांची जयंती

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,दि. १९ डिसेंबर**

उमरी तालुक्यातील बोथी या गावात महादेव मंदिर परिसरात स्व.लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांची जयंती साजरी करण्यात आली आहे सर्व प्रथम संत भगवान बाबा चौकात भगवान बाबा प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर स्व . गोपिनाथराव मुंडे यांच्या प्रतिमेस आदरांजली वाहण्यात आली.

यावेळी उमरी माजी नगराध्यक्ष तथा शिवसेना तालुकाप्रमुख सुभाष पेरेवार यांनी स्व गोपिनाथराव मुंडे यांच्या जिवणावर प्रकाश टाकत पेरेवार म्हणाले जर आज गोपीनाथराव मुंडे हयात असते तर महाराष्ट्रासह देशाची ग्रामीण स्थीती बळकट झालेली असती,ही जयंती साजरी करत असतांना एकाच जागेवर कार्यक्रम न घेता मिरवणुकीच्या माध्यमातून स्व.गोपिनाथरावांचे कार्य लहान बालकांसह सर्वांना त्यांच्या महान कार्याची माहिती व ओळख झाली असती असे गौरव उदगार काढले. स्व.गोपिनाथरावांचे कार्य वैयक्तिक



कोणत्या जाती साठी किंवा धर्मासाठी नसुन सर्व गोरगरिबांना, बहूजनांना न्याय देणारे कार्य होते. महा युती सरकारने धनंजय मुंडे व पंकजा मुंडे यांचा आगामी मंत्री मंडळात स्थान देऊन एक प्रकारे आदरांजली अर्पण केल्याचे नमूद केले. माजी नगरसेवक गजानन श्रीरामवार भाषणात प्रतिक्रिया व्यक्त केली .

यावेळी प्रमुख नगराध्यक्ष प्रतिनिधी सदानंद खांडरे, उमरीचे पोलीस पाटील दत्ता वारेवार, भा.ज.युवा मोर्चा चे शहराध्यक्ष सोमनाथ हेमके, सरपंच चंद्रकांत कुरे, पोलीस पाटील बाबू कोतापल्ले, उपसरपंच विनोद सुभानजोड, चेअरमन लक्ष्मण सुभानजोड, माधव देविदास खांडरे, माणिक करपे, बालाजी माणिकराव खांडरे,लालू ईस्तारी दांगट, सुरेष करपे, आनंद बेलकोंडे,लालू तमलवाड, आदी मान्यवर यांची उपस्थिती होती गावातील प्रतिष्टीत नागरीक ही मोठया प्रमाणात उपस्थित होते .

# सरकारी गावठाण मधील काम तात्काळ थांबवा

**तभा वृत्तसेवा**
**सोनखेड,दि. १९ डिसेंबर**

लोहा तालुक्यातील बोरगाव कोल्हा गट क्रमांक ११ मधील चालू असलेले सरकारी काम तात्काळ थांबविण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे. येथील अनुसूचित जमाती व इतर मागास प्रवर्गाच्या स्मशानभूमीसाठी गट क्रमांक ११ मधील गावठाण ३८ गुंठे जमीन ही राखीव आहे या गावातील लोक पिढ्यानपिढ्यापासून तेथे अंत्यसंस्कार करतात. त्यापैकी पाच गुंठे जागा ही केवळ रिकामी आहे बाकी सर्व जागेवर अतिक्रमण केलेले आहे ते काढण्यात यावे व त्यातीलच तीन गुंठे जागाही १५ ऑगस्ट २०२२ मध्ये ग्रामपंचायत स्तरावर नमुना नंबर ८ ला नोंद करून त्याच ठिकाणी पाण्याच्या टाकीचे व ग्रामपंचायतचे अवैधरित्या होत असलेले बांधकाम तात्काळ थांबवावे व यातून समाजावर होत असणारा अन्याय रोखावा अन्यथा सर्व समाज बांधवांच्या वतीने आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा विठ्ठल चोखोबा गोडबोले, बालाजी व्यंका निरडे यांच्यासह येथील गावकऱ्यांच्या वतीने जिल्हा परिषद नांदेड, उपविभागीय अधिकारी कंधार, तहसील कार्यालय लोहा, पंचायत समिती लोहा, पोलीस अधीक्षक कार्यालय नांदेड, जिल्हाधिकारी नांदेड यांना निवेदन देण्यात आले आहे व येथील नागरिकांच्या या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

# मतदार संघाच्या विकासासाठी कायम कटिबद्ध : अब्दुल सत्तार

सिल्लोड ( प्रतिनिधी ) दि.१९, विधानसभा निवडणुकीत विरोधकांनी कितीही जातीवादाचा प्रचार केला असला तरी मतदारांचा भक्कम पाठिंबा आणि कार्यकर्त्यांच्या बळावर चौथ्यांदा विजयी झालो याबद्दल कृतज्ञता व्यक्त करीत शिवसेना नेते तथा नवनिर्वाचित आमदार अब्दुल सत्तार यांनी मतदार, पदाधिकारी कार्यकर्त्यांचे आभार मानले.

मतदारांनी ज्या विश्वासावर चौथ्यांदा विजयी केले त्या विश्वासाला कुठंही तडा जावू न देता नेहमीच्याच आत्मविश्वासाने सर्वसामान्य जनतेची सेवा व मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे आमदार अब्दुल सत्तार म्हणाले.

शहरातील शिवसेना भवन मैदान येथे तालुका शिवसेना, युवासेना, महिला आघाडीच्या वतीने आभार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी मनोगत व्यक्त करीत असताना आमदार अब्दुल सत्तार बोलत होते.

पुढे बोलत असताना आमदार अब्दुल सत्तार म्हणाले की, राज्यातील सरकार आपले आहे, या सरकारमधील मंत्री आपल्या विचाराचे आहेत. त्यामुळे मतदारसंघाला निधी कमी पडणार नाही. अनेक विकास कामे येत्या काळात करायची आहे. मंजूर तसेच प्रगती पथावर असलेली विकास कामे पूर्ण करायची आहे. जिल्ह्यात सर्वाधिक मते आपल्याला मिळाली, त्यामुळे कार्यकर्त्यांनी सकारात्मक दृष्टीकोन समोर ठेवून लोकांची सेवा करावीत.

आगामी प्रत्येक निवडणुकीत भगवा फडकविण्यासाठी मजबूत संघटन निर्माण करा

राजकारणात आत्मचिंतन करणे गरजेचे आहे, ज्या गावात आपल्याला मताधिक्य मिळाले , पण त्याच पद्धतीने ज्या गावात आपल्याला कमी मत मिळाले त्याचा देखील शोध आणि आत्मचिंतन आपल्याला करणे आवश्यक आहे. 'तहान लागली तेव्हा विहीर खोदणे, असे चालणार नाही. त्यामुळे पुढील दिशा ठरविण्यासाठी नियोजन करा, येथून पुढे येणाऱ्या प्रत्येक



निवडणुकीत शिवसेनेचा भगवा फडकविण्यासाठी युवकांची मजबूत फळी निर्माण करा पक्ष संघटनेवर भर द्या असे आवाहन याप्रसंगी आमदार अब्दुल सत्तार यांनी केले.

मंत्री पद न मिळाल्याने नाराज नाही

सिल्लोड विधानसभेच्या निवडणुकीमध्ये राज्याचे लक्ष लागून होते , आपण विजयी झाल्यानंतर सिल्लोडला मंत्रीपद मिळेल अशी सर्वांची अपेक्षा होती. मात्र राज्यातील विविध समतोल साधत असताना तसेच पक्षाने अडीच वर्षाचा फार्मूला ठरवला, त्यामुळे आपल्याला मंत्रिपदापासून थांबावे लागले . त्यामुळे कार्यकर्त्यांनी नाराज राहू नये, अनेकांना मंत्रिमंडळात स्थान मिळाले नाही , किती मंत्री असावे याची मर्यादा आहे . सरकार आपले असून सर्व मंत्री आपल्या विचारायचे आहे. त्यामुळे सिल्लोड सोयगाव मतदारसंघाला विकासासाठी कुठल्याही प्रकारचा निधी कमी पडणार नाही असा विश्वास व्यक्त करीत मंत्रीपद मिळाले नाही म्हणून आपण नाराज नसून याबद्दल आपली कुठलीही भूमिका नसल्याचे आमदार अब्दुल सत्तार यांनी स्पष्ट केले. अडीच वर्षाचा फार्मूला ठरलेला आहे त्यामुळे अडीच वर्षानंतर मी पुन्हा येईन असे म्हणत आमदार अब्दुल सत्तार यांनी उपस्थितांना खळखळून हसविले.

याप्रसंगी जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन पा.गाढे, कृउबा समितीचे सभापती केशवराव पा. तायडे, देविदास लोखंडे, प्रभाकर आबा काळे, अब्दुल समीर, श्रीराम महाजन, रामदास पालोदकर, श्रीरंग पा.साळवे, मारुती वराडे, पंकज जयस्वाल,राजाभाऊ देशमुख, विजय आबा दौड,संजय डमाळे, पांडुरंग दुधे, राजू बाबा काळे, गोविंदराव भोजने, रमेश दांडगे, प्रभाकर पारधे, प्रताप प्रसाद, पप्पू राऊत, सरदार लखवाल, राजाराम पाडळे, सुदर्शन अग्रवाल, दिलीप जाधव, नासीर पठाण, असगर झारेकर, जब्बार टेलर, रुपेश जयस्वाल, संजय जामकर, बाबुराव महाराज, राजश्री निकम, दुर्गाताई पवार, दिपाली पवार, मेघा शहा, स्वाती जवखेडे,सुमनबाई तांगडे आदींसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुदर्शन अग्रवाल यांनी केले तर आभार अर्जुन गाढे यांनी मानले.

## अल्पसंख्याक समाजाने सर्वांगिण विकासासाठी शासनाच्या योजनाचा लाभ घ्यावा- उपजिल्हाधिकारी संगिता राठोड

छत्रपती संभाजीनगर, दि.१९ (जिमाका):- अल्पसंख्याक समुदायाच्या जीवनामध्ये बदल सकारात्मक घडवण्यासाठी शासनाच्या विविध योजनांचा उपयोग होतो. अल्पसंख्याक समाजाने आपल्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपजिल्हाधिकारी संगिता राठोड यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्याक अधिकार दिवस बुधवारी (दि. १८) पार पडला. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या नियोजन सभागृहात आयोजीत या कार्यक्रमास तहसिदार रुपा चित्रक, अल्पसंख्याक समुदायाच्या विविध संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

डॉ. फिरदोस फातिमा खान यांनी अल्पसंख्याक समुदायातील महिलांच्या शिक्षणाबाबत व या समुदायातील घटनात्मक व कायदेशीर हक्कांची जाणीव जागृतीपर मार्गदर्शन केले. अजहर जब्बार पठाण यांनी अल्पसंखाक हिताच्या योजनेची माहिती दिली. शासकीय सेवेत अल्पसंख्याक समाजाचा टक्का वाढावा म्हणून शासकीय स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामध्ये सहभाग वाढण्यासाठी प्रयत्न करावे. मौलाना आझाद महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक जहीर शेख यांनी महामंडळाद्वारे चालवण्यात येणाऱ्या योजनांची माहिती देऊन त्यांचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्रबंधक डी.एल केदार, शिक्षणाधिकारी (योजना) च्या अरुण भूमकर यांनी त्याकडे अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक योजनांची माहिती दिली.

## सोयगाव तालुक्यातील पहुरी शिवारात बिबट्याच्या हल्ल्यात पाच शेळ्या ठार

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१९ डिसेंबर

शेतातील गोठ्यात दावणीला असलेल्या शेळ्यावर बिबट्याने हल्ला करुन पाच शेळ्या ठार केल्याची घटना सोयगाव तालुक्यातील पहुरी बु शिवारात गुरुवार (दि. १९) सकाळी उघडकीस आली दरम्यान ह्या घटनेत शेतकरी चे जवळपास एक लाख रुपयांचे नुकसान झाले आहे...



पहुरी बु.येथील शेतकरी नामदेव रामहरी गव्हाले यांची गट.न.७५ मध्ये तीन एकर जमीन असुन शेतीस जोडधंदा म्हणून त्यांनी शेळी पालन व्यवसाय सुरू केलेला असुन त्याच्याजवळ जवळपास अठरा शेळ्या होत्या त्या शेळ्या शेतातील पत्राच्या गोठ्यात दावणीला बांधुन संध्याकाळी घरी गेले जेव्हा मध्यरात्री बिबट्याने अचानकपणे हल्ला करुन पाच शेळ्या ठार केले तर चार शेळ्या जखमी केलेल्या होत्या गुरुवारी सकाळी शेतकरी शेतात गेल्यावर ही घटना घडलेली निदर्शनास आली याबाबत घटनेची माहिती वनविभागाला देण्यात आली त्यानुसार वनसंरक्षक एफ.जी.मुलताने यांनी घटनेचा पंचनामा केला आहे यावेळी आत्माराम गव्हाले,सागर गोराडे, विश्वनाथ ढवणे, कैलास तेली,हर्षल गव्हाले,प्रमोद गव्हाले,आदी उपस्थित होते

पहुरी शिवारात बिबट्याच्या मुक्त संचार.....

गेल्या आठ दिवसांपासून पहुरी शिवारात बिबट्याच्या मुक्त संचार वाढला असुन अनेक शेतकरीना हा बिबट्या दिसला होता गेल्या आठ दीवसापुर्वी शेतकरी रात्रीच्या रब्बी पिकांना देण्यासाठी गेले असता बिबट्याचा मुक्त संचार करताना दीसल्याने शेतकऱ्यांमध्ये घबराटीचे वातावरण निर्माण झाले आहे तरी वनविभागाने पिंजरा लावुन ह्या बिबट्यास जेरबंद करावे अशी मागणी शेतकरीकडुन होत आहे.

## प्रतिबंधात्मक आदेश जारी

छत्रपती संभाजीनगर, दि.१९(जिमाका)- आगामी कालावधीत कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९७१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश अपर जिल्हादंडाधिकारी विनोद खिरोळकर यांनी जारी केले आहेत. दि.२० डिसेंबर २०२४ ते ३ जानेवारी २०२५ पर्यंत हे आदेश लागू असतील. या आदेशान्वये सार्वजनिक ठिकाणी शस्त्र वापरण्यास, दाहक स्फोटक पदार्थ बाळगण्यास, प्रक्षोभक भाषणे, असभ्य वर्तन करण्यास, प्रतिमा, आकृत्या इ. चे प्रदर्शन करण्यास इ. कृत्य करण्यास तसेच पाच किंवा पाचापेक्षा अधिक व्यक्तिंना विनापरवानगी एकत्र येणास बंदी घालण्यात आली आहे. या आदेशातून कर्तव्यावर असलेले पोलीस अधिकारी व अन्य सक्षम अधिकारी यांना वगळण्यात आल्याचेही आदेशात नमूद आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

## सद्गुरु साध्वी आक्काताई महाराज यांनी खुलताबाद येथे संतोष पा. करपे यांचे निवासस्थानी सदिच्छा भेट



खुलताबाद प्रतिनिधी : वेरूळ येथील नाथ आश्रम प्रमुख सद्गुरु साध्वी आक्काताई महाराज यांनी खुलताबाद येथे संतोष पाटील करपे यांचे निवासस्थानी सदिच्छा भेट देऊन विविध विषयावर चर्चा केली, करपे परिवाराच्यावतीने महाराजां चे पूजन करण्यात आले यावेळी माजी नगराध्यक्ष लताताई घोडके भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश जी वाकळे कैलास मिसाळ सर आर आर करपे भगवान करपे शिवाजी घोडके सुनील भाऊ मानघरे अविनाश लिंगायत गिरजाबाई करपे पुष्पा बाई घोडके ज्योती करपे आलकाबाई. चंद्रकला करपे शितल ताई फुलारे .मंगल ताई घोडके ज्योती घोडके राजवीर करपे आयुष्य घोडके यांच्यासह करपे परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते

## नायलॉन मांजासह आरोपी जेरबंद

वाळूज महानगर (प्रतिनिधी ) शहरातून खरेदी केलेल्या मांजाची उद्योगनगरीत चढ्या भावाने विक्री करण्यासाठी घेऊन आलेल्या आरोपीला एमआयडीसी वाळूज पोलिसांनी मुद्देमालासह जेरबंद केले. ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव गणेश राजूसिंग चंदेल (रा. सिंधी कॉलनी, मोंढा नाका) आहे. एएस क्लब परिसरात नायलॉन मांजाची विक्री करण्यासाठी दोन जण येणार असल्याची माहिती पोलिस निरीक्षक कृष्णा शिंदे यांना मिळाली होती. त्यांनी पोउनि विलास वैष्णव, पोह बाबासाहेब काकडे यांना एएस क्लब परिसरात रवाना केले. दुचाकीवरून आलेल्या दोघांकडे अधिक चौकशी केली असता, त्यांना सोबतच्या मांजाबाबत समाधानकारक उत्तरे देता न आल्याने पोलिसांनी ताब्यात घेतले. अधिक चौकशी केली असता, त्यांनी ५ हजार रुपये किमतीचा मांजा चढ्या भावाने विक्री करण्यासाठी आणल्याची कबुली दिली. पोलिसांनी आरोपी गणेश चंदेल यास जेरबंद केले असून, एका मुलाला समज देऊन पालकांच्या स्वाधीन केले.

## बुधवार पर्यंत १८ ते ७० वर्ष वयोगटातील नागरीकांचे होईल प्रकृती परिक्षण

छत्रपती संभाजीनगर,दि.१९ (जिमाका):- 'देश का प्रकृती परिक्षण' या अभियानाची घोषणा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली असुन राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मु यांच्या प्रकृती परिक्षणाने या अभियानाचा प्रारंभ झाला आहे. दि.२५ पर्यंत हे अभियान सुरु राहणार आहे. या अभियानांतर्गत देशातील १८ ते ७० वर्षापर्यंतच्या सर्व नागरिकांचे प्रकृती परिक्षण आयुर्वेद डॉक्टर्स, वैद्यकीय अधिकारी, खाजगी तसेच आयुर्वेद महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी करणार आहेत. प्रकृती परिक्षणानंतर आयुष मंत्रालयाकडुन व्यक्तीच्या प्रकृतीनुसार आहार-विहार, पथ्य-अपथ्य, दिनचर्या, ऋततुचर्या इ.बाबत नियमित मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

जिल्हा आयुष कक्षाच्या पुढाकाराने जिल्ह्यातील नागरिकांचे प्रकृती परिक्षण करण्याचे नियोजन केले आहे. या निमित्ताने जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभय धानोरकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दयानंद मोतीपवळे, जिल्हा आयुष अधिकारीडॉ.शेख शकील अहमद यांनी सर्व वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालये, ग्रामीण रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, आयुर्वेद व युनानी दवाखाने, आरोग्य वर्धिनी केंद्रे व आर.बी.एस.के.पथकातील आयुर्वेद वैद्यकीय अधिकाऱ्यांना सुचना दिल्या आहेत. जिल्हयातील आयुर्वेद महाविद्यालयांचाही या मोहिमेत सहभाग असणार आहे.

या मोहिमेत छत्रपती शाहु महाराज आयुर्वेद महाविद्यालय, कांचनवाडी यांच्या सहकार्याने जिल्हा रुग्णालय चिकलठाणा येथे १८ ते ७० वर्षाच्या नागरिकांसाठी दि.२५ डिसेंबर पर्यंत तज्ज्ञ आयुर्वेद डॉक्टरांमार्फत प्रकृती परिक्षणाची सुविधा सुरु करण्यात आली आहे. या मोहिमे अंतर्गत शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे प्रकृती परिक्षण करण्यात येणार आहे व त्याची सुरुवात जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना यांच्या प्रकृती परीक्षणाने करण्यात आली.

## गरजवंतांना गरम कपड्यांचे वाटप



वाळूज महानगर :औद्योगिक वाळूज परिसरातील गरजूंना इप्का कंपनीच्या वतीने कडाक्याच्या थंडीत उघड्यावर झोपणाऱ्या गरजवंताना चादरीचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी कंपनी व्यवस्थापनाचे संजय चौबे, एकनाथ पवार, प्रफुल्ल कांबळे, रमेश बिराजदार, संदीप कुलकर्णी, आजिनाथ सुरवसे, संदीप सावखेडकर आदींची उपस्थिती होती.

## शहीद भगतसिंग स्कूलमध्ये क्रीडा सप्ताहाचा समारोप

वाळूज महानगर (प्रतिनिधी) : बजाजनगर येथील शहीद भगतसिंग इंग्लिश स्कूलमध्ये मागील आठवड्यापासून आयोजित क्रीडा सप्ताहाचा समारोप बुधवारी (दि.१८) शानदाररित्या करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा याकरिता या क्रीडा सप्ताहामध्ये विविध मैदानी क्रीडा प्रकाराबरोबरच बौद्धिक क्रीडा प्रकारच्या स्पर्धा आयोजित करण्यात आले होते. या सप्ताहाचा समारोप रंगीत बॉल हातात घेऊन मुलांनी कवायत केली. सप्ताहाचा समारोप प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विजेत्या खेळाडूंना बक्षीस वाटप करून करण्यात आला. या स्पर्धेतील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक नितीन देशमुख होते तर प्रमुख पाहुणे म्हणून यु. बी. कंपनीचे सीनियर मॅनेजर बिपिन सुपेकर, बबनराव सुपेकर, कॉम्रेड विलास जंजाळ, सिटू संघटनेचे मनोहर सनेर, मंडळाच्या सदस्या रेखा भवलकर, शहीद भगतसिंग इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका अनामिका भवलकर उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अर्चना शेंडे, वैशाली पाटील, राजश्री जाधव, समीक्षा अग्रवाल, अर्चना समरीत, नयना जोशी, प्रणिता फुलझेले, राहुल साबळे, शैलेंद्र रसाळ, रत्ना नरवडे यांच्यासह शिक्षकांनी, खेळाडूंनी सहकार्य केले.

## वडगांव-साजापुर मार्गावर कुत्र्यांच्या झुंडी

वाळूज महानगर (प्रतिनिधी ) वाळूज परीसरात अनेकांना कुत्र्यांनी चावा घेत जखमी केल्याच्या घटना घडूनही प्रशासनाकडून दखल घेतली जात नाही. रात्रपाळीचे काम आटोपून घरी परतणाऱ्या दुचाकीस्वार कामगारांचा पाठलाग करून त्यांना जखमी करणाऱ्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची वारंवार मागणी नागरिकांतून होत आहे. सर्वाधिक त्रास साईनगर, कंदील हॉटेल परिसर, वडगांव साजापुर याठिकाणी आहे. सिडको, एमआयडीसी व स्थानिक ग्रा.पं. प्रशासनाने कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी यशपाल कदम, राजकुमार गोरगीले, उमेश लाटकर, गणेश लिहिणार, नामदेव सावते, रतन कवाळे, ऋषिकेश गायकवाड, अण्णासाहेब वाघ, सतीश खराटे, अतुल शेळके आदींनी केली आहे.

## २१ वर्षापासून फरारी आरोपीला ठाणे जिल्ह्यातून केली अटक; सोयगाव पोलीसांची कारवाई

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.१९ डिसेंबर

सोयगाव तालुक्यातील तिडका ते घाटनांद्रा रस्त्यावर घाटात दरोड्यांतील फरारी आरोपीला सापळा रचून सोयगाव पोलीसांनी बुधवारी सायंकाळी साडेसहा वाजता ठाणे जिल्ह्यातील वडपे तालुका भिवंडी या गावातून अटक केली आहे त्याला गुरुवारी सोयगाव न्यायालयासमोर हजर केले असता त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे.

तिडका ते घाटनांद्रा रस्त्यावर घाटात दि.६/७/२००५ वेळ ५:१५ सुमारास पाच जणांनी दरोडा घातला होता.दरम्यान या



प्रकरणी फिर्यादी सचिन कोटावे यांनी सोयगाव पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध दरोड्यांचा गुन्हा दाखल करण्यात आला. दरम्यान २०१७ मध्ये यातील चार आरोपीचा निकाल न्यायालयाने दिला होता. परंतु त्यातील रवी सुरेश सूर्यवंशी(वय.४० रा. कृष्णापुरी ता.पाचोरा) हा गुन्हा दाखल झाल्या पासून फरारी असतांना सोयगाव पोलीसांनी तपास चक्रे फिरवून( दि.१७) मुंबई च्या दिशेने जाऊन ठाणे जिल्ह्यातील आरोपीच्या घरात सदर आरोपी लपून बसला असल्याची माहिती सोयगाव पोलीसांना मिळाली त्यावरून बुधवारी पहाटे सहा वाजता त्याच्या घरावर छापा टाकला असता,आरोपी पोलीसांना चकवा देऊन पुन्हा फरारी झाला परंतु पोलीस पथकातील उपनिरीक्षक गजानन आरेकर यांनी ठाणे जिल्ह्यात कर्तव्य बजावले असल्याने अनुभवाच्या जोरावर आरोपीचा तब्बल पाच तास छडा लावत अखेर एका रिलायन्सच्या गोडावून मध्ये आरोपी रवी सूर्यवंशी लपून बसला असल्याची माहिती मिळाल्यानंतर सोयगाव पोलीसांच्या रवींद्र तायडे,सादिक तडवी,अजय कोळी,प्रवीण देवरे आदींच्या पथकाने गोडावून मध्ये प्रवेश करून त्यास जेरबंद करून बुधवारी सायंकाळी सहा वाजता सोयगाव पोलीस ठाण्यात घेऊन आले. दरम्यान त्यास गुरुवारी सोयगाव न्यायालयासमोर हजर केले असता त्याची न्यायालयीन कोठडीत रवानगी करण्यात आली आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेशकुमार कोल्हे,यांच्या मार्गदर्शनाखाली सोयगाव पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक पंकज बारवाल,उपनिरीक्षक गजानन आरेकर,रवींद्र तायडे,सादिक तडवी,अजय कोळी,प्रवीण देवरे,आदींच्या पथकाने ही कारवाई केली आहे.

# रोटरी महाएक्सपो २०२४ चे आज उदघाटन

### अवयव दान, सीपीआर ट्रेनिंग च्या माध्यमातून सामाजिक संदेश; २० ते २३ डिसेंबरदरम्यान सेंट फ्रान्सिस स्कूल मैदानावर प्रदर्शन

छत्रपती संभाजीनगर-

रोटरी डिस्ट्रीक ३१३२ च्या वतीने रोटरी महाएक्सपो २०२४ चे आयोजन २० ते २३ डिसेंबरदरम्यान छत्रपती संभाजीनगर येथील सेंट फ्रान्सिस स्कूल मैदानावर करण्यात आले आहे. उद्या दि. २० डिसेंबर रोजी दुपारी बारा वाजता महाएक्सपोचे उदघाटन होणार आहे. देशभरातून वेगवेगळ्या क्षेत्रातील कंपन्या आणि व्यावसायिकांचे, सामजिक जनजागृतीचे संदेश देणारे स्टॉल्स आणि पेटपूजेबरोबरच मनोरंजनाची लयलुट महाएक्सपोच्या माध्यमातून शहरवासियांना अनुभवण्यास मिळणार आहे अशी माहिती संयोजक रोटरीयन सतीश लोणीकर यांनी दिली.

व्यवसाय वृद्धीसाठी व्यासपीठ मिळवून देण्याच्या दृष्टीने आयोजित महाएक्सपो मध्ये महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, नवउद्योजकीय संकल्पनांना प्रोत्साहन तर देण्यात येणार आहेच त्याच बरोबर सामाजिक भान जपण्याचे काम हा महाएक्सपो करेल असा विश्वास संयोजकांनी व्यक्त केला आहे. एमजीएम कॉलेज मेडिकल कॉलेजच्या वतीने सीपीआर ट्रेनिंग कॅम्पचे आयोजन महाएक्सपोमध्ये करण्यात आले आहे. प्रात्यक्षिक केल्यानंतर प्रत्येकास सर्टिफिकेट देणार आहे. अवयव दानाच्या चळवळीला प्रेरणा मिळावी यासाठी खास दालन उभारण्यात आले आहे. या माध्यमातून डॉक्टर सुधीर कुलकर्णी अवयव दानाचे महत्व प्रदर्शनास येणाऱ्या नागरिकांना समजावून सांगणार आहेत. तसेच अवयव दान करू इच्छीनाऱ्या व्यक्तींचे अर्ज भरून घेण्यात येणार आहेत. रोटरी महा एक्सपोमधून मिळालेल्या निधीतून खेडेगावातील जिल्हा परिषदेतील शाळेमध्ये आठवी ते अकरावीच्या १५००० मुलींची निमिया तपासणी आणि उपचारकेले जाणार आहेत तसेच ४० खेडेगावातील स्मशानभूमीमध्ये शेड्स उभारले जाणार आहेत. आहेत. याबरोबरच विविध रोटरी क्लब आपल्या कार्याची माहिती या प्रदर्शनाच्या माध्यमातून देणार आहेत.

महाएक्सपोमध्ये विविध कंपन्याची दालने गृहउपयोगी वस्तू, सौर उर्जा, इलेक्ट्रोनिक, अन्नप्रक्रिया, इलेक्ट्रोनिक वाहने, फर्निचर, बँकिंग अशा विविध क्षेत्रातील स्टॉल्स असल्याने केवळ उद्योग, व्यवसायातील व्यक्तीच नाही तर सर्वसामान्य व्यक्तीसाठीही अनेक आकर्षणे राहणार आहेत. इंटरनॅशनल फूड फेस्टिवल सोबतच तीन दिवस सायंकाळी भरगच्च मनोरंजनाच्या कार्यक्रमाची रेलचेल आहे. त्यामध्ये पहिल्या दिवशी प्रसिद्ध हास्य सम्राट प्राध्यापक दीपक देशपांडे यांचा सुप्रसिद्ध विनोदी एकपात्री प्रयोग हास्यकल्लोळ संध्याकाळी पाच वाजता होणार आहे. रोटरी महा एक्सपोमध्ये नियोजलेला आहे. रोटरी क्लब ऑफ छत्रपती संभाजी नगर न्यूटनचे अध्यक्ष रोटरीयन मथुरदास देशमुख यांच्या प्रायोजकत्वातून हा कार्यक्रम होत आहे. केवळ महाएक्सपोच नाही तर मनोरंजनाच्या सर्व कार्यक्रमाला मोफत प्रवेश राहणार आहे.

**मान्यवरांच्या उपस्थतीत उदघाटन**

**मराठवाडा चेम्बर्स ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते महाएक्सपोचे उदघाटन होनर आहे. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी झोन सात चे पब्लिक इमेज को ऑर्डिनेटर रोटरीयन किशोर कुमार, रोटरीचे डिस्ट्रीक गवर्नर रोटरीयन डॉ. सुरेश साबू यांच्यासह सुधीर लातुरे, जयेश पटेल यांची उपस्थिती राहणार आहे. जास्तीत जास्त जननी यावेळी उपस्थित रहावे असे आवाहन संयोजक सतीश लोणीकर यांनी केले आहे.**

बैद्यनाथ नागपूर असली आयुर्वेद
पाईल्स (मुळव्याध) च्या त्रासापासुन त्रस्त?
सिड्पाईल्स टॅबलेट
मूळव्याध, बध्दकोष्ठता, फिस्टुला, गुदा मार्गातील सूज,दाह टोचल्या प्रमाणे वाटणे, खाज, असहनीय वेदना इ. त्रास दूर करणयास मदत करते.


अभयामृत
बऱ्याच काळापासून असलेल्या जीर्ण बध्दकोष्ठतेला दूर करुन पाचनक्रिया सुरळीत ठेवण्यास मदत करते.

स्वस्थ पाचन, स्वस्थ जीवन
वैद्यकीय सल्ला : +91 844 844 4935
www.baidyanath.co

## राजाबजार जैन पंचायतच्या वतीने कचनेर क्षेत्रावर निवडुन आलेल्या पदाधिका-यांचा सन्मान समारोह संपन्न



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी – श्री.१००८ खंडेलवाल दिंगंबर जैन पंचायत पार्श्वनाथ मंदिर राजाबजार येथे नुकतेच श्री.१००८ चितामणी पार्श्वनाथ दिंगंबर जैन अतिशय क्षेत्र कचनेर विश्वस्थ मंडळाच्या अध्यक्ष पदी सुरेश कासलीवाल, तर व्यवस्थापकीय संचालक म्हणुन भरत ठोले, उपाध्यक्ष पदी संजय कासलीवाल यांची नियुक्ती झाल्याबददल राजाबजार जैन पंचायत तर्फे त्यांचा शाल श्रीफळ हार देउैन यथोचित सन्मान करण्यात आला. यावेळी नूतन विश्वस्थ मंडळाच्या सदस्याना सर्व उपस्थित समाज बांधव कडून अभिनंदन करण्यात आले व क्षेत्राचा विकासासाठी प्रयत्न करावे कार्यकमाचे सुत्रसंचालन पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी यांनी केले तर प्रास्ताविक पंचायत सचिव प्रकाश अजमेरा यांनी केले. कार्यकमाची सुरैवात मंगलाचरणाने करण्यात आली. नूतन यावेळी पंचायत अध्यक्ष महावीर पाटणी, सचिव प्रकाश अजमेरा,विश्वस्थ महावीर ठोले,निता ठोले,चंदा कासलीवाल,विनोद लोहाडे, प्रमोद जैन यांची नरेंद्र अजमेरा, प्रमोद पाटणी, दिनेश ठोले,बापु कासलीवाल, संतोष कासलीवाल,प्रदिप पाटणी,अशोक छाबडा,जितेंद्र पहाडे, शांतीलाल पाटणी, सुरजमल छाबडा, देवेंद्र काला, दिलीप सेठी, अशोक बोहरा, विपीन कासलीवाल, आशा काला विनोद अजमेरा यांच्यासह समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थिती होती.

## शासकीय कार्यालयात सुशासन सप्ताह

छत्रपती संभाजीनगर,दि.१९ (जिमाका):– जिल्ह्यातील सर्व शासकीय कार्यालयात गुरुवार दि.१९ ते मंगळवार दि.२४ दरम्यान सुशासन सप्ताह राबविण्यात येणार आहे. यासंदर्भात शासनाने निर्देश दिले असून या सप्ताहात विशेष शिबिरांचे आयोजन करुन सार्वजनिक तक्रारींचे निराकरण करणे, राज्यशासनाच्या पोर्टलवरील तक्रारींचे निराकरण करणे, ऑनलाईन सेवा वितरण , सेवा वितरण अर्ज निराकरण यासंदर्भातील तक्रारींचे निराकरण कराव्या असे उपजिल्हाधिकारी सामान्य श्रीमती संगीता राठोड यांनी कळविले आहे.



## आत्माराम देसाई यांचे निधन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१९ डिसेंबर : सोयगाव शहरातील आत्माराम रामचंद्र देसाई(वय.७०) यांचे दि.१९ गुरुवार रोजी सकाळी वेळ १०:०० वा.निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी ५:३० वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा,नातु,नातवंडे,असा परिवार आहे. ते बाळू बोरसे यांचे ते मामा होत.



## सुपडू घनघाव यांचे निधन

तभा.वृत्तसेवा

सोयगाव,दि.१९ डिसेंबर : सोयगाव शहरातील सुपडू दगडू घनगाव(वय.८५) यांचे दि.१९ गुरुवार रोजी वेळ दुपारी २:०० वा.निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सायंकाळी ६:०० वा.सोयगाव येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा,एक मुलगी,सुन,नातवंडे,असा परिवार आहे.

# के.प्रा.शा.सोयगावच्या कला निर्देशकाच्या गैरहजरीमुळे; ६ वी व ७ वीच्या १२६ विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान

सोयगाव,दि.१९(प्रतिनिधी)

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा सोयगाव येथे सहावी आणि सातवी इयत्ता मध्ये शिक्षक घेत असलेल्या एकशे सहविस विद्यार्थ्यांसाठी जिल्हा परिषद प्रशासनाने,रविंद्र राजपूत कला निर्देशक म्हणून नियुक्त केलेले असून या महाशयांनी गेल्या एक महिन्यापासून शाळेच्या मुख्यापकाला पुर्व सुचना न देता एक महिन्याची दांडी मारल्याने दरम्यान चित्रकला ग्रेड परिक्षेपासुन बाल विद्यार्थ्यांना विचित ठेवल्याने शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्यांनी या निर्दशकास सेवेतून निलंबित करण्यात यावे अशी लेखी स्वरूपाची मागणी शिक्षणाधिकारी यांना केली आहे.




रविंद्र राजपूत असे अंशकालीन निर्देशक ( कला ) असे या शिक्षकांचे नाव आहे. दि.१९ नोव्हेंबर ते दि.१६ डिसेंबर २०१४ पर्यंत निर्देशकांनी शाळेचे मुख्याध्यापक मोतिराम जोहरे यांना कुठलीही पुर्व सुचना,लेखी अर्ज न देता मनमानी करिता एक महीण्याची दांडी या बहाद्दराने मारली.

> निर्देशांक राजपूत यांनी एक महिना गैरहजर राहण्याचे कारण व माफी नामा मुख्याध्यापकांकडे सादर केला आहे.
>
> – रंगनाथ आढाव, गटशिक्षणाधिकारी पं.स.सोयगाव

शालेय समिती अध्यक्ष भागवत गायकवाड,विशाल कंडारे, अन्ना वाघ,सुनील ठोंबरे, व विद्यार्थ्यांनी १२ डिसेंबर रोजी गटशिक्षणाधिकारी रंगनाथ आढाव यांना लेखी तक्रार दिली त्यात नमुद आहे की,आर्टिआयच्या नियमानुसार मुलांच्या सुप्त गुणांस वाव मिळावा म्हणून कला क्रीडा कार्यनुभव यावा म्हणून कला निर्देशक घेतलेले आहेत.मात्र कला विषयावर सुप्त गुणांनपासून विद्यार्थी वंचित राहिलेत अश्या निर्दे शकाला सेवेतून कार्यमुक्त करण्यात यावे अशी मागणी केली आहे. पूर्वीचे महाजनसर ह्या कला निर्दे शांकांची पुन्हा नव्याने नियुक्त करुन आम्हाला न्याय द्यावा असेही म्हटले आहे.

> १९ नोव्हेंबर ते १६ डिसेंबर दरम्यान निर्देशांक रविंद्र राजपूत पुर्व सुचेना न देता गैरहजर होते.यांची अनियमितता शालेय समिती वेतागली त्याच प्रमाणे विद्यार्थी पालकही संतप्त होवून त्यांनी लेखी तक्रारी केल्या आहेत म्हणून राजपूत यांनी गैरहजरी बाबत खुलासा करावा अशी लेखी सुचना देण्यात आली असून त्यांनी १६ डिसेंबर रोजी शाळेतील शिक्षक हजेरी पटावर अचानक प्रकट होवून सही केली.याविषयीचा अहवाल वरिष्ठ अधिकारी यांना सादर करण्यात आला आहे
>
> – मोतीराम जोहरे, मुख्याध्यापक जि.प.कें.प्रा.शाळा सोयगाव

## पैठणला दत्त जयंती संगीत महोत्सवाचे आयोजन

तभा वृत्तसेवा

पैठण दि १९ : पैठण येथील संत एकनाथ महाराज मंदिर(नाथवाडा) येथे गेल्या १३ वर्षापासून दत्त जयंती निमित्ताने संगीत महोत्सवाचे आयोजन केल्या जाते. यावर्षीही २० डिसेंबर ते २१ डिसेंबर या दोन दिवशी सायंकाळी ७:०० वाजता संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असुन, महोत्सवाचे हे १४ वे वर्ष आहे.

या महोत्सवासाठी उदघाटक म्हणून डॉ.अनंत कडेठाणकर, किशोर चव्हाण यांच्या सह प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी नागरी बँकेचे चेअरमन रवींद्र काळे, माजी नगराध्यक्ष सुरज लोळगे, निवृत्त जिल्हा न्यायाधीश अभिनंदन पाटांगणकर, दत्तात्रय पोहेकर यांची उपस्थिती राहणार आहे.



या संगीत महोत्सवात कृष्णा बोंगाणे ( उस्ताद राशीद खान यांचे शिष्य ), कु.युगंधरा केचे (विदुषी पंडिता शुभदा पराडकर यांची शिष्या), सौ.अदिती गोसावी/रवंदे (अंकिता जोशी यांच्या शिष्या) व श्रीकृष्ण उर्फ मिलींद गोसावी यांचे गायन होणार आहे. या गायना सोबत अभिनय रवंदे, गजानन केचे (हार्मोनियम) व आशय कुलकर्णी व व्यंकटेश पंडित (तबला) हे संगत करणार आहेत. तरी या महोत्सवास सर्व रसिकांनी , भाविकांनी या महोत्सवाचा आनंद घ्यावा . असे आवाहन हरिपंडीत गोसावी, शैलेश मंगिराज, मकरंद शहापुरकर, सौ.मृणाल गोसावी, संजय डोळे व गौरी गोसावी (देशमुख) यांच्या सह श्री भानुदास एकनाथ प्रतिष्ठाण पैठण च्या सदस्यांनी व श्रीकृष्ण (मिलींद) गोसावी अध्यक्ष श्री.भानुदास एकनाथ प्रतिष्ठाण पैठण यांनी केले आहे.

## निर्यात प्रचालन कार्यशाळा सोमवारी

छत्रपती संभाजीनगर,दि.१९ (जिमाका):– उद्योजक , निर्यातदार आणि व्यावसायिकांना एकाच व्यासपीठावर आणून उत्पादीत मालाच्या निर्यातीस चालना देण्यासाठी सोमवर दि.२३ रोजी सकाळी ९ वा. एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे,असे जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक यांनी कळविले आहे. बजाज भवन, सीएमआयए सभागृह, प्लॉट नं.पी–२, रेल्वेस्टेशन एमआयडीसी, छत्रपती संभाजीनगर येथे ही कार्यशाळा होणार आहे. उद्योग विभागाचे विकास आयुक्त दीपेंद्र कुशवाह यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली होत असलेल्या या कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी हे राहणार आहेत. या कार्यशाळेत निर्यात धोरण, प्रक्रिया, प्रोत्साहन , बँक प्रणाली व विदेशांशी व्यापार इ. विषयांवर अजय कोर्ला, मुकेश समतानी, सहदेव सातपुते, मौलिक मावानी, सुयोग भासे, अमोल मोहिते. स्वप्निल राठोड हे तज्ज्ञ व्यक्ति मार्गदर्श करणार आहेत. कार्यशाळेस उपस्थितीचे आवाहन उद्योग विभागाचे सह संचालक बी.टी. यशवंते व जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक स्वप्निल राठोड यांनी केले आहे.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू तर एक जण गंभीर जखमी

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि १९ डिसेंबर : पैठण ते छत्रपती संभाजीनगर रोडवरील चितेगाव येथील रमानगर वस्तीजवळ अज्ञात वाहनाने भरघाव वेगाने दिलेल्या धडकेत दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला आहे तर एक जण गंभीर झाला आहे तर अज्ञात वाहन व चालक हे भरघाव वेगाने पळत पसार झाल्याची घटना आज दि १८बुधवार रोजी रात्री आठ वाजे दरम्यान घडली आहे.बिडकीन येथुन दुचाकी वाहन क्रमांक एम एच २० बीजे २०४१ या दुचाकीवरून नातेवाईकांना कांचनवाडी येथे सोडण्यासाठी जात असलेल्या दुचाकीला अज्ञात वाहनाने धडक दिल्याने दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला आहे तर सहकारी गंभीर जखमी झाला आहे.या अपघातात मयत दुचाकीस्वाराचे नाव कान्हु दत्तात्रय घोडके,वय.३६ वर्षे,रा. रामनगर,बिडकीन,ता.पैठण हि व्यक्ती मयत झाली आहे तर दत्ता रामनाथ शेजुळ,वय.२४ वर्षे,रा.कांचनवाडी हा गंभीर जखमी झाला आहे. घटनास्थळावरुन वाहनधारक व नागरिकांच्या मदतीने कान्हु घोडके व दत्ता शेजुळला ग्रामीण रुग्णालय बिडकिन येथे दाखल केले असता कान्हु घोडके यास वैद्यकीय अधिकारी यांनी तपासुन मयत घोषित केले आहे.तर दत्ता शेजुळवर प्रथमोपचार करून पुढिल उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले आहे.कान्हु घोडके हे दत्ता शेजुळला कांचनवाडी येथे गावी सोडण्याकामी जात असताना हा अपघात झाला आहे.याबाबत पोलीस ठाणे बिडकीन येथे अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरु आहे

## संतोष करपे पाटील,यांच्या निवासस्थानी सदगुरू आक्काताई महाराज यांचे भेट

तभा वृतसेवा

खुलताबाद प्रतिनिधी वेरूळ येथील नाथ आश्रम प्रमुख सद्गुरु साध्वी आक्काताई महाराज यांनी खुलताबाद येथे संतोष पाटील करपे यांचे निवासस्थानी सदिच्छा भेट देऊन विविध विषयावर चर्चा केली, करपे परिवाराच्यावतीने महाराजां चे पूजन करण्यात आले यावेळी माजी नगराध्यक्ष लताताई घोडके भाजपा जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश जी वाकळे कैलास मिसाळ सर आर आर करपे भगवान करपे शिवाजी घोडके सुनील भाऊ मानघरे गिरजाबाई करपे पुष्पा बाई घोडके ज्योती करपे आलकाबाई. चंद्रकला करपे शितल ताई फुलारे .मंगल ताई घोडके ज्योती घोडके राजवीर करपे आयुष्य घोडके यांच्यासह करपे परिवारातील सर्व सदस्य उपस्थित होते.

## सामाजिक सुरक्षा कवच म्हणजेच प्रॉव्हिडंट फंड. पेन्शन आणि जीवन विमा कवच

छत्रपती संभाजीनगर : सामाजिक सुरक्षा कवच म्हणजेच प्रॉव्हिडंट फंड. पेन्शन आणि जीवन विमा कवच. २८ लाख ३४ हजार ७६३ सदस्य/त्यांच्या कुटुंबियांसाठीच्या योजना, कर्मचारी पेन्शन योजना कर्मचारी ठेव संलग्न विमा योजना, १९७६ च्या अंतर्गत छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यात उपलब्ध करून दिली जात आहेत, ही सेवा कर्मचारी प्रॉव्हिडंट फंड संघटनेच्या छत्रपती संभाजी नगर विभागाकडून दिली जात आहे.

योजनांचे सदस्य म्हणून समाविष्ट आस्थापनांच्या कर्मचाऱ्यांची ओळख पटवण्यासाठी, प्रत्येक सदस्याला युनिव्हर्सल अकाउंट नंबर दिला जातो. सदस्यांचे लॉगिन तयार केले आणि सक्रिय केले तरच दावा दाखल करण्यासह कोणत्याही ऑनलाइन सेवांचा लाभ घेऊ शकतात आणि म्हणून सर्व सदस्यांनी सदस्य पोर्टलमध्ये 'महत्वाची लिंक' अंतर्गत सक्रिय करा या कार्यक्षमतेद्वारे उपलब्ध केलेल्या ऑनलाइन सुविधेद्वारे लॉगिन तयार करणे आवश्यक आहे. ही सुविधा युनिफाइड पोर्टलच्या सदस्य इंटरफेसवर उपलब्ध आहे.

नवीन सदस्यांचे यूएएन त्वरित अद्ययावत करणे आवश्यक आहे. कारण ते जलद गतीने केले जाऊ शकते आणि सर्व आवश्यक तपशील सामान्यत: ते ज्या आस्थापनांमध्ये कार्यरत आहेत त्यांच्याकडे उपलब्ध असतात. आकडेवारीनुसार अजूनही मोठ्या संख्येने नवीन कर्मचारी, सुमारे ५५००, जे १ ऑगस्ट २४ रोजी व त्यानंतर रुजू झाले आहेत त्यांनी त्यांचे यूएएन सक्रिय केलेले नाहीत. त्यामुळे सर्व सदस्यांना त्वरित सक्रिय करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहिती/सुविधेसाठी ते आस्थापनातील अधिकृत व्यक्तीशी संपर्क साधू शकतात. कर्मचारी/नियोक्ते यांना सक्रिय करण्यात कोणतीही अडचण आल्यास जनसंपर्क अधिकारी, प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजी नगर यांच्याशी संपर्क साधावा.

## प्रक्षेत्र दिवसानिमित्त कापसासह भाजीपाला लागवड मार्गदर्शन

### केव्हीकेवा आसडीमध्ये कार्यक्रम

छत्रपती संभाजीनगर :

केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर व कृषी विज्ञान केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या विशेष कापूस प्रकल्पाअंतर्गत १७ डिसेंबर २०२४ रोजी मौजे आसडी येथे प्रगतशील शेतकरी कमलाकर शिरसाट यांच्या शेतावर प्रक्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना कृषी विज्ञान केंद्राचे विस्तार शिक्षणचे विषय विशेषज्ञ डॉ. बी. एल. पिसुरे यांनी प्रकल्पाचा उद्देश शेतकऱ्यांना समजावून सांगितला. दादा लाड कापूस लागवड तंत्रज्ञान



याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. दादा लाड कापूस लागवड तंत्रज्ञानामध्ये योग्य अंतर आणि संतुलित व गरज लागेल तेंव्हाच खतांचा वापर करणे या बाबी शेतकऱ्यांनी लक्षात घेतल्या पाहिजेत. यामध्ये पिसुरे यांनी ३० दिवसांनी गळ फांदी काढणे व ८०–९० दिवसांनी शेंडा खुडणे ही महत्त्वाची कामे आहेत. तसेच कापसाची लागवड ही ९० बाय ३० सेंटिमीटर अशा अंतरावर करावी. या पद्धतीने झाडांची एकरी संख्या वाढून उत्पन्न वाढते. तसेच सर्व शेतकऱ्यांनी बेडचा व ठिबक सिंचन पद्धतीचा वापर प्रभावीपणे करणे गरजेचे आहे आणि अन्नद्रव्य, कीड व रोग व्यवस्थापनासाठी एकात्मिक व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करावा. ज्यामध्ये निळे व पिवळे चिकट सापळे लावणे, कामगंध सापळे लावणे, निंबोळी अर्काचा नियमितपणे वापर करणे, जैविक बुरशीनाशकांचा वापर करावा, असे सांगितले. कपाशी वेचणीनंतर अनेक शेतकरी फरदड घेतात, ते घेऊ नका. त्याऐवजी पऱ्हाटीची कुट्टी करा. त्यातून चांगले सेंद्रिय खतच मिळते. परिणामी, जमिनीचा पोत सुधारतो असे डॉ. पिसुरे म्हणाले.

भाजीपाला लागवड तंत्रज्ञान

डॉ. संजुला भावर विषय विशेषज्ञ (उद्यानविद्या) यांनी भाजीपाला लागवड तंत्रज्ञान व फळबाग लागवड याविषयी मार्गदर्शन केले. यामध्ये त्यांनी प्रामख्याने टोमॅटो पिकातील विविध वाणांची माहिती दिली. उदा. अर्का रक्षक, अर्का अभेद, परभणी टोमॅटो –५ इ. वाणांची शेतकऱ्यांनी लागवड करावी, मोसंबी चिंच, आंबा या पिकांच्या फळबांगा विषयी सविस्तर मार्गदर्शन केले–

यावेळी आसडी येथील विशेष कापूस प्रकल्पांतर्गत प्रगतशील शेतकरी कमलाकर शिरसाट, कौतिक मिरगे, विष्णू पंडित यांनी कमी खर्चात अधिक उत्पादन कसे घेतले, याबद्दल आपले अनुभव शेतकऱ्यांना सांगितले. विशेष कापूस प्रकल्पाचे तांत्रिक प्रशिक्षक सतीश कदम यांनी सर्व तज्ज्ञांनी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल आभार व्यक्त केले.

## हल्ली लेखकांच्या साहित्याची समीक्षा होत नाही : मराठी साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांची खंत

छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी

मराठी साहित्याकडे गांभीर्याने पाहिले जात नाही आणि मोठ्या लेखकांच्या साहित्याची समीक्षा होत नसल्याची खंत मराठी साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांनी 'पुण्यनगरी' शी बोलताना व्यक्त केली. 'विंदांचे गद्यरूप' या ग्रंथासाठी डॉ. रसाळ यांना भारताच्या सर्वोच्च अशा मराठी साहित्य अकादमीचा पुरस्कार बुधवारी, १८ डिसेंबर रोजी जाहीर झाला. याबद्दल प्रतिक्रिया देताना डॉ. रसाळ म्हणाले, माझ्यासाठी हा सर्वोच्य पुरस्कार आहे. अतिशय पारदर्शीपणाने हा पुरस्कार दिला गेला आहे. यासाठी पुस्तक उत्तमच असले पाहिजे. कोणाचीही इथे वर्णी लागत नाही. मराठी साहित्य अकादमी ही पंडित जवाहरलाल नेहरूंनी स्थापन केलेली भारत सरकारची स्वायत्त अशी संस्था आहे. नेहरू साहित्य रसिक होते. साहित्यिकांमध्ये ते रमत. राजकारण विसरून नेहरू ते लेखकांबरोबर मनमोकळ्या गप्पा मारत. या सर्वोच्च सन्मानामुळे प्रभाकर पाध्ये, श्री. ना. पेंडसे, आरती प्रभू, जी. ए. कुलकर्णी, र. वा. दिघे यांच्या एवढा मी मोठा आहे, असे मला म्हणायचे नाही. मात्र, या दिग्गज लेखकांच्या पंक्तीत माझी वर्णी लागल्याचा आनंद होत असल्याचे रसाळ म्हणाले.

हल्ली मोठमोठ्या लेखकांच्या साहित्याची समीक्षाच होत नसल्याचे सांगताना डॉ. रसाळ म्हणाले, हल्ली उत्तम दर्जाच्या साहित्यावर कोणी समीक्षाच लिहित नाही. पाध्ये, पेंडसे, प्रभू, दिघे यांचे साहित्य सर्वांसमोर येवू शकले नाही, त्याचे कारण त्यांच्या साहित्याची समीक्षाच झाली नाही. श्री. ना. पेंडसे यांनी उत्तमोत्तम कादंबऱ्या लिहिल्या, मात्र त्यावर कोणी लिहिलेच नाही. आरती प्रभू आणि जी. ए. कुलकर्णी यांच्यावरही जुजबी लिहिलं गेले आहे. र. वा. दिघे यांनी कादंबरीला नवे रूप दिले. मात्र, कादंबरीवर बोलतना त्यांचे कोणीच नाव घेत नाही. वा. ल. कुलकर्णींचेही कोणी नाव घेत नाही.

मराठी विभाग ओस

समीक्षण व्हायचे असेल तर मराठी वाड्.मयाचे रितसर शिक्षण हवे. हल्ली विद्यापीठांतील मराठी विभाग ओस पडले आहेत. बुद्धीजिवी विद्यार्थी मराठीकडे येत नाहीत. मराठीची पदवी मिळते, पण वाड्.मयाचा विचार कसा करायचा हे त्यांना कळत नाही. मराठी साहित्याचे वाचक कमी झाले याबद्दल डॉ. रसाळ म्हणाले, मुख्यत्वे १९६० नंतर वाचकांच्या संख्येत मोठी घट झाली. महाराष्ट्रात शिक्षणाचा स्फोट झाला आहे. यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाल्यानंतर साक्षरतेचे प्रमाण वाढले. वाड्.मयीन मासिक सोडले तर एकही मासिक शिल्लक नाही.

जी आहेत, ती दुय्यम दर्जाची. रा. भि. जोशी उत्तम दर्जाचे प्रवासवर्णन लिहायचे, दुर्गा भागवत ललित, इरावती कर्वे ही मासिकांतून लेखन करीत. मासिके नष्ट झाल्यामुळे वाड्.मया प्रकार नष्ट झाले. त्यामुळे वाचक वर्गही राहिला नाही. प्रकाशन संस्थाही डबघाईस आल्या. अशा परिस्थित मराठी वाड्.मय समोर येत नाही. हल्ली जाहिर्तीमुळे वर्तमानपत्रांमधूनही समीक्षणे येत नसल्याचे रसाळ म्हणाले.

मराठी माणूस सांस्कृतिक अस्मिता विसरत चालला आहे. सांस्कृतिक अस्मिता विकसित करण्याची जबाबदारी मराठी माणसावर आहे. मराठी वृत्तपत्रात दर शुक्रवारी चारपानी साहित्य–सांस्कृतिक पुरवणी निघाल्यास पुस्तक परीक्षण, सांस्कृतिक घडामोठी आल्यास बेळगावपासून गडचिरोलीपर्यंत मराठी माणूस पेपर घेईल, असे रसाळ म्हणाले. मराठी समाजाचे अनेक प्रश्न आहेत. शेतकरी मोठ्या संख्येने आत्महत्त्या करीत आहेत. शहरी मराठी माणसांना त्याचे काहीच वाटत नाही. याविषयावर कोणी गांभीर्याने लिहित नसल्याची खंत रसाळ यांनी व्यक्त केली.

डॉ. सुधीर रसाळ यांचा परिचय

डॉ. सुधीर नरहर रसाळ हे मराठीतील सुप्रसद्ध समीक्षक आहेत. त्यांनी दिल्लीच्या साहित्य अकादमीमध्ये मराठीचे प्रतिनिधित्व केले आहे. इ .स. १९५६ पासून ते मराठी वाङ्मयाची समीक्षा करीत आहेत. साहत्यिविषयक लेखन, समीक्षा लेखन आणि संपादनात त्यांचा हातखंडा आहे. रसाळ हे सन १९९० ते १९९३ या काळात औरंगाबाद विद्यापीठाच्या मराठी भाषा व वाङ्मय विभागाचे प्रमुख होते.

डॉ. सुधीर रसाळ यांना 'विंदांचे गद्यरूप' या समीक्षणात्मक पुस्तकासाठी यंदाचा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे. सुधीर रसाळ हे सध्या ९१ वर्षांचे असून, या वयातही अलिकडेच त्यांच्या १६ व्या पुस्तकाचे प्रकाशन पार पडले.

प्राध्यापक म्हणूनही त्यांची चांगली ओळख आहे. त्यांनी शासकीय कला महाविद्यालय आणि मराठवाडा विद्यापीठात मराठीचे प्राध्यापक म्हणून काम केले. डॉ. सुधीर नरहर रसाळ हे मराठीतील सुप्रसिद्ध समीक्षक आहेत. साहित्यिविषयक लेखन, समीक्षा लेखन आणि संपादनात त्यांचा हातखंडा आहे.

रसाळ यांचे कविता व लिखान

कविता निरूपणे काही मराठी कवी : जाणिवा आणि शैली ना.घ. देशपांडे यांची कविता, मर्ढेकरांची कविता : आकलन आणि विश्लेषण, मर्ढेकरांची कविता : जाणिवांचे अंत:स्वरूप, मर्ढेकरांचे कथात्म आणि नाट्यात्म वाङ्मय, लोभस : एक गाव काही माणसं (व्यक्तिचित्रे)

वाङ्मयीन संस्कृती

समीक्षक भालचंद्र नेमाडे : साहत्यि अध्यापन आणि प्रकार, सहसंपादन (प्रा. वा. ल. कुलकर्णी गौरवग्रंथ),

पुरस्कार व मानसन्मान

अशोक कीर्तकीर पुरस्कार, महाराष्ट्र सरकारचा आदर्श शिक्षक पुरस्कार, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांच्यातर्फे दिला जाणारा गौरवमूर्ती पुरस्कार, चारठाणकर प्रतिष्ठानचा पुरस्कार, मराठवाडा साहित्य परिषदेचा १ ला जीवनगौरव पुरस्कार

प्रा. रा. श्री. जोग पुरस्कार, पद्मजा बर्वे पुरस्कार, 'वाटा कवितेच्या' कार्यक्रमात दिला जाणारा, परभणीच्या शब्द सह्याद्री प्रतिष्ठानचा २०१४ सालचा शब्द सह्याद्री साहित्य सन्मान, साहित्य समीक्षा पुरस्कार, अशोक केळकर मराठी–भाषा–अभ्यासक पुरस्कार (२०२१).

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

# आज पुन्हा स्व.देशमुख हत्या प्रकरणावर आ.क्षीरसागरांनी सभागृहात आवाज उठवला

## मुख्य सुत्रधाराला अटक न केल्यास कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होईल

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ डिसेंबर**

केज तालुक्यातील मस्साजोग गावचे सरपंच स्व.संतोष देशमुख यांच्या निघृण हत्त्या प्रकरणावर आ.संदीप क्षीरसागर सातत्याने आवाज उठवत आहेत. गुरुवारी (दि.१९) रोजीही अधिवेशनाच्या चौथ्या दिवशीही आपात्कालीन चर्चा १०१ मध्ये या गंभीर प्रकरणावर सभागृहात आ.क्षीरसागर यांनी आक्रमकपणे सर्वांचे लक्ष वेधले.

स्व.संतोष देशमुख यांच्या निघृण हत्येचा मुद्दा महाराष्ट्रभर गाजत असून, या प्रकरणात न्याय कसा आणि केव्हा मिळेल याकडे अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष लागलेले आहे. दरम्यान बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संदीप क्षीरसागर हे पहिल्या दिवसापासून आक्रमकपणे या प्रकरणात आवाज उठवत आहेत आणि पाठपुरावा करत आहेत. यात नागपूर येथे सुरू असलेल्या विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाच्या ४ थ्या दिवशीही आ.क्षीरसागरांनी या प्रकरणावर सर्वांचे लक्ष वेधले. आरोपींचे कॉल रेकॉर्ड तपासण्याची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केलेलघ आहे. ही मागणी पुन्हा एकदा सभागृहात आ.क्षीरसागर यांनी मांडली. वाल्मीक कराड हा जिल्ह्यातील सत्ताधाऱ्याच्या राजाश्रयाला असल्याने प्रशासनाकडून कारवाई केली जात नाही. परंतु लोकांच्या मनात एवढा रोष आहे, की अधिवेशन संपण्याअगोदर या गुन्ह्याच्या मुख्य सुत्रधारासह सर्व आरोपींना जर अटक झाली नाही तर कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखणे अवघड होईल. असा इशारा यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी दिला. त्यामुळे या गंभीर प्रकरणाची न्यायालयीन चौकशी करून दोषींना कठोर शासन करण्यात यावे. यासोबतच स्व.संतोष देशमुख यांच्या कुटुंबाचे पुनर्वसन करण्यासाठी शासनाने मदत करावी अशी मागणीही आ.क्षीरसागर यांनी केली.

कशामुळे वाढली गुन्हेगारी?

बीड जिल्ह्यात उद्योग नाहीत. लोकांना रोजगार नाही. त्यामुळे गुन्हेगारी क्षेत्राकडे तरूण वर्ग आकर्षित होतो. परिणामी जिल्ह्याभरात अवैध धंदे आणि त्यातून गुन्हेगारी वाढत आहे. त्यामुळे सरकारने जिल्ह्यात औद्योगिकीकरण आणि रोजगारासाठी ठोस पावले उचलावीत अशी महत्वाची मागणीही आ.संदीप क्षीरसागर यांनी केली.

परभणी येथील आंबेडकरी कार्यकर्त्याच्या मृत्यूची सखोल चौकशी करा

परभणी येथे संविधान प्रतिकृतीची विटंबना प्रकरणातून सर्वजातीय जनतेने आंदोलने केली होती. त्यातच सोमनाथ सुर्यवंशी या आंबेडकरी विचाराच्या युवक कार्यकर्त्याला पोलीसांनी अटक केली होती. सुर्यवंशी यांचा, पोलीसांच्या ताब्यात असताना मृत्यू झाला आहे. उत्तरीय तपासणीतून त्यांचा मृत्यू मारहाणीमुळे झाला असल्याचे स्पष्ट झाले आहे.



त्यामुळे या अन्यायकारक प्रकरणातही सखोल चौकशी करून न्याय द्यावा अशी मागणीही यावेळी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली.

## बीड येथे एक दिवसीय निर्यात प्रचालन कार्यशाळेचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ डिसेंबर**

राज्यामध्ये निर्यात क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी तसेच रोजगार निर्मितीचे लक्ष साध्य करण्यासाठी तसेच निर्यात वाढीला प्रत्येक जिल्ह्याला उत्तरदायी बनविण्यासाठी राज्याकडून व केंद्र शासनाकडून जिल्हा निर्यात केंद्र उपक्रमाला प्रोत्साहन देण्यात येत आहे. निर्यात प्रचालन कार्यशाळा या प्रमुख मुद्द्यांचा अंतर्भाव असलेली एकदिवसीय जिल्हास्तरीय कार्यशाळा दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी हॉटेल ग्रँड यशोदा बार्शी रोड बीड येथे सकाळी १०:०० वाजता माननीय जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा उद्योग केंद्र बीड यांच्या वतीने आयोजित करण्यात आली आहे.

सदरील कार्यशाळेमध्ये तज्ञ मार्गदर्शक व अधिकारी मार्गदर्शन करणार आहेत.या कार्यशाळेसाठी सूक्ष्म, लघु, मध्यम, उपक्रम घटक निर्यातदार, निर्यातक्षम उद्योजक, नव उद्योजक, औद्योगिक संस्था व संघटना, औद्योगिक समूह, औद्योगिक वसाहती, शेतकरी, सहकारी संस्था व उत्पादक प्रक्रिया उत्पादक केंद्र व राज्य शासनाचे तसेच संबंधित उपक्रमाचे अधिकारी जिल्हा निर्यात प्रचालन समितीचे सदस्य निर्यातीसंबंधी कामकाज करणारे घटक तसेच जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींना आमंत्रित करण्यात येणार आहे.बीड जिल्ह्यातील सर्व उद्योग घटकांनी कार्यशाळेस उपस्थित राहावे असे आवाहन किरण जाधव महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र बीड यांनी केले आहे.

## जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्याक हक्क दिन संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ डिसेंबर**

१८ डिसेंबर हा अल्पसंख्याक हक्क दिन म्हणून साजरा करण्यात येतो. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली अल्पसंख्याक हक्क दिन संपन्न झाला.

या कार्यक्रमास उपजिल्हाधिकारी (सामान्य) शैलेस सुर्यवंशी , पोलीस उपअधीक्षक यु.म. कपूर, जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी सुधाकर चिंचाणे, अधिकारी कर्मचारी अल्पसंख्याक नागरिक उपस्थित होते.

जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्याक अधिकारी सुधाकर चिंचाणे यांनी प्रस्ताविकात अल्पसंख्याक समाजासाठी राबविण्यात येत असलेल्या योजनांची माहिती दिली. उपस्थित असलेल्या नागरिकांनी अल्पसंख्याकांबाबत विविध सूचना करुन श्री. स्वामी यांना मागण्यांचे लेखी निवेदन सादर केले. श्री. चिंचाणे यांनी सुत्र संचलन व आभार प्रदर्शन केले.

# पेठ बीड हद्दीत गावठी पिस्टलने फायरिंग

## ३ आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने केले जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ डिसेंबर**

दिनांक १३/१२/२०२४ रोजी ०२.०० वा. सुमारास फिर्यादी अभिशेक विश्वास डोंगरे, रा. प्रकाश आंबेडकरनगर बार्शी नाका पेठ बीड यांचे राहते घरी आरोपी अक्षय शामराव आठवले, २)मनिष क्षीरसागर व इतर आरोपीतांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन मागील भांडण्याचे कारणाचा राग मनात धरुन जिवे मारण्याच्या उद्देशाने पिस्टलने गोळीबार करुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला. यावरुन आरोपी विरुध्द पो.स्टे.पेठ बीड येथे गुरनं ३८३/२०२४ कलम १०९, १९१(२), १९१(३), १९०,६१(२), ११५(२),३५२,३५१(२) BNS, सह कलम ३/२५ भारतीय शस्त्र अधिनियम व १३५ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये दिनांक १३/१२/२०२४ रोजी गंभीर गुन्हयाची नोंदी झाली होती. गुन्हा घडल्यापासुन गुन्हयातील आरोपी हे फरार होते त्यांचा शोध घेवुन अटक करण्यासाठी मा.पोलीस अधीक्षक,बीड यांनी स्थानिक गुन्हे शाखा,बीड यांना दिले होते.

सदर गुन्हयाचा प्रथम तपास पो.स्टे. पेठ बीड यांनी केला त्यानंतर सदर गुन्हा गंभीर व रेकॉर्डवरील आरोपींनी केलेला असल्याने यांची गंभीरता लक्षात घेता पोलीस अधीक्षक,बीड यांनी सदर गुन्हयाचा तपास उस्मान शेख, पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा यांचेकडे दिला.पो.नि.उस्मान शेख यांनी आरोपीला शोध घेण्यासाठी तपासाची चर्के फिरवले. गोपनिय बातमीदार खबऱ्यांची नेटवर्क एक्टीव केले. त्यातच पोउपनि सिध्देश्वर मुरकुटे यांचे पथकाला वरील गुन्हयातील फरार आरोपी १) अक्षय आठवले व २) मनिष क्षीरसागर हे पुणे येथे लोणीकंद भागातील गोळेगाव शिवारात एका शेतामध्ये कच्चा बांधकाम असल्याचे ठिकाणी बसलेले आहेत अशी माहिती मिळाली,सदर आरोपी हे कुख्यात आहेत ते नेहमी गावठी कट्टे गावठी पिस्टल सोबत घेवुन भिरत असतात. त्यांना पकडण्यासाठी गेल्यावर ते पोलीसांवर सुध्दा फायरींग करण्यास मागे पुढे बघनार नाही या सर्व गोष्टींचा पोलीस निरीक्षक उस्मान शेख यांनी विचार करुन त्यांनी पोउपनि सिध्देश्वर मुरकूटे व पथकाने योग्य ती खबरदारी घेवुन बातमी ठिकाणी सापळा लावयाला सांगितले. पोउपनि सिध्देश्वर मुरकूटे, पोउपनि विघ्ने व पथकाने सापळा लावून आरोपीवर झडप टाकली असता आरोपी पळुन जात असतांना त्यांचा पाठलाग करून एकास पकडले व दुसरा ऊसाचे शेतात पळाला तेव्हा त्याचा ऊसाचे शेतात पाठलाग करून पकडून त्याब्यात घेतले आहे. आरोपी अक्षय आठवले व मनिष क्षीरसागर यांना पकडल्यानंतर त्यांचेकडुन गुन्हयांचा सर्व घटनाक्रम समजला त्यात त्यांचे सोबत ओमकार सवई गुन्हयात सामील असल्याची माहिती मिळाल्याने लगेच त्वरीत मध्यरात्री ओमकार सवई यास बीड येथुन पकडले. सदर गुन्हयाचा तपास स्थानिक गुन्हे शाखा बीड येथील पोलीस निरीक्षक उस्मान शेख हे करीत आहेत.सदरची कामगिरी अविनाश बारगळ पोलीस अधीक्षक,बीड, सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड,यांचे मार्गदर्शनाखाली पोनि उस्मान शेख स्था.गु.शा.बीड, पोउपनि सिध्देश्वर मुरकूटे, पोउपनि महेश विघ्ने, पोह/मनोज वाघ, राहुल शिंदे, पोना/विकास वाघमारे, अश्विनकुमार सुरवसे, चालक राऊत यांनी मिळुन केली आहे.

## गोकुळ शिशुवाटिकेत आरोग्य तपासणी संपन्न



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ डिसेंबर**

दीनदयाल शोध संस्था संचलित गोकुळ शिशुवाटिकेत आरोग्य तपासणी संपन्न झाली. सर्वप्रथम डॉ. देवेंद्र डाके,डॉ. मंगेश अंधारे यांनी मुलांना काय खावे, काय खाऊ नये याबद्दल मार्गदर्शन केले. व तसेच गंगाधर जी देशमुख सर यांनी सर्वांना मार्गदर्शन केले. त्यानंतर ध्रुव गट, प्रल्हाद गट व स्वच्छंद गट यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्यामध्ये दात, नाक, कान,त्वचा, डोळे या सर्व अवयवांची तपासणी करण्यात आली. या सर्व कार्यक्रमासाठी डॉक्टर देवेंद्र डाके डॉ उमेश मोहिते, डॉ मंगेश अंधारे व त्यांचे टीम डॉ सपोरा, डॉ निधी, डॉ प्रिया, उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन मधुरा ताई गुळवेलकर यांनी केले. तसेच आभार प्रदर्शन उर्मिला ताई कोनार्डे यांनी केले. या कार्यक्रमासाठी मार्गदर्शन डॉ. सीमाताई जोशी, अर्चनाताई तुंगार ,सुनंदाताई कुलकर्णी व गंगाधरजी देशमुख सर यांचे लाभले.

## चिंचोली माळी ते हादगाव मंजूर रोडचे काम तात्काळ सुरु करा!

**अन्यथा तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल - रोहन गलांडे पाटील**

सार्वजनिक बांधकाम विभाग केज करतय मनमानी कारभार

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१९ डिसेंबर**



केज तालुक्यातील चिंचोली माळी ते हादगाव रोड मंजूर मागील काही महिन्यांपासून मंजूर करण्यात आला आहे परंतु विधानसभा इलेक्शनच्या आचारसंहिता लागू झाली असल्यामुळे चिंचोली माळी ते हादगाव रोड चे काम केले नाही परंतु आचारसंहिता झाली इलेक्शन झाले अनेक महीणे झाले परंतु चिंचोली माळी ते हादगाव रोडचे काम सुरू करण्यासाठी विलंब केला जात आहे कशामुळे विलंब केला जात आहे यांचे उत्तर सार्वजनिक बांधकाम विभाग केज यांनी द्यावे अन्यथा तात्काळ चिंचोली माळी ते हादगाव मंजूर रोडचे काम सुरू करण्यात यावे अशी मागणी मी अखिल भारतीय कुणबी मराठा महासंघ केज तालुकाध्यक्ष रोहन गलांडे पाटील निवेदनाद्वारे करत आहे असे रोहन गलांडे पाटील यांनी निवेदनाद्वारे म्हटले आहे तरी सार्वजनिक बांधकाम विभाग केज यांनी निवेदनाची दखल तात्काळ घ्यावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## लक्ष्मण आण्णांनी विधानसभा निवडणुकीत संजयनगर वासियांना दिलेला शब्द पाळला



**संजयनगर येथील रहिवाशांकडून लक्ष्मण आण्णांनचे मानले आभार**

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१९ डिसेंबर**

शहरातील संजयनगर येथे काही भागात लाईटच्या पोलची आवश्यकता होती संजयनगर येथील भिल्ल वस्तीच्या बाजुला असलेल्या भागात पोल नसल्याने त्या नागरिकांना खुप मोठ्या अंतरावरुन लाईट घ्यावी लागत असे त्यामुळे नागरिकांची गेल्या काही वर्षांपासून गैरसोय होत असे तेथील नागरिक पोल मिळावे म्हणून सातत्याने मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार यांच्याकडे पाठपुरावा करीत होते जनेतेच्या मागणीची दखल घेत मा.आ.लक्ष्मण आण्णांनी विज वितरण कार्यालयाकडे पाठपुरावा करुन संजयनगर येथील विद्युत पोलचा प्रश्न मार्गी लावा अशा सुचना केली होती त्यानंतर विज वितरण कार्यालयाने तेथील रहिवाशांकडून मिटर घेण्यासाठी कोटेशन भरून घेतले होते तरी सुध्दा वेगवेगळे कारणे विज वितरण कार्यालय टाळाटाळ करत होते विधानसभेच्या निवडणुकीच्या प्रचरा दरम्यान लक्ष्मण आण्णांनी निवडणुकी नंतर तुमचा प्रश्न मार्गी लागेल असा शब्द दिला होता

विधानसभा निवडणुकी दरम्यान संजयनगर वासियांना दिलेला शब्द मा.आ.लक्ष्मण आण्णांनी पाळला आज.दि.१० डिसेंबर रोजी संजयनगर येथील लाईटचे पोल उभारण्यात येऊन त्यावर विद्युत तार घेऊन संजयनगर येथील रहिवाशांची अडचण काय्यमची मार्गी लावली यावेळी मा.उपनगराध्यक्ष दादासाहेब गिरी,बाळासाहेब गायकवाड, शेख बाबा,शेख शौकत,.व नागरिक उपस्थित होते अनेक वर्षापासूनची अडचण दुर केली त्याबद्दल नागरिकांनी लक्ष्मण आण्णांनचे आभार व्यक्त केले आहे



बीड शहरातील भाजी मंडईमध्ये बोरं मोठ्या प्रमाणावर विक्री होत आहे. (छाया-कृष्णा शिंदे)

## सिंदफणा पाणीदार करून गेवराई तालुका दुष्काळमुक्त करावा

**आ.विजयसिंह पंडित यांची विधानसभेत मागणी**

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.१९ डिसेंबर**



गेवराई तालुका गोदावरी आणि सिंदफणा नदीच्या कुशीत वसला असला तरी तो सिंचनापासून दुर्लक्षित आहे. अजितदादा पवार यांच्या माध्यमातून गोदावरी नदीपात्रात झालेल्या बॅरेजच्या श्रृंखलेमुळे गोदाकाठ ओलिताखाली आला असला तरी सिंदफणा नदीचा काठ मात्र दुष्काळग्रस्त राहिला आहे. यासाठी टाकळगाव को.प.बंधाऱ्याचे निम्न पातळी बंधाऱ्यात रुपांतर करण्याच्या कामास तात्काळ प्रशासकीय मान्यता द्यावी आणि इतर बॅरेजेसच्या कामाचे सर्व्हेक्षण पूर्ण झाले असल्यामुळे त्यासही मान्यता देण्याची कार्यवाही करून सिंदफणा नदी पाणीदार करून गेवराई तालुका दुष्काळमुक्त करावा अशी मागणी आ.विजयसिंह पंडित यांनी औचित्याच्या मुद्याद्वारे विधानसभेत केली.

सिंदफणा नदी पाणीदार करण्याच्या ड्रीम प्रोजेक्टची संकल्पना जय भवानी सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन अमरसिंह पंडित यांनी सातत्याने मांडली, विधानसभा निवडणुकीच्या प्रचारादरम्यान त्यांनी मतदारांना याबाबतचे आश्वासन दिले होते. आ.विजयसिंह पंडित यांच्या जाहिरनाम्यातही त्याचा उल्लेख आहे. मतदारांना दिलेल्या आश्वासनाची पुर्ती करण्यासाठी आ.विजयसिंह पंडित यांनी हा विषय औचित्याच्या मुद्याद्वारे विधानसभेत उपस्थित केला. यावेळी बोलताना ते म्हणाले की, टाकळगाव-हिंगणी को.प.बंधाऱ्याचे निम्न पातळी बंधाऱ्यात रुपांतर करण्याच्या कामास राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने मान्यता दिली असून त्यास बाब क्र.१४० नुसार अर्थसंकल्पीय निधीची तरतुद करण्यात आली आहे. केवळ मंत्रीमंडळाच्या बैठकीसमोर हा प्रस्ताव ठेवून त्यास मान्यता देणे बाकी आहे. त्यामुळे या प्रस्तावास तात्काळ प्रशासकीय मान्यता देण्याची मागणी आ.पंडित यांनी केली.पुढे बोलताना आ.विजयसिंह पंडित म्हणाले की, सिंदफणा नदीवरील ईटकुर, अंकुटा, खुंड्रस, कुक्कडगाव, नाथापूर आणि बिंदुसरा नदीपात्रातील नामलगाव या को.प.बंधाऱ्याचे निम्न पातळी बंधाऱ्यात रुपांतर करण्याच्या कामाचे सर्व्हेक्षण आणि अन्वेषणाचे काम पूर्ण झालेले आहे, त्याचाही प्रस्ताव शासनाने मागून घेवून त्यास प्रशासकीय मान्यता देण्याची त्यांनी मागणी केली. सिंदफणा नदीकाठच्या गावातील पिण्याच्या पाण्याची टंचाई आणि कायमस्वरुपी दुष्काळाचे निर्मुलन करण्यासाठी बॅरेजची आवश्यकता असल्याची बाब त्यांनी यावेळी अधोरेखित केली. या बॅरेजमुळे गेवराई विधानसभा मतदार संघातील ३५ हजार एकर जमीन ओलिताखाली येणार असल्याचे आ.पंडित यांनी सांगितले. विधानसभा निवडणुकीतील प्रचारादरम्यान दिलेल्या आश्वासनाची पुर्ती करण्याचा हा प्रयत्न असल्याचे त्यांनी समाज माध्यमातून सांगितले आहे.

# पवनचक्कीवाल्यांच्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी शिवसेना आक्रमक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१९ डिसेंबर**

बीड जिल्ह्यात पवनचक्कीचे जाळे दिवसेंदिवस पसरत असून गुंडगिरी ही वाढत आहे. शेतात पवनचक्की उभारण्यासाठी या कंपनीकडून शेतकऱ्यांची फसवणूक केली जात आहे. पवनचक्की कंपनीच्या त्रासाला आणि गुन्हेगारीला वैतागून काही शेतकऱ्यांनी आत्महत्या करण्याचा प्रयत्न केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पवनचक्की कंपन्यांच्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी शिवसेना आक्रमक झाली असून पवनचक्की कंपनीकडून फसवणूक झालेल्या शेतकऱ्यांनी शिवसेनेच्या जिल्हा कार्यालयात लेखी स्वरुपात तक्रारी द्याव्यात असे आवाहन जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांनी केले आहे.

जिल्ह्यात पवनचक्की उभारण्याचे काम सुरू असून पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांना जमिनीचा मावेजा दिला जात नाही. शेतकऱ्यांनी मावेजा मागितल्यास स्थानिक गुंडांकडून धमकावण्याचे प्रकार घडत आहेत. तसेच शेतकऱ्यांनी मावेजासाठी पवनचक्कीचे काम अडविले तर कंपनीचे अधिकारी पोलिसांना हाताशी धरुन उलट शेतकऱ्यांनाच जेलमध्ये टाकण्याची धमकी देतात. असा आरोप मुळूक, गलधर यांनी केला आहे. पवनचक्कीवाल्यांकडून शेतकऱ्यांची रितसर परवानगी न घेता त्यांच्या शेतामधून तार ओढण्याचे काम केले जात आहे. पवनचक्की कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभाराला वैतागून सुलतानपूर येथील एका शेतकऱ्याने अंगावर पेट्रोल ओतून आत्मदहनाचा प्रयत्न केला तर नाईकवाडे नामक शेतकऱ्यावर गुन्हा दाखल करण्याचा प्रकार घडला आहे. ज्या गावात पवनचक्की उभारण्याचे काम सुरू आहे त्या गावात या कंपनीकडून स्थानिक गुंडांना हाताशी धरून शेतकऱ्यांना धमकवण्याचे व फसवणुकीचे प्रकार घडले आहेत. पवनचक्की कंपनीच्या गुन्हेगारीला वैतागून शेतकरी टोकाचे पाऊल उचलत आहेत. आता पवनचक्की कंपनीच्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी बीड जिल्हा शिवसेना आक्रमक झाली आहे. पवन चक्की कंपनीकडून जिल्ह्यात ज्या शेतकऱ्यांची फसवणूक झाली आहे. त्या सर्व शेतकऱ्यांनी कागदपत्रांसह शिवसेना बीड जिल्हा कार्यालय बार्शी रोड येथे लेखी स्वरूपात तक्रार दाखल कराव्यात असे आवाहन जिल्हाप्रमुख सचिन मुळूक, स्वप्निल गलधर यांनी केले आहे.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### परभणीच्या मेडिकलला पहिल्या महिला डॉक्टराचे देहदान

**परभणी ,/प्रतिनिधी-** जुन्या पिढीतील तथा परभणी जिल्ह्यातील पहिल्या महिला डॉक्टर श्रीमती सुनंदा लक्ष्मीनारायण मंत्री यांनी निधनापूर्वी व्यक्त केलेल्या इच्छेप्रमाणे मंत्री कुटूंबियांनी परभणीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात मंगळवारी (दि.१७) त्याांच्या पार्थीवाचे देहदान केले.

डॉ. मंत्री यांचे रविवारी (दि.१५) रात्री वसमत रस्त्याावरील मंत्री कॉम्प्लेक्स मधील निवासस्थानी वृद्धापकाळामुळे निधन झाले. मृत्यूसमयी त्याा ९६ वर्षांच्या होत्याा. डॉ. मंत्री यांनी निधनापूर्वी व्यक्त केलेल्या, संकल्प केलेल्या इच्छेप्रमाणे मंत्री कुटूंबियांनी त्यांचे देहदान केले. डॉ. मंत्री यांचे सुपूत्र तथा पद्मराज एनर्जी इंडिया लिमिटेड प्रकल्पाचे संचालक संजय मंत्री, त्याांच्या सुविद्य पती सौ. मधुरा मंत्री, मुलगा पारस मंत्री यांच्यासह या चळवळीत काम करणारे सामाजिक कार्यकर्ते विनोद डावरे यांनी डॉ. मंत्री यांच्या देहदानाची सर्व रितसर प्रक्रिया पूर्ण केली. येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील अधिष्ठाता डॉ. भिसे, जिल्हा शल्य चिकित्सक नागेश लखमावार, डॉ. बाहुबली निंबळकर, चंद्रकांत कवठेकर, डॉ. प्रज्ञा यांच्यासह डॉ. रामेश्वर नाईक, डॉ. विवेक नावंदर, अन्य वरिष्ठ अधिकारी, वैद्यकीय अधिकाऱ्यांनी सहकार्य केले. यावेळी विनोद दुधगावकर, उमाकांत पाचलिंग, ज्येष्ठ पत्रकार रमाकांत कुलकर्णी, आसाराम लोमटे, प्रविण देशपांडे, प्रविण चौधरी आदी उपस्थित होते. दरम्यान, परभणी येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात डॉ. मंत्री यांचे देहदान हे पहिले ठरले आहे.

### बरबडीतील अंगणवाडी मदतनीसची आत्महत्या

**पालम ,/प्रतिनिधी-** तालुक्यातील बरबडी येथील अंगणवाडी मदतनीस वनिता रामा शिंदे यांनी सोमवारी (दि.१६) गाव शिवारातील विहिरीत उडी मारुन आत्महत्याा केल्याची घटना घडली. अर्जुन शिंदे यांनी या घटनेची माहिती पूर्णा पोलिसांना दिली. त्याानंतर पोलीस निरीक्षक विलास गोबाडे, पोलीस उपनिरीक्षक प्रकाश शिंदे, अमर चाऊस यांनी तत्काळ घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन केला. या प्रकरणी पूर्णा पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून आत्महत्येचे नेमके कारण अद्याप समजू शकले नाही. प्रकरणाचा पुढील तपास पोलीस कर्मचारी अमर चाऊस करत आहेत. दरम्यान, मंगळवारी सकाळी वनिता शिंदे यांच्या पार्थीवावर अंत्यासंस्कार करण्यात आले. त्याांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

### महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहिर

**परभणी ,/प्रतिनिधी-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे २०२५ मध्ये आयोजित विविध स्पर्धा परीक्षांचे अंदाजित वेळापत्राक आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आले आहे. उमेदवारांनी संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेल्या वेळापत्राकानुसार उमेदवाराच्या एकापेक्षा अधिक परीक्षा एकाच दिवशी येऊन त्याांची संधी हिरावली जावू नये, त्याांना जास्तीत जास्त परीक्षेची संधी मिळावी, या हेतूने प्रसिद्ध करण्यात आले आहे, असे आयोगाचे अवर सचिव र. प्र. ओतारी यांनी कळविले आहे.

### वृत्तपत्र व छायाचित्रकार संघटनेव्दारे साकडे

**परभणी ,/प्रतिनिधी-** येथील वृत्तपत्र मुक्त छायाचित्राकार नाझिम सिद्दीकी यांच्यावर केलेल्या हल्ल्यासह खोटे गुन्हे दाखल केल्याच्या प्रकरणात सखोल चौकशी करावी, अशी मागणी वृत्तपत्रा व छायाचित्रकार संघटनेने नांदेड येथील विशेष पोलिस महानिरीक्षकांना पाठविलेल्या निवेदनाद्वारे केली आहे.

वृत्तपत्रा छायाचित्रकार नाझिम सिध्दीकी यांच्यावर १८ ऑक्टोंबर २०२४ रोजी अब्रार ईलाही व त्याांच्या दोन भावांनी पूर्ववैमनस्यातून हल्ला केला, जबर मारहाण केली, उलट त्याांच्याच विरोधात खोटा गुन्हा दाखल केला, असे या संघटनेने या निवेदनातून म्हटले असून जात पडताळणी कार्यालयात ते व अन्य दोघे भाऊ संगनमत करीत करत असलेल्या दलालीबद्दल वृत्तपत्राातून प्रकाशित बातम्या व लोकप्रतिनिधींनी उठविलेल्या आवाजाचा राग धरुनच नाझिम यांच्यावर हा हल्ला व खोटा गुन्हा दाखल करण्यात आला आहे, असे या संघटनेने म्हटले. महसूल प्रशासनाने अब्रार ईलाही यांच्या घरावर छापा टाकून बरेच खोटे साहित्या व प्रमाणपत्रा जप्त केली. त्याबद्दल न्यायालयात हे प्रकरण प्रविष्ठ आहे, असेही निदर्शनास आणून दिले व या प्रकरणात सखोल चौकशी करीत नाझिज सिद्दीकी यांना न्याय मिळवून द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली. निवेदनावर शैलेश डहाळे, राजेश बालटकर, रवि मानवतकर, दिलीप बनकर, संजय घनसावंत, गोकूळ लोया, राजू कर्डिले, कलीम कुरेशी आदी छायाचित्रकारांच्या स्वाक्षऱ्या आहेत.



परभणी- अॅड.धर्मपाल मेश्राम उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा) महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोग यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

तरुण भारत
कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी
❑ दैनिक ❑ वेबसाईट ❑ सोशल मिडिया
छोट्या जाहीराती व प्रगटनासाठी
खरेदी-विक्री-प्रॉपर्टी व वाहन/भाडेपट्टी/नोकरी विषयक/प्रवेश/ विवाह विषयक/ शैक्षणिक/ आरोग्य/ ड्रायव्हिंग स्कूल/ मोबाईल/ हॉटेल/ रेस्टॉरंट/ आईस्क्रिम पार्लर/ मसाज पार्लर/ ब्युटी पार्लर/ कागदपत्रे हरवले/ चेंज ऑफ नेम/ न्यायालयीन व धर्मादाय आयुक्त कार्यालय प्रगटने/

# जिंतूर तालुक्यातील रिक्त पदामुळे महावितरणचा कारभार ढेपाळला

## वीज सुविधेवर परिणाम :- बदली झालेल्या रिक्त पदांवर अधिकारी मिळणार कधी?

**रामप्रसाद कंठाळे**

**जिंतूर,/प्रतिनिधी:** महावितरण कार्यालयातील उपकार्यकारी अभियंत्याासह अर्बन विभागाचे आणि ग्रामीण विभागातील सहायक अभियंत्याांची पदे रिक्त असल्याने शहर आणि ग्रामीण भागातील विभाग निराधार झाला असल्याचे चित्र आहे. महत्त्वाची पदे रिक्त असल्याने ग्राहकांच्या अडचणी सुटत नसल्याचे चित्र आहे.

महावितरणमध्ये उपकार्यकारी अभियंता यांच्यासह शहर एक आणि ग्रामीण भागात चार अशा एकूण तीन सहायक अभियंता तर उपविभाग साहायक अभियंता चार अशी एकूण ८ पदे मंजूर आहेत. उपकार्यकारी अभियंता मागील दीड वर्षांपूर्वी बदली झालेली असून त्याा ठिकाणी प्रभारी पदभारच चालू आहे हे पद रिक्त असल्याने जिंतूर तालुक्यातील २८८ गावांचा कारभार याच कार्यालय मधून पाहिला जात आहे त्यापैकी केवळ दोन शिकाऊ अभियंत्याच्या खांद्यावर जबाबदारी देऊन सदरील कारभार हाकला जात आहे. सहायक अभियंता गेल्यावर्षी बदली झालेल्या एक सहायक अभियंता आणि उपविभाग सहायक अभियंता पद १८ महिन्यांपासून रिक्त आहेत. ग्रामीण विभाग पीसी २ आणि शहर विभागासह ग्रामीण भागाचा कार्यभार सहायक अभियंता हे पाहत आहेत तालुक्यातील. १८८ गावांचा भार पडला आहे. त्याा २०४०० हजारांवर ग्राहक आहेत. सण उत्सवाच्या काळ विजेच्या समस्या मुळे ग्राहक हैराण, गणेशोत्सव, नवरात्र, विजयादशमी दीपावली यासारखे मोठे सण- उत्सव निवडणूक वेळेसही पदे न भरल्याने उपलब्ध अधिकारी कर्मचाऱ्यावर कामाचा ताण पडला होता. पावसाळ्याच्या दिवसातही वीज वारंवार वीज गायब होती . ग्राहक हैराण होत आहेत.यामुळे रिक्त असलेल्या सहायक अभियंत्याची पदे तातडीने भरणे गरजेचे झाले आहे.

### अतिरिक्त कामाचा कर्मचाऱ्यांवर ताण

**वीज ग्राहकांची सेवा सुरळीत रहावी, यासाठी महावितरणकडून मान्सूनपूर्व देखभाल दुरुस्तीसह उपाययोजना केल्या जातात. मात्र याची अंमलबजावणी करण्यासाठी यंत्रणा तोकडी असल्याने वीजपुरवठ्यावर परिणाम होत आहे. हलक्या पाऊस, वाऱ्यामुळे वीजपुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे दुरुस्तीसाठी कर्मचाऱ्यांवर अतिरिक्त कामाचा ताण वाढला आहे.**

### रिक्त पद संख्या खालील प्रमाणे

| | |
|---|---|
| उपकार्यकारी अभियंता | - ०१ |
| सहाय्यक अभियंता | - ० १ |
| कनिष्ठ अभियंता | - ० १ |
| जिंतूर शहर अभियंते | - ०१ |
| ग्रामीण बामणी | - ०१ |
| भोगाव देवी | - ०१ |

**तालुक्यातील एकूण लाईन मन संख्या मंजूर पद ६९ कार्यरत ४६ रिक्त २३ ३३ उपकेंद्र तालुक्यात एकूण १५ आहेत. ११ के व्ही फिटर ६४ तालुक्यात आहेत.**

| | | |
|---|---|---|
| ग्राहक संख्या | - | २०४०० |
| घरगुती | - | ८४०० |
| वाणिज्य | - | १२००० |
| औद्योगिक | | |

**तालुक्यातील बंद करण्यात आलेले कार्यालय ०३ १)कौसडी ऑफिस जिंतूर शहरात विलीन केले. २)चालठाणा ऑफिस जिंतूर ग्रामीण एक शाखेमध्ये विलीन केले. ३)आडगाव बाजार ऑफिस भोगाव देवी शाखेत विलीन केले.**

**जिंतूर तालुक्यातील महावितरणच्या रिक्त पदामुळे अनेक ग्राहकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे. शासनाने लवकरात लवकर रिक्त जागा भरावेत.**
**-अ.भा.ग्राहकचे अध्यक्ष मंचक देशमुख**

**ग्रामीण भागातील लाईट समस्या रोजची झाली आहे. अनेक वेळा तक्रारी करू नही अपुरा कर्मचारी वर्ग असल्याने शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत आहे.**
**- शेतकरी : आबासाहेब जाधव**

## सोनपेठ शहरात प्रथमच आमदार चषक

**एक लाख दहा हजाराचे पहिले बक्षीस, राष्ट्रवादी युवक कॉंग्रेस कडून क्रिकेट स्पर्धेचे आयोजन.**



**सोनपेठ,/प्रतिनिधी-** सोनपेठ शहर राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसच्या वतीने प्रथमच आमदार चषक भव्य खुल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे दि २५ डिसेंबर रोजी आयोजन करण्यात आले आहे.

शहरातील गणेश जिनिंग मैदानावर भव्य खुल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे . या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रातील विविध भागातून स्पर्धक सहभागी होणार आहेत. क्रिकेट स्पर्धाचे प्रथम पारितोषिक १०१०१० रूपये तर द्वितीय पारितोषिक ७१०१० रूपये ठेवण्यात आले आहे. त्याचबरोबर मॅन ऑफ द सिरिज , मॅन ऑफ द मॅच, (अंतीम सामना) बेस्ट बॉलवर , बेस्ट बॅस्टमेन, बेस्ट फिल्डर , बेस्ट किपर, यांसह विविध बक्षिसे ठेवण्यात आली आहे. इच्छुक संघानी दि.२४ डिसेंबर पर्यंत नावनोंदणी करावी.नोंदणी शुल्क १५२० रूपये असुन आमदार चषक भव्य खुल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत सहभागी व्हावे असे आवाहन स्पर्धेचे आयोजक माजी नगरसेवक अँड श्रीकांत विटेकर युवानेते कल्पेश राठोड यांनी केले आहे.

## जिंतूरात सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरणी आसूड मोर्चा

**प्रचंड घोषणाबाजी करत आरोपीवर कडक कार्यवाहीची मागणी**

**जिंतूर,/प्रतिनिधी-** बिड जिल्ह्यातील मस्साजोग गावचे आदर्श सरपंच संतोष अण्णा देशमुख यांचे अपहरण करून निर्घृण खून केलेल्या प्रकरणातील सर्व आरोपींना अटक करून कडक कार्यवाही करण्याच्या मागणीसाठी दिनांक १९ डिसेंबर रोजी भव्य आसूड मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.

बिड जिल्ह्यातील केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे भर दिवसा अपहरण करून निर्घृण हत्याा करत माणुसकीला काळिमा फासणाऱ्या घटनेने पूर्ण समाजमन ढवळुन निघाले आहे संपूर्ण बिड जिल्हाच नव्हे तर महाराष्ट्रात असुरक्षिततेचे सावट आहे घडलेल्या गुन्ह्याची व्याप्ती बघता कायद्याची अंमलबजावणी करणारे पोलिसच गुन्हेगाराना पाठीशी घालत आहेत शिवाय गुन्हेगावर राजकीय वरदहस्त




असल्यामुळे गुन्ह्यातील आरोपी आजही फरार आहेत म्हणून घटनेचा निषेध करून गुन्ह्यातील सर्व आरोपीना अटक करावी, घटनेचा मुख्यसूत्रधार शोधावा, खून खटला जलदगती न्यायालयात चालून आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी या मागणीसाठी भव्य आसूड मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते सदरील मोर्चा बाजार समितीच्या मैदानांवरून मुख्य चौक,छत्रपती शिवाजी महाराज चौक,बसस्थानक येथून राज्य सरकारच्या विरोधात प्रचंड घोषणाबाजी करत तहसील कार्यालया समोर मोर्चा धडकला यावेळी तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री गृहमंत्री यांना निवेदन देण्यात आले यावेळी नागरिकांनी आपल्या तीव्र भावना व्यक्त करत येत्याा काही दिवसात सर्व आरोपी अटक झाले नाही तर आंदोलन तीव्र करणार असल्याचे दिसून आले.



**जिंतूर- सेलु विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार सौ मेघनाताई बोर्डीकर साकोरे यांची विधानसभा निवड झाल्याबद्दल वमहाराष्ट्र राज्याच्या राज्यमंत्रीपदी निवड झाल्याबद्दल नागपूर येथे जाऊन जिंतूर येथील भाजपचे कार्यकर्ते माधवराव दराडे भारतीय जनता पार्टीचे युवा मोर्चातालुका अध्यक्ष व मोर्चा शिवाजीराव काळे दिवसाडी येथील सरपंच वाल्मीक टाकरस धमधम येथील सरपंच राजू घुगे सरपंच विष्णू गीते अधि कार्यकर्त्यांनी हिवाळी अधिवेशन नागपूर येथे जाऊन आमदार व राज्यमंत्रीपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना छायाचित्रात दिसत आहेत.**

## मंजूश्री सुरेश घोणे हिची आंतरराष्ट्रीय बुध्दीबळ स्पर्धेसाठी झाली निवड

**सोनपेठ,/प्रतिनिधी-** तालुक्यातील डिघोळ येथील मंजुश्री सुरेश घोणे यांची २७ ते ३० डिसेंबर २०२४ रोजी भारतातील तामिळनाडू राज्यातील मदुराई येथे होणाऱ्या अथेन्स ऑफ द ईस्ट ४ थी इंटरनॅशनल ओपन रेटेड बुद्धिबळ स्पर्धा-२०२४ श्रेणी-, १८०० च्या खाली स्पर्धेसाठी निवड झाली आहे.



दरम्यान बुद्धिबळपटूंसाठी प्रमुख आंतरराष्ट्रीय स्पर्धांपैकी एक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या स्पर्धेत जगभरातील सहभागी रेटिंग मिळवण्यासाठी स्पर्धा करतील.

परभणी जिल्ह्यातील सोनपेठ तालुक्यातील डीघोळ येथील रहिवासी, मंजुश्रीची निवड ही एक महत्त्वपूर्ण कामगिरी आहे. जी त्याच्या खेळाप्रती असलेले त्यांचे समर्पण प्रतिबिंबित करते. अथेन्स ऑफ द ईस्ट टूर्नामेंट उदयोन्मुख आणि महत्त्वाकांक्षी बुद्धिबळपटूंना आंतरराष्ट्रीय वातावरणात त्याांची कौशल्ये, रणनीती आणि मानसिक लवचिकता तपासण्यासाठी एक स्पर्धात्मक व्यासपीठ प्रदान करते. मंजूश्रीचा सहभाग परभणी जिल्हासाठी एक अभिमानाचा क्षण आहे. अथेन्स ऑफ द ईस्ट टूर्नामेंट विविध श्रेणींमध्ये कुशल खेळाडू तयार करण्यासाठी ओळखली जाते, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय प्रदर्शन आणि अनुभव मिळविण्याची मौल्यवान संधी मिळते. मंजुश्री घोणे यांनी या स्पर्धेसाठी उत्साह व्यक्त केला आणि विविध पार्श्वभूमी असलेल्या खेळाडूंशी स्पर्धा करण्यास उत्सुक आहे. त्याचा सहभाग तरुण बुद्धिबळप्रेमींसाठी प्रोत्साहनाचा स्तोत्र आहे.शहरे आणि प्रदेशांतील, खेळाडूंना मोठ्या व्यासपीठांवर ओळख निर्माण करण्यासाठी.

# अतिवृष्टीच्या अनुदानाची शेतकऱ्यांना प्रतिक्षा...

## ईकेवायसी करुनही अनुदानापासून शेतकरी अदयापही वंचितच

**शिवाजी आकात**

**सेलू,/प्रतिनिधी:** खरीप हंगामात सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी व पुरामुळे पिकांचे अतानोत नुकसान झाले होते. त्याामुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास गेला होता. या नुकसानीचे पंचनामे करण्यात आले होते. त्यानंतर नुकसान भरपाईसाठी शासनाकडे महसूल विभागाने याद्या पाठविल्या. तसेच शेतकऱ्यांनी अनेक समस्यांचा सामना करीत ई-केवायसी करून घेण्यात आल्या आहेत. परंतु बरेच दिवस झाले तरी अद्याप शेतकऱ्यांच्या खात्याावर अतिवृष्टीचे अनुदान पडत नसल्याने शेतकऱ्यांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

### बाधित शेतकरी ५६ हजार ६१

**तालुक्यात एकूण बाधित शेतकरी ५६ हजार ६१ एवढे असून तालुक्यात एकूण बाधित क्षेत्रा ५२ हजार ४९० हेक्टर आहे. सुधारित दरानुसार ७१ कोटी ३८ लाख ६४ हजार ४७६ रूपये नुकसान भरपाई मिळणार आहे. पोर्टलवर उपलब्ध शेतकरी संख्या ४२ हजार ५२१ एवढी असून पोर्टलवर अपलोड करण्यात आलेली रक्कम ५८ कोटी ९८ लाख १७ हजार ३१२ एवढी आहे. बाधित शेतक-यांपैकी ८२.६२ शेतकऱ्यांना अनुदान मिळणार आहे.**

तालुक्यात सप्टेंबरमध्ये मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी होवून नदी-नाल्यांना पूर आले होते. यात शेतकऱ्यांच्या खरीप पिकांचे व घरांचे नुकसान झाले होते. या नुकसानीची पाहणी करण्यासाठी शासनाचे अधिकारी, राजकीय नेते, लोकप्रतिनिधी शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले होते. त्यांनी पाहणी करून शेतकऱ्यांना तात्काळ अतिवृष्टीचे अनुदान देण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. तसेच तात्काळ पंचनामे करून



घेण्याचे सांगण्यात आले होते. त्यानुसार महसूल विभागाने अतिवृष्टीत नुकसान झालेल्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून शासनाकडे बाधित क्षेत्राचा अहवाल पाठविला होता. त्यानंतर अनुदान मंजूर झालेल्या शेतकऱ्यांच्या याद्या प्रसिध्द करण्यात आल्या.

तर शेतकऱ्यांना ई-केवायसी करून घेण्याचे सांगण्यात आले. शेतकऱ्यांनी मोठ्या अडचणींना सामोरे जात ई-केवायसी करून घेतल्या आहेत. त्यालाही आता अनेक दिवस उलटले असून अद्यापपर्यंत तालुक्यातील शेतकरी अनुदानापासून वंचितच राहिले आहेत. अनुदान कधी मिळणार याची प्रतीक्षा शेतकऱ्यांना लागली असून शासनाच्या विरोधात शेतकऱ्यांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

दरम्यान या शासनाकडे व्यापार, उद्योग, रस्ते आदी बाबींसाठी कोट्यवधींचा निधी वितरित करण्यासाठीचे नियोजन आहे. तर मग शेतकऱ्यांच्या अतिवृष्टी अनुदानासाठी हे नियोजन का लावले जात नाही? असा सवाल शेतकरी वर्गातून होत आहे.

# महसुल पथकासोबत पोलिस संरक्षण आणि वाहने द्या

## अन्यथा कोणताही कर्मचारी पथकात काम करणार नाही- तलाठी संघटना



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ डिसेंबर.**

जिल्ह्यातील विविध तालुक्यांतर्गत तहसीलदारांच्या आदेशान्वये अवैध गौण खनिज प्रतिबंधक पथके स्थापन करण्यात आली आहेत. रात्रीबेरात्री ही पथके पोलिस संरक्षणविना कार्यवाही करीत असतांना त्यांच्यावर जीवघेणा हल्ला होत आहे. त्यामुळे या पथकांच्या संरक्षणासाठी दोन बंदुकधारी पोलिस आणि शासकीय वाहने देण्याची मागणी तसेच कळमनुरी येथील पथकावर झालेल्या हल्ल्याचा निषेध करीत महाराष्ट्र राज्य तलाठी संघटनेच्यावतीने जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

महसुल विभागाची पथके अवैध गौण खनिल रोखण्यासाठी रात्री बेरात्री जात आहेत. पथकाने कार्यवाही केल्यास गौण खनिज माफीयांकडून संघटीतपणे हल्ले होत आहेत. या हल्ल्यात अनेक तलाठी, मंडळ अधिकारी गंभीर जखमी झाले आहेत. यापूर्वी कोंढूर सज्जाचे तलाठी जगदीश कुलकर्णी यांनी अवैध गौण खनिज वाहन पकडल्यानंतर त्यांना जबर मारहाण करून ट्रॅक्टरखाली चिरडण्याचा प्रयत्न माफीयांकडून झाला. औंढा नागनाथ येथील मंडळ अधिकारी श्रीमती शिरसाट यांच्या दुचाकीला धडक देऊन रेती भरलेले वाहन पळून गेले. नांदापूर येथील मंडळ अधिकारी विनायक किनोळकर व तलाठी बेले सज्जा सोडेगाव यांना मारण्याची धमकी देऊन चार ते पाच अज्ञात व्यक्तीने विना नंबरचे ट्रॅक्टर पळवून नेले. डोंगरकडा येथील मंडळ अधिकारी यांच्या पथकावर दि १७ डिसेंबर रोजी हल्ला करून तलाठी कदम यांना जबर मारहाण करून जखमी केले व ट्रॅक्टर पळून नेले. हिंगोलीचे मंडळ अधिकारी सय्यद अय्युब सय्यद रसूल यांच्या पथकावर गस्त घालीत असतांना त्यांची गाडी अडवून धमकी देऊन वाहन पळवून नेले. हा सर्व घटनाक्रम पाहता पथकात काम करतांना पथकातील कर्मचाऱ्यांच्या जीवीत्वास धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पथकासोबत दोन बंदुकधारी शिपाई देण्यात यावे आणि शासकीय वाहन देण्यात यावे अन्यथा कोणताही कर्मचारी पथकामध्ये काम करणार नाही असा इशारा तलाठी संघटनेच्यावतीने निवेदनात देण्यात आला आहे. कळमनुरी येथील पथकावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी आरोपींना तत्काळ अटक करून त्यांच्यावर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात यावा अन्यथा सोमवारपासून जिल्ह्यातील संपूर्ण मंडळ अधिकारी तसेच ग्राम महसूल अधिकारी बेमुदत काम बंद आंदोलन करतील, असा इशाराही देण्यात आला आहे. निवेदनावर विभागीय अध्यक्ष सय्यद अय्युब, जिल्हाध्यक्ष विनोद ठाकरे, सचिव विनायक किन्होळकर यांच्यासह मंडळ अधिकारी, तलाठी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# कळमनुरी शिवारात वाळू तस्करांचा महसूल पथकावर हल्ला

## तलाठी जखमी, सात जणांवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ डिसेंबर**

कळमनुरी शिवारात अवैध गौणखनिज वाहतुक करणाऱ्या वाहनांवर कारवाई केली जात असतांना वाळू तस्करांनी महसूल विभागाच्या पथकावर हल्ला करून एका तलाठ्यास जखमी केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी दि १८ डिसेंबर रोजी पहाटे सात जणांवर कळमनुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पोलिसांनी आरोपींची शोध मोहीम सुरू केली आहे.

हिंगोली जिल्ह्यात अवैधरित्या होणारी गौण खनिल वाहतूक रोखण्यासाठी महसूल विभागाकडून पथके स्थापन करण्यात आली आहेत. दिवसा ही पथके वाळू घाटाच्या परिसरात पाहणी करीत असल्यामुळे वाळू तस्कर रात्रीच्यावेळी गौण खनिजाची उत्खनन करून वाहतुक करीत आहेत. त्यामुळे महसूलचे पथक रात्रीच्या वेळीही तपासणी करू लागले आहेत.

दरम्यान, कळमनुरी तालुक्यातील नांदापूर शिवारातून एका ट्रॅक्टरमधून वाळूची वाहतूक होत असल्याची माहीती पथकाला मिळाली होती. त्यावरून मंडळी अधिकारी प्रेमदास चव्हाण, आनंद काकडे, तलाठी संतोष शेवाळकर, एकनाथ कदम, विशाल पतंगे, गणेश माखणे यांच्या पथकाने मध्यरात्रीच्या सुमारास हिंगोली ते कळमनुरी मार्गावर उमरा फाटा येथे एक ट्रॅक्टर थांबविले. यावेळी त्यांनी तलाठी एकनाथ कदम व विशाल पतंगे यांना ट्रॅक्टरवर बसवून ट्रॅक्टर पोलिस ठाण्यात नेण्यास सांगितले.

त्यानंतर सदर ट्रॅक्टर कळमनुरी शिवारात आले असतांना एका स्कॉर्पिओ मधून आलेल्या सात जणांनी ट्रॅक्टर अडवून महसूलच्या पथकावर हल्ला केला. त्यांनी तलाठी कदम आणि पतंगे यांना गच्चीला धरून खाली उतरविले. त्यानंतर पथकावर काठीने हल्ला केला. यावेळी कदम यांनी काठीचा वार हातावर घेतला असता त्यांच्या अंगठ्याला गंभीर दुखापत झाली. त्यानंतर तस्करांनी वाळू खाली सांडून ट्रॅक्टरसह पळ काढला. याप्रकरणी मंडळ अधिकारी चव्हाण यांनी दिलेल्या तक्रारीवरून कळमनुरी पोलिसांनी प्रकाश गिराम, शुभम गिराम, आसीफ शेख, ओम गिराम सर्व रा मसोड ता कळमनुरी, दत्ता माहोरे व अन्य दोघे अशासात जणांवर गुन्हा दाखल केला आहे. पोलिस निरीक्षक मोहन भोसले, सहाय्यक पोलिस निरीक्षक शेवाळे, उपनिरीक्षक संतोष इंगळे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली आहे. पोलिसांनी आरोपीचा शोध सुरू केला आहे.

जिल्ह्यात वाळू तस्करांचे मोठे रॅकेट पसरले असून या वाळू तस्करांचे लागेबांधे राजकीय पुढाऱ्यांसोबत असल्यामुळे त्यांची मुजोरी दिवसेंदिवस वाढत आहे. सेनगाव तालुक्यातील ब्रम्हवाडी, औंढा तालुक्यातील पूर्णा नदीच्या पात्रातून वाळू तस्कर मोठ्या प्रमाणावर अवैध वाळू उपसा करून ती अव्वाच्या सव्वा भावाला विकत आहे. तसेच हिंगोली तालुक्यातील जवळा पळशी शिवारातून, समगा येथील नदी पात्रातूनही मोठ्या प्रमाणावर वाळूचा उपसा होत आहे. पहाटे चार वाजल्यापासून सकाळी सहा वाजेपर्यंत शहरातील विविध मार्गाने अवैध वाळूंचे टिप्पर आणि वाळू तस्करांच्या गाड्या फिरतांना दिसत आहेत.

# साडी वाटपाच्या बहाण्याने लुटणारे २४ तासात जेरबंद



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ डिसेंबर**

आखाडा बाळापूर येथे साडी वाटपाच्या बहाण्याने महिलेस लुटणाऱ्या भामट्यास स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने २४ तासात बुधवारी रात्री हिंगोली शहरातून अटक केली असून त्यांच्याकडून मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपींकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार आखाडा बाळापूर येथील मराठवाडा चौकात मंगळवार दि १७ डिसेंबर रोजी आठवडी बाजारासाठी आलेल्या ध्रुपताबाई वागतकर यांना साडी वाटप होत असून तुम्ही दागिने काढून ठेवा असे म्हणत त्यांच्याजवळील दागिने भामट्यांनी पळविले. या प्रकरणी आखाडा बाळापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच सीसीटीव्ही फुटेजमध्ये भामट्यांचे फुटेज आले होते. याप्रकरणात पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, अप्पर पोलिस अधीक्षक अर्चना पाटील, स्थानीक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विकास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या पथकाकडे तपासाची जबाबदारी देण्यात आली. त्यावरून गुन्हे शाखेचे उपनिरीक्षक विक्रम विठुबोने, जमादार विशाल खंडागळे, किशोर सावंत, राजु ठाकूर, दत्ता नागरे, लिंबाजी वाहुळे, स्वामी यांच्या पथकाने भामट्यांचा शोध सुरू केला होता. यामध्ये एक भामटा परभणी जिल्ह्यातील मानवत तालुक्यातील असल्याची माहीती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून हे पथक बुधवारी परभणी जिल्ह्यात गेले होते. त्याठिकाणी अधिक माहीती घेतली असता सदर भामटा हिंगोली जिल्ह्यातच असून वसमत तालुक्यातील चोंढी येथील त्याचा साथीदार असल्याची माहीती पथकाच्या हाती लागली.

त्यावरून या पथकाने रात्रीच्या वेळी हिंगोली शहरात शोध मोहीम राबवून रामचरण काळे रा मंगरूळ ता मानवत याला ताब्यात घेतले. त्यानंतर त्याचा साथीदार सुनील शिंदे रा चोंढी ता वसमत यास पाठलाग करून ताब्यात घेतले असून त्यांच्याकडून महिलेकडून लुटलेला ४६ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या दोघांना अधिक तपासासाठी आखाडा बाळापूर पोलिसांच्या हवाली करण्यात आले आहे. त्यांच्याकडून आणखी काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

# समाज कल्याण विभागाच्यावतीने क्रिडा व सांस्कृतिक स्पर्धा उत्साहात



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ डिसेंबर**

समाज कल्याण विभाग अंतर्गत राज्यात अनुसूचित जाती, नवबौद्ध मुला-मुलींच्या ९३ निवासी शाळा व दोन शासकीय सफाई कामगाराच्या मुला मुलींच्या शाळा सुरू आहेत. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग अंतर्गत नवनवीन उपक्रम राबविले जातात. सदरील कला व क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यासाठी समाज कल्याण विभागाचे आयुक्त बकोरिया समाज कल्याण विभागाच्या लातूर प्रादेशिक विभागाचे उपायुक्त अविनाश देवसटवार व समाज कल्याण विभागातील हिंगोली कार्यालयाचे सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील विद्यार्थी व कर्मचारी स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे.

सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या कला गुणांचा वाव मिळावा तसेच क्रीडा कौशल्य विकसित होण्यासाठी वार्षिक स्नेहसंमेलन सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे क्रीडा स्पर्धेत १०० मीटर, २०० मीटर, ४०० मीटर, धावणे लांब उडी, थाळीफेक, रस्सीखेच फुटबॉल, खो-खो तर भूमिका अभिनय स्पर्धेत निरोगी वाढ पौष्टिक आहार, वैयक्तिक सुरक्षा इंटरनेटचा सुरक्षित वापर, अमली पदार्थांचा गैरवापर या विषयाचा समावेश आहे लोकनृत्य स्पर्धेसाठी मुलगा मुलगी एक समान, मुलांच्या विकासात संयुक्त कुटुंबाचे भूमिका, पर्यावरण संरक्षण, मादकद्रव्यांचे सेवन रोखणे, अवस्थेतील निरोगी नातेसंबंध,इत्यादी विषय ठेवण्यात आले होते तसेच समाज कल्याण विभागाच्या आस्थापनेवरील अधिकारी कर्मचारी यांच्यासाठी क्रिकेट, खो-खो, कबड्डी, हॉलीबॉल, बॅडमिंटन, टेबल टेनिस, बुद्धिबळ या स्पर्धेचे उद्घाटन सहायक आयुक्त यादव गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली समाज कल्याण कार्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक आत्माराम वागतकर, साहायक लेखाअधिकारी श्रीकांत कोरडे यांच्या हस्ते करण्यात आले तर प्रमुख उपस्थितीमध्ये विनोद कांगणे उपस्थित होते. सहा दिवस चालणाऱ्या या स्पर्धेच्या यशस्वीतेसाठी अनुसूचित जाती मुलींची शाळेचे मुख्याध्यापक मारुती कवठेकर व शाळेतील कर्मचारी, प्रमोद हजारे, विठ्ठल गिरी, नागराज भिसे, लक्ष्मण गावंडे, केवलप्रसाद बिसेन, मंगेश नपते, गजानन ढवळे, रमेश जावळे, संदीप मुळे, रणजितसिंग, हेमराज पाईकराव, विठ्ठल उबाळे यांनी व शाळेतील सफाई व सुरक्षा क्रमचारी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले.

## संक्षिप्त वृत्त

### वामनराव बोर्डीकर शाळेत आनंद नगरीला प्रतिसाद



औंढा नागनाथ- येथील दरेगाव रोड लगत असलेल्या कैलासवासी वामनराव बोर्डीकर इंग्लिश स्कूल येथे दिनांक १७ डिसेंबर मंगळवार रोजी दुपारी बारा वाजे दरम्यान आनंद नगरी चा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यामध्ये चिमुकल्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन खाद्यपदार्थाचे विविध स्टॉल लावण्यात आले होते विविध खाद्यपदार्थ विकून विद्यार्थ्यांनी खरी कमाई केली. तत्पूर्वी फीत कापून माजी प्राचार्य नारायण बावडेकर यांच्या हस्ते आनंद नगरीचे उद्घाटन करण्यात आले यावेळी मुख्याध्यापक राजेंद्र सांगळे, विजय खिल्लारे, संजीवनी सांगळे, राम रावल, सुमन राठोड, शीतल राठोड, वैष्णवी शिंदे, काजल जोगदंड, पायल जैस्वाल, प्रणिता महाजन, मोना स्वामी, स्वाती पोले यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### ॲग्रीस्टॅक योजनेच्या कामाला तलाठ्यांचा नकार



औंढा नागनाथ- कृषी विभागाच्या ॲग्रीस्टॅक योजनेबाबतच्या कामास नकार अनुषंगाने महाराष्ट्र राज्य तलाठी संघ औंढा नागनाथ कडून नकार दिला असून याबाबतचे निवेदन दिनांक १८ डिसेंबर बुधवार रोजी सायंकाळी साडेचार वाजता औंढा नागनाथ तहसीलदार हरीश गाडे यांना देण्यात आले आहे. निवेदनात ॲग्री स्टॅक योजनेचे काम पुढील निर्णय होईपर्यंत न करण्याचा निर्णय घेतला असून याबाबत निवेदन दिले आहे. यावेळी संघटनेचे तालुका अध्यक्ष विठ्ठल शेळके, सुवर्णमाला शिरसाट, गजानन हजारे, सचिव गोपाल मुकीर, के. एल जगताप, माधव भुसावळे, ज्योती स्वामी, संजय पाटील, मल्लिकार्जुन स्वामी, संजय वाघिले, विशाखा डोंगरे, बीएस साबळे सुनील रोडगे गजानन गुजकर आदींची उपस्थिती होती.

# चंद्रपूर येथे शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे राज्यस्तरीय अधिवेशन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ डिसेंबर**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक शाळा शिक्षकेतर महामंडळाचे ५२ वे राज्यस्तरीय अधिवेशन रविवार, दिनांक १९ जानेवारी २०२५ रोजी चिमूर, जिल्हा चंद्रपूर येथे होणार असल्याची माहिती महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजीराव खांडेकर, राज्अध्यक्ष अनिल माने,कार्याध्यक्ष मोरेश्वर वासेकर यांनी दिली असल्याची माहिती हिंगोली जिल्हाध्यक्ष गोपालराव सरनायक यांनी दिली आहे.

नुकत्याच त्रिमूर्ती शैक्षणिक संकुल नेवासा, जि. अहिल्यानगर येथे झालेल्या महामंडळाच्या कार्यकारिणीच्या सभेत सदरची घोषणा करण्यात आली. या सभेच्या अध्यक्षस्थानी महामंडळाचे सरकार्यवाह शिवाजीराव खांडेकर होते तर राज्य अध्यक्ष अनिल माने, कार्याध्यक्ष मोरेश्वर वासेकर, जिल्हा संघटेनेचे सचिव इम्रान मुल्ला, कार्याध्यक्ष संजय पवार, भानुदास काळे यांच्यासह राज्य व जिल्हा कार्यकारणीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

यावेळी शिक्षकेतर पदोन्नती पदभरती, अनुकंपा, वेतन निश्चिती तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रलंबित प्रश्नांसंबंधी चर्चा करण्यात आली. याबाबत शासन स्तरावर त्याचा लवकरच पाठपुरावा करून शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्याय दिला जाईल, असे आश्वासन यावेळी महामंडळाचे सहकार्यवाहक शिवाजीराव खांडेकर यांनी दिली आहे.चंद्रपूर जिल्यातील चिमूर येथे होणाऱ्या अधिवेशनाला हिंगोली जिल्ह्यातील अनेक शिक्षकेतर कर्मचारी जाणार असल्याची माहिती हिंगोली जिल्हाध्यक्ष गोपालराव सरनायक,सचिव विलास शिंदे,उपाध्यक्ष भानुदास कदम,संतोष गंगावणे यांनी दिली आहे.

# सेनगाव पोलिसांनी गोवंशाची वाहतुक करणारे वाहन पकडले




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ डिसेंबर**

सेनगाव ते जिंतुर मार्गावर पातोंडा शिवारात पोलिसांचे पथक गस्तीवर असतांना संशयावरून पथकाने एका वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये दाटीवाटीने पाच गोवंशाची वाहतुक होत असल्याचे आढळले. पोलिसांनी सदर वाहन चालकासह गोवंश पोलिस ठाण्यात आणले आहेत.

सेनगाव तालुक्यातील पातोंडा शिवारात गस्तीवर असलेले पोलिस कर्मचारी खांडेकर यांनी एका टेम्पोला संशयावरून थांबवले. यावेळी तपासणी केली असता त्यामध्ये पाच गोवंश आढळले. सदरील वाहन जिंतुरकडे जात होते. पोलिसांनी चालकाची विचारणा केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिल्यामुळे पोलिसांनी वाहनासह गोवंश सेनगाव पोलिस ठाण्यात आणले असून पुढील तपास पोलिस निरीक्षक सोनकांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली होत आहे.

# कोनाथा येथील नागरिकांनी शासनाच्या योजनेचा लाभ घ्यावा- राजरत्न कुंटे



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १९ डिसेंबर**

राज्यातील निवडणुका व आचार संहिता संपताच विविध कामे नागरिकांची प्रलंबित असलेले तात्काळ करून घ्यावेत, याच अनुषंगाने कोनाथा गावात दिनांक १९ डिसेंबर २०२४ रोजी सरपंच यांनी गावातील नागरिकांची बैठक बोलवत रमाई आवास योजनेतील विविध लाभार्थी यांना आवश्यक असलेली प्रक्रिया पूर्ण करून प्रस्ताव तात्काळ ग्रामपंचायत कार्यालय येथे जमा करावेत तसेच शासनाच्या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन केले.गट विकास अधिकारी तोटावाड यांच्या आदेशाने विविध लाभार्थी यांची निवड रमाई आवास योजनेत केली असून प्रस्ताव सादर करावे अशा सूचना केल्या आहेत. यासाठी कोनाथा ग्रामविकास अधिकारी संजय कातोरे यांनी पूर्ण प्रकिया लाभार्थी यांना समजावून सांगीतली. यावेळी सरपंच राजरत्न कुंटे, रोजगार सेवक बापूराव बेंडे, सेवक शामराव पौळ समेत लाभार्थी उपस्थित होते. ग्रामपंचायत कार्यप्रणाली वर समाधान व्यक्त करत गावकऱ्यांनी गटविकास अधिकारी तोटावाड यांचे आभार मानले. यावेळी ग्रामस्थांची उपस्थिती होती.